ऑगस्ट २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव



# शपथविधी समारंभ




शपथविधी सोहळ्याला उपस्थित राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.



मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन करताना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी.




राजभवन येथील दरबार हॉलमध्ये राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी राधाकृष्ण विखे-पाटील यांना मंत्रिपद व गोपनीयतेची शपथ दिली.



शपथ घेतल्यानंतर मंत्री उदय सामंत यांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.



राजभवन येथील दरबार हॉलमध्ये झालेल्या शपथविधी सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## ९ स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्र

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १ मे या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधीनस्थ असलेल्या दर्शनिका विभागाद्वारे 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या ग्रंथाची निर्मित करून प्रकाशन करण्यात आले. यामागे प्रामुख्याने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असलेले सर्व क्रांतिकारी आणि हुतात्मे यांना विनम्र अभिवादन या ग्रंथातील शब्दसुमनांनी करण्याचा संकल्प होता.



## २२ ध्वज निर्मिती करणारी संस्था

आपल्या देशासाठी ध्वज निर्मिती करणारी म्हणून भारतभर केवळ ओळख निर्माण करणारीच नव्हे, तर आपल्या गुणवत्तेची मोहर ठसवणारी संस्था म्हणून नांदेडच्या मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीची नोंद घ्यावी लागते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या संस्थेच्या कार्याचा थोडक्यात आढावा...



## १३ स्वातंत्र्यलढा आणि महिला

इंग्रजांचे राज्य संपवून देश स्वातंत्र्य करण्यासाठी पुरूष, स्त्रिया, अबालवृद्ध सर्वच पुढे सरसावले होते. १९४७ चा तो काळ आणि आज आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असल्याचे औचित्य साधून दर्शनिका विभागाकडून प्रकाशित 'स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्य' या मालिकेतून स्वातंत्र्य चळवळीच्या विविध मोहिमांमध्ये सक्रिय असलेल्या ज्ञात-अज्ञात महिलांच्या कार्याचा आढावा...



## ३५ पर्यावरणपूरक गणेशोत्सव

गणराया म्हणजे बुद्धिदेवता, शक्तीदेवता आणि सामर्थ्यदेवता म्हणून गणली जाते. संत ज्ञानदेवांनी 'ओम नमोजी आद्या' या श्लोकातून गणरायाला वंदन करून ओमकार रूपाचे स्मरण केले होते. मग अशा चौदा विद्या व चौसष्ट कलांच्या अधिपतीचे नाते समृद्ध निसर्गाशी घट्ट करण्यासाठी आपण डोळसपणे या उत्सवाकडे पाहत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची गरज आहे.



## १५ महाराष्ट्राची उत्तुंग झेप

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्य निर्मितीची चळवळ महाराष्ट्रात व देशभर झाली. भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही बॉम्बे स्टेटमधून स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली हे आपण जाणतो. त्यातून महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मंगलकलश घेऊन दिवंगत यशवंराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे नवे राज्य उदयाला आले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त १९६० ते २०२२ पर्यंतच्या महाराष्ट्र राज्याच्या आजवरच्या प्रगतीचा आणि घवघवीत यशदायी अशा ६२ वर्षांच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

## ३८ पर्व औद्योगिक क्रांतीचे !

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास साधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार राज्य शासनामार्फत १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)ची स्थापना करण्यात आली. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी तत्कालीन वित्तमंत्री स. गो. बर्वे यांच्यासमवेत महामंडळाचे बीज रोवले. आज, महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेले आणि अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध असलेले प्रगत राज्य झाले आहे.


| | |
|---|---|
| राज्य प्रगतिपथावर नेऊ या! | ६ |
| बलशाली महाराष्ट्राचा संकल्प | ८ |
| स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्र | ९ |
| स्वातंत्र्यलढा आणि महिला | १३ |
| महाराष्ट्राची उत्तुंग झेप | १५ |
| ध्वज निर्मिती करणारी संस्था | २२ |
| घरोघरी तिरंगा अभियान | २४ |
| आपले मंत्री | २६-३४ |
| पर्यावरणपूरक गणेशोत्सव | ३५ |
| पर्व औद्योगिक क्रांतीचे! | ३८ |
| आधुनिक प्रतिभावंत कवी | ४२ |
| पाऊल पडते पुढे | ४३-५१ |
| सर्वसामान्यांशी संवाद | ५२ |
| मंत्रिमंडळात ठरले | ५६ |

वर्ष ७३ वे | अंक १२ | ऑगस्ट २०२२

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

## जुलैचा अंक आवडला

लोकराज्य मासिक जुलै आवृत्ती छान आहे. राज्याच्या प्रगतीचा अहवाल, विकासात्मक कामे प्रकाशित करण्यात आली आहेत.

**- विजय शेळके**


## वाचनीय




लोकराज्य मे २०२२चा देदीप्यमान महाराष्ट्र हा अंक आवडला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १०० व्या पुण्यतिथीनिमित्त या अंकात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा आढावा घेणारे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. या लेखांतून छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची ओळख झाली. तसेच अंकातील सर्व सदरे वाचनीय आहेत.

**- अमोल कुंभार, कोल्हापूर**

## प्रेरणादायी यशकथा




जून २०२२ च्या लोकराज्य अंकात सामाजिक न्याय व विशेष साहाय्य आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली आहे. या योजनांची माहिती वंचित घटकातील विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. तसेच विविध महामंडळांच्या कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली आहे. या योजनांचा लाभ घेऊन अनेकांची स्वप्ने साकार झाल्याच्या यशकथा प्रेरणा देणाऱ्या आहेत.

**- अविनाश भातांगळे, लातूर**

## स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त

लोकराज्य या मासिकाचे अंक हे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या परीक्षार्थींसाठी अत्यंत उपयुक्त असतात. या मासिकात अधिकृत माहिती व आकडेवारी दिली जाते. तसेच विविध लोकोपयोगी योजनांचा अंकात समावेश केला जातो. चालू घडामोडी हे सदर स्पर्धा परीक्षार्थींसाठी अत्यंत उपयुक्त आहे. लोकराज्यमधील छायाचित्रे, लेख दर्जेदार असतात. अंकातील सर्वच सदरे वाचनीय असतात. विविध योजनांची माहिती इत्थंभूत मिळते, यासाठी टीम लोकराज्यचे मनःपूर्वक आभार.

**- अक्षय बदुकले, यवतमाळ**

## 'लोकराज्य' वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित होत असलेल्या 'लोकराज्य' या महाराष्ट्र शासनाच्या मुखपत्राला तब्बल सात दशकांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या या मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढवण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांच्या विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय इत्यादींचे lokrajya2011@gmail.com या ई-मेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवण्यात यावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००३२.

# देदीप्यमान अमृतमहोत्सवी वाटचाल !

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश ब्रिटिश राजवटीतून मुक्त झाला. सर्वांनाच मोकळे आकाश मिळाले आणि हे आकाश अधिक विस्तारण्याचा आपण प्रथमपासूनच प्रयत्न करत आहोत. स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ७५ वर्षांत देशाने कृषी, आरोग्य, उद्योग, शिक्षण, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वी वाटचाल केली आहे. यामधील राज्याचा सहभाग व प्रगती नक्कीच सुखावणारी आहे.

स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त या अंकात महाराष्ट्राने केलेल्या आजवरच्या वाटचालीचा विशेषत्वाने समग्र आढावा घेण्यात आला आहे. सन १९६० ते २०२२ या कालावधीतील महाराष्ट्राच्या प्रगतीचा विविधांगी आढावा 'महाराष्ट्राची उत्तुंग झेप' या लेखातून घेण्यात आला आहे. यात तत्कालीन आणि सध्याच्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यातून महाराष्ट्राने केलेली प्रगती लक्षात येईल. हा अभ्यासपूर्ण लेख आपल्याला नक्कीच आवडेल.



कुठलीही विकासाची चळवळ असो किंवा अन्य कुठलीही उत्कृष्ट कामगिरी असो, महाराष्ट्राचे योगदान हे त्यात असतेच. स्वातंत्र्य चळवळीमध्ये महाराष्ट्राचे योगदान हे लक्षणीय होते. राज्यातील अनेक क्रांतिकारकांनी देशासाठी बलिदान दिले. या सर्व योगदानाचा आढावा 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या लेखात घेण्यात आला आहे.

ध्वज निर्मिती करणारी नांदेडची संस्था ही देशासाठी एक शान म्हणून आजही डौलात उभी आहे. गुणवत्तापूर्ण ध्वज निर्मितीचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. या थोड्याशा अपरिचित संस्थेचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. गणेशोत्सवाचे महत्त्व लक्षात घेऊनच लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लोकसहभाग महत्त्वाचा मानून त्याला सार्वजनिक रूप दिले. कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. गणेशोत्सवामधील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी आग्रही राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल. या विषयावर आधारित 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' हा लेख अंकात घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारच्या माध्यमातून एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. या सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटप करण्यात आले आहे. नवीन मंत्रिमहोदयांचा परिचय अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. एक नवा उत्साह आपल्याला पाहायला मिळेल. राज्याच्या शाश्वत प्रगतीसाठी हे सरकार निश्चितच प्रयत्नशील असेल, असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र राज्याचा औद्योगिक विकास साधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना १९६२ मध्ये करण्यात आली. महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेले आणि पायाभूत सुविधा उपलब्ध असलेले प्रगत राज्य होण्यात एमआयडीसीचा मोठा वाटा आहे. या अंकात एमआयडीसीच्या गेल्या ६० वर्षांतील देदीप्यमान प्रगतीचा आढावा 'पर्व औद्योगिक क्रांतीचे!' या लेखाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.

वाचकांच्या प्रतिक्रिया या अंकात घेण्यास सुरुवात केली आहे. यास वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून काही निवडक प्रतिक्रिया या अंकात प्रकाशित करण्यात येत आहेत. येत्या काळातही वाचकांच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

चालू घडामोडी, वाचू आनंदे, मंत्रिमंडळ निर्णय ही नेहमीची सदरे अंकात समाविष्ट आहेत. आपल्या सर्वांना हा अंक नक्कीच आवडेल, असा विश्वास वाटतो.

गेल्या ७५ वर्षांत महाराष्ट्राने देशाच्या एकूणच वाटचालीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. येत्या काळातही ही देदीप्यमान वाटचाल अशीच सुरू राहील, असा विश्वास या अमृतमहोत्सवी वर्षात व्यक्त करू या. सर्वांना स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**दीपक कपूर**
(मुख्य संपादक)

**महाराष्ट्राला देशात अग्रेसर राज्य बनवण्याच्या दिशेने आपण वाटचाल सुरू केली आहे. आपण सर्वजण मिळून भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त देशाला आणि राज्याला प्रगतिपथावर नेण्याची शपथ घेऊ या, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मंत्रालयात भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्या वेळी राज्यातील जनतेला उद्देशून त्यांनी भाषण केले. या भाषणाचा हा संपादित भाग...**

# राज्य प्रगतिपथावर नेऊ या!

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मला आज ध्वजारोहणाची संधी मिळाली आहे, हे मी माझे भाग्य समजतो. प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना सर्वप्रथम मी विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनादेखील मी अभिवादन करतो. गेल्या अडीच-पावणे तीन वर्षांत कोविडच्या भयंकर विषाणूने आपल्याला बंदिस्त केले होते. आज संकट पूर्णपणे गेलेले नाही, पण आपण सगळ्यांनी या विषाणूने घातलेल्या बेड्या तोडल्या आहेत. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव उत्साहाने साजरा करतो आहोत. तसेच येणारा गणेशोत्सव, दहीहंडी किंवा इतर धार्मिक सणदेखील आपण नेहमीप्रमाणे काळजी घेऊन जल्लोषात साजरे करणार आहोत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आपले राज्य आज पूर्णपणे तिरंग्यात न्हाऊन निघाले आहे. घरोघरी तिरंगा दिसतो आहे. मुख्य म्हणजे नागरिकांनी स्वत: उत्स्फूर्तपणे यात भाग घेतला आहे. राज्यात नवे सरकार स्थापन झाले आहे. अगदी पहिल्या दिवसांपासून आम्ही कामाला सुरुवात केली आहे. आमचे पहिले प्राधान्य सर्वसामान्य माणूस, शेतकरी, शेतमजूर, दीनदुबळे घटक हे आहेत. गेल्या दोन महिन्यांत राज्याच्या अनेक भागात जोरदार पाऊस, अतिवृष्टीमुळे खूप नुकसान झाले. आम्ही तातडीने प्रत्यक्ष अतिवृष्टिग्रस्त भागांना भेटी दिल्या, निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे वेगाने पंचनामे सुरू झाले. २८ जिल्ह्यांना फटका बसला असून १५ लाख हेक्टर जमिनीचे नुकसान झाले असावे असा अंदाज आहे. सुमारे १५ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले, त्यांची राहण्याची, जेवण्याची व्यवस्था केली. अतिवृष्टिग्रस्तांना मदत म्हणून एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट मदत देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. सध्या ही मदत दोन हेक्टर मर्यादेत करण्यात येते, ती वाढवून तीन हेक्टर मर्यादेत करण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे.



### पूर, अतिवृष्टीवर कायमस्वरूपी इलाज हवा

पूर, अतिवृष्टीवर कायमस्वरूपी आणि शाश्वत उपाय करण्यासाठी आम्ही जलसंपदा विभागामार्फत नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे यासाठी शास्त्रशुद्ध कार्यक्रम तयार करत आहोत.

### आरक्षणासाठी सरकार गंभीर

ओबीसी समाज असेल, मराठा किंवा धनगर समाज असेल, त्यांना आरक्षणाचे फायदे मिळवून देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. बांठिया आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारल्याने ओबीसी समाजाला दिलासा मिळालेला आहे. ओबीसींना पुन्हा आरक्षण मिळाले आहे. 'सारथी' आणि 'महाज्योती' या संस्थांना बळकट करत आहोत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी 'अमृत'या संस्थेलादेखील उभारी देण्यात येत आहे.

### गतिमान व गुणवत्तापूर्ण कामे

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करताना गतिमान व गुणवत्तापूर्ण कामे झाली पाहिजेत, हे प्रशासनाला सांगितले आहे.

नावीन्यपूर्ण आणि चांगले उपक्रम राज्यातील जनतेच्या हितासाठी राबवण्याचे आम्ही प्रयत्न करत आहोत.

### केंद्र शासनाचा संपूर्ण पाठिंबा

सरकार सत्तेवर आल्यानंतर सातत्याने महाराष्ट्राच्या

प्रगतीविषयी केंद्राशी आम्ही बोलतो आहोत. प्रधानमंत्री, केंद्रीय गृहमंत्री तसेच केंद्रातील इतर मंत्रिमहोदयांनी राज्याच्या विकासाला काही कमी पडू दिले जाणार नाही, अशी ग्वाही दिली आहे, त्यामुळे आमचा उत्साह वाढला आहे. केंद्राच्या योजनांची आणि कार्यक्रमांची राज्यात सर्वात चांगली अंमलबजावणी झाली पाहिजे, असे निर्देश आम्ही प्रशासनाला दिले आहेत.

## शेतीला प्रोत्साहन

पीक पद्धतीत बदल, विविधीकरण, सिंचन व्यवस्था बळकट करणे, शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सेंद्रीय व नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे यातून राज्यातील कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करणार आहोत. या संदर्भात नुकतीच नीति आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राची भूमिका परखडपणे मांडली आहे.

## शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची चांगली अंमलबजावणी आम्ही करणार आहोत. 'आमचे गुरुजी' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यात वर्गामध्ये शिक्षकांचे छायाचित्र लावण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना शिक्षकांची ओळख होईल.

राज्यातील कोणतीच शाळा एक शिक्षक राहणार नाही, असे नियोजन आम्ही केले आहे.

## शहरी भागाचा नियोजनबद्ध विकास

राज्यातील शहरी भागाच्या नियोजनबद्ध विकासासाठी पीएम गती शक्ती मॉडेलचा उपयोगदेखील आम्ही करणार आहोत. राज्यात ग्रीनफिल्ड शहरे निर्माण करण्यावर आम्ही भर देत आहोत.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग विकासाचा महामार्ग ठरेल, यात काही शंकाच नाही. येत्या काही दिवसांत या महामार्गाचा पहिला टप्पा कार्यान्वित होईल.



## पाणी, घरे यांना प्राधान्य

पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी जलजीवन मिशन सारख्या योजनेची ७५ टक्के अंमलबजावणी झाली आहे, तर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे बांधून आम्ही बेघरांना निवारा दिला आहे. पोलिसांच्या घरांसाठी गृह, नगरविकास, गृहनिर्माण, सिडको या सर्व विभागांनी समन्वयाने सर्वंकष आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात उद्योग-रोजगार वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. नुकतीच रतन टाटा यांच्याशीही भेट घेऊन चर्चा झाली आहे. कौशल्य विकासास प्राधान्य देणार असून त्याद्वारेही रोजगार कसा वाढेल, हे आम्ही पाहणार आहोत.

स्टार्टअप व नावीन्यता यात्रेला सुरुवात केली आहे. कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करणे हे सागरी किनाऱ्यालगतच्या पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वाचे आहे. याशिवाय स्थानिकांना रोजगारदेखील मिळणार आहे. हे लक्षात घेता येत्या वर्षभरात राज्यातील उर्वरित सर्व कांदळवन क्षेत्र राखीव वनाखाली आणण्यासाठी नियोजन करणे सुरू आहे.

गेल्या दीड महिन्यात आम्ही जनहिताचे निर्णय घेतले आहेत. लोकांच्या हिताची कामे थांबवलेली नाहीत. शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देत आहोत. विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करत आहोत. उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना सवलत दिली आहे. ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनांतील भूमिहीन लाभार्थींना जागा देण्यासाठी सवलती दिल्या आहेत. स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी दुसरा टप्पा राबवणार आहोत. प्लास्टिकला पूर्णपणे बंदी घातली आहे.

एमएमआरडीएला ६० हजार कोटींपर्यंतचे कर्ज उभारण्यास मान्यता दिली आहे, त्यामुळे प्रकल्पांना वेग आलेला दिसेल. आज कोरोनाचे संकट पूर्णपणे गेलेले नाही. त्यामुळे यानिमित्त मी पुन:श्च एकदा आपणास आवाहन करतो की, कोविडचा बूस्टर डोस मोफत देण्यात येत आहे. कोविड लसीमुळे या जीवघेण्या संकटातून संरक्षण मिळते आहे, हे कृपया लक्षात घ्या. महाराष्ट्राला देशात एक अग्रेसर राज्य बनवण्याच्या दिशेने आपण वाटचाल सुरू केली आहे. आपण सर्वजण मिळून भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त देशाला आणि राज्याला प्रगतिपथावर नेण्याची शपथ घेऊ या.

**(मा. मुख्यमंत्री महोदयांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेल्या भाषणाचा संपादित भाग)**

**स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये आगामी २५ वर्षांचे नियोजन करण्याची ही योग्य वेळ आहे. मानवी चेहरा असणारा विकास देऊन बलशाली महाराष्ट्र निर्मितीचा संकल्प या वेळी करू या, असा संदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभात दिला. नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनानिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचा संपादित भाग..**

# बलशाली महाराष्ट्राचा संकल्प

सर्वप्रथम स्वातंत्र्यांच्या अमृतमहोत्सवाच्या उपस्थितांना शुभेच्छा देतो. स्वातंत्र्याचे ७५वे वर्ष हा अमृत काळ असून समाजाच्या उत्कर्षासाठी पुढच्या २५ वर्षांमध्ये करायच्या कामांचे नियोजन करण्याची ही संधी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, ओबीसी, शेतकरी, महिला, विद्यार्थी, कामगार सर्व समाज घटकांना सोबत घेऊन आमची वाटचाल असेल.

स्वातंत्र्यसंग्रामात नागपूर शहराने अभिमानास्पद भूमिका बजावली. नागपूर शहराने चले जाव चळवळीत मोठे योगदान दिले आहे. अनेकजण शहीद झाले. त्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानापुढे आम्ही नतमस्तक आहोत. नागपूरच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. नागपूर बदलत असल्याचा अनुभव आपण घेत आहोत. मेट्रोपासून अनेक पायाभूत सुविधांचा विकास सर्वांपुढे आहे. मात्र या विकासातून प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक बदल झाला पाहिजे.



अतिवृष्टीमुळे सध्या शेतकरी त्रस्त आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) दुप्पट मदत जाहीर केली आहे. केवळ हीच नव्हे, तर पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी, दुरुस्तीसाठी, जनावरांच्या नुकसानासाठीसुद्धा मदत केली जाईल. येत्या काळात महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काम केले जाणार आहे. हे करताना विदर्भाच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले जाईल. विदर्भातील उद्योगांना वीज अनुदान दिले जाईल. या ठिकाणी गुंतवणूक वाढावी यासाठी प्रयत्न केले जातील. नागपूर हे एज्युकेशन हब होत आहे. दर्जेदार शिक्षणाचे केंद्र होत आहे. शिक्षण दर्जेदार असेल, तर उत्तम कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण होईल. उद्योग व्यवसाय येतील. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. नागपुरातील तरुणांच्या हाताला काम मिळेल. यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत.

अमृतमहोत्सवी वर्षात आगामी २५ वर्षांचे नियोजन करताना मानवी चेहरा असणारा विकास हे उद्दिष्ट आम्ही ठरवले आहे. बलशाली महाराष्ट्र, ट्रिलियन इकॉनॉमी असणारा महाराष्ट्र निर्मितीचा आमचा निर्धार आहे. मात्र हे सर्व करताना शेवटचा वंचित माणूस हेच आमचे विकासाचे केंद्र असेल. शहर व ग्रामीण भागाचा समतोल विकास हेच उद्दिष्ट असेल.

'हर घर तिरंगा' उपक्रमात जनतेने उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचे आभार. तिरंगा आमची आन-बान-शान आहे. या अमृतमहोत्सवी वर्षात राष्ट्रभक्तीची भावना मनामनात तेवत ठेऊन एकमेकांना सोबत घेऊन 'एक भारत श्रेष्ठ भारत' घडवण्यासाठी सिद्ध होऊ या.

**(मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेल्या भाषणाचा संपादित भाग.)**

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १ मे या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधीनस्थ असलेल्या दर्शनिका विभागाद्वारे 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या ग्रंथाची निर्मिती करून प्रकाशन करण्यात आले. यामागे प्रामुख्याने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असलेले सर्व क्रांतिकारी आणि हुतात्मे यांना विनम्र अभिवादन या ग्रंथातील शब्दसुमनांनी करण्याचा संकल्प होता. स्वातंत्र्य आंदोलनातील हजारपेक्षाही अधिक हुतात्म्यांचे आजच्या व भावी पिढीला स्फूर्तिदायक ठरेल, असे संक्षिप्त चरित्र या ग्रंथात दिले आहे.**

# स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्र

**डॉ. दि. प्र. बलसेकर**

शंभरहून अधिक वर्षे इंग्रज सत्तेच्या दडपशाही, हुकूमशाहीच्या त्रासात भारतवासी होरपळून निघत होते. त्यांच्या सहनशक्तीचा अंत होण्यास सुरुवात झाली. २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापासूनच याचे पडसाद अधिक तीव्रतेने दिसू लागले. संपूर्ण भारतातील विविध राज्यांपैकी महाराष्ट्राच्या भूमीतदेखील अशाच भूमिपुत्र क्रांतिकारकांनी हजारोंच्या संख्येने ब्रिटिशांविरुद्ध लढा देण्यास सुरू केला. आपापल्यापरीने पुरुष, महिला, अगदी मुलामुलींनीदेखील हिमतीने व बळाने ब्रिटिश सत्तेला हाकलण्याचा जणू काही विडाच उचलला, असे चित्र होते. याच स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी हौतात्म्य पत्करून बलिदान दिले, तर क्रांतिकारकांनी कैदेत राहून शिक्षा भोगल्या. त्यांच्या बलिदानाची जाणीव आजही भारतवासीयांना आहे व त्याचा त्यांना कधीही विसर पडणार नाही. त्यांच्या या कर्तव्यामुळे आणि बलिदानामुळेच आज आपण स्वतंत्र भारतवासी म्हणून मुक्तपणे जगत आहोत.



## क्रांतिकारी व हुतात्म्यांना अभिवादन

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १ मे या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधीनस्थ असलेल्या दर्शनिका विभागाद्वारे 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या ग्रंथाची निर्मिती करून प्रकाशन करण्यात आले. यामागे प्रामुख्याने स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असलेले सर्व क्रांतिकारी आणि हुतात्मे यांना विनम्र अभिवादन या ग्रंथातील शब्दसुमनांनी करण्याचा संकल्प होता.

सन १८१८ ते १९४७ या कालखंडात भारताप्रमाणेच महाराष्ट्राच्या भूमीत इंग्रज सत्तेविरुद्ध एक क्रांतीची ज्योत पेटली होती व याचे परिणाम जनसामान्यांच्या जीवनावर कसे होत होते याचा एक संक्षिप्त आढावा मूलतः या ग्रंथाच्या प्रस्तावनेतच घेतला आहे. प्रस्तावनेनंतर १८५७-५८ च्या बंडापासून विविध कालखंडावर परिचयात्मक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच या ग्रंथात स्वातंत्र्य आंदोलनातील हजारपेक्षाही अधिक हुतात्म्यांचे आजच्या व भावी पिढीला स्फूर्तिदायक ठरेल, असे संक्षिप्त चरित्र दिले आहे.

आज आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करताना आठवते ती सुमारे ७५ वर्षांपूर्वीची स्वातंत्र्यपूर्व संध्याकाळ! अशी संध्याकाळ, जिच्या गर्भात उद्याच्या स्वातंत्र्याचा सूर्य लपला होता आणि ती स्वातंत्र्याची पहाट जी आपल्याबरोबर नवी आशा, नवी स्वप्ने घेऊन उजाडली होती, एका नव्या स्वतंत्र, समृद्ध भारताची, आताही त्या सुवर्ण दिवसाची आठवण झाल्यावर कोणतेही भारतीय मन अभिमानाने आणि गर्वाने फुलून येईल. मात्र त्याचबरोबर त्या स्वातंत्र्यासाठी ज्या लोकांनी आपल्या प्राणांची बाजी लावली, हौतात्म्य पत्करले, तुरुंगात नरकयातना सोसल्या, पोलिसांच्या लाठ्या व गोळीबार झेलला, त्या स्वातंत्र्ययोद्ध्यांची आठवण येऊन डोळे मात्र पाणावल्याशिवाय राहणार नाहीत. त्या अनेक ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना व त्यांच्यामागच्या प्रेरणांना अभिवादन.

भारताच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या या स्वातंत्र्यलढ्याचा या ग्रंथाच्या निमित्ताने आढावा घेतला असता हा स्वातंत्र्यलढा ही एक प्रदीर्घ काळ चालू असलेली प्रक्रिया

असल्याचे दिसून येते. १६-१७व्या शतकात केवळ व्यापारासाठी आलेल्या युरोपियन राष्ट्रांनी विशेषतः ब्रिटिशांनी आर्थिक उलाढाल करता करता कधी संपूर्ण देश आपल्या साम्राज्यवादी विचारसरणीतून घशाखाली घातला हे कळलेही नाही. जेव्हा ते कळले तेव्हा काही प्रमाणात झालेला विरोध हा देशात नव्याने स्थिरस्थावर होऊ पाहणाऱ्या ब्रिटिश सत्तेने चिरडून टाकला. १ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात पेशवा बाजीराव दुसरा याचा पूर्ण पाडाव होऊन महाराष्ट्रासह देशाचा मोठा भूभाग ब्रिटिश अमलाखाली आला. हळूहळू ही व्याप्ती वाढत जाऊन ब्रिटिशांच्या नवनवीन आक्रमक धोरणांमुळे ब्रिटिश वर्चस्व मान्य केलेली काही स्थानिक संस्थाने वगळता तसेच पोर्तुगीज व फ्रेंच या युरोपियन सत्तांनी बळकावलेला भारताचा भूभाग वगळता संपूर्ण देशच ब्रिटिश अमलाखाली आला. त्यानंतर सुरुवात झाली ती एका नवीन पर्वाची ज्यामध्ये केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक, आर्थिक, वैचारिक, सांस्कृतिक सगळ्याच पातळ्यांवर प्रचंड उलथापालथ झाली.

इंग्रजी राजवटीने देशात शिक्षण, कायदा व विज्ञान याबाबतीत जी धोरणे राबवली व सुधारणा केल्या. त्यामुळे महाराष्ट्राचा पाश्चात्य विचारसरणीशी व संस्कृतीशी घनिष्ठ संबंध आला. अर्थात आज आपण ज्याला महाराष्ट्र म्हणून ओळखतो तो भूभाग तत्कालीन मुंबई इलाखा, मध्यप्रांत, हैद्राबादच्या निझामाच्या अमलाखालील मराठवाड्याचा प्रदेश व कोल्हापूर, सावंतवाडी, भोर, सातारा अशा विविध संस्थानांमध्ये विभागला गेला होता. तरी साधारणपणे तत्कालीन मराठी भाषिक प्रदेश व भाषावार प्रांतरचनेनंतर निर्माण झालेले सध्याचे महाराष्ट्र राज्य अशी याची भूभागाची व्याप्ती निश्चित करता येईल.

## सामाजिक चळवळींची सुरुवात

१८५७ च्या देशातील सार्वत्रिक बंडाचा बिमोड करून इंग्रजी राजसत्ता देशात व पर्यायाने महाराष्ट्रात चांगलीच स्थिरावली. इंग्रजांच्या शैक्षणिक धोरणामुळे पाश्चात्य ज्ञानाची कवाडे महाराष्ट्रातल्या जनतेसाठी उघडली. तत्कालीन समाजातील उच्चभ्रू वर्ग या नवीन ज्ञानाकडे आकर्षित झाला. इंग्रजी शिक्षणामुळे भारलेल्या या वर्गाला समाज परिवर्तनाचे वेध लागले. त्यामुळे १९व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जो नवा विचारवाद जन्मला तो राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त जवळचा होता. बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांसारख्या समाजधुरीणांनी बहुजन समाज अधिक ज्ञानाभिमुख व्हावा, या दृष्टीने हिरिरीने प्रयत्न केले. या ओढीतूनच 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रसारक' व 'ज्ञानप्रकाश' यांसारख्या नियतकालिकांचा जन्म झाला. ही चळवळ जरी राजकारणापासून संपूर्णतः अलिप्त होती, तरी या सामाजिक चळवळीतूनच बहुजन समाजाला जागृतावस्थेत आणले गेले व पुढे घडलेल्या राजकीय चळवळीचा पाया घातला गेला, ही गोष्ट विसरून चालणार नाही. विधवा पुनर्विवाह, सर्वांसाठी शिक्षण, स्त्री शिक्षण, जाती धर्माच्या पलिकडे जाऊन एखाद्याला दिलेली समानतेची वागणूक अशी या समाजवादी चळवळीची सुरुवात होती. गोपाळराव देशमुख उर्फ लोकहितवादी यांचा उल्लेख इथे येणे आवश्यक आहे.

तत्कालीन धार्मिक व सामाजिक ढोंगीपणावर व अनावस्थेवर त्यांनी कोरडे ओढले, त्यामुळे समाज खडबडून जागा झाला. विचारवंतामध्ये मुंबईचे जगन्नाथ शंकरशेठ, भाऊ दाजी लाड, तर पुण्यात जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले, महादेव गोविंद रानडे यांच्यासारख्या समाजधुरीणांचा समावेश होतो. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्त्री-शिक्षणासाठी व समाज सुधारणांसाठी जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांच्या सत्यशोधक समाजाद्वारे फुले दाम्पत्याने स्त्रिया व शोषित समाजाच्या उन्नयनाचा मार्ग शोधला. याशिवाय न्यायमूर्ती रानडे व दादाभाई नौरोजी यांनी भारतीय समाजाचे लक्ष आर्थिक साम्राज्यवादाकडे वळवले. इंग्रजांच्या भांडवलदारी मनोवृत्तीतून देशाच्या होणाऱ्या शोषणाचे त्यांनी नव्याने जागृत होणाऱ्या समाजाला भान दिले. थोडक्यात हा कालखंड पाश्चात्य शिक्षण, संस्कृती व विचारांनी प्रेरित होऊन समाजाचे अंतर्मुख होऊन अवलोकन करणारा व समाजात सुधारणा व्हाव्या यासाठी व्यक्तिगत तसेच संघटित प्रयत्न करणारा होता.


## सुरुवातीचे लढे

समाजात एका बाजूला हे सामाजिक व वैचारिक प्रबोधन सुरू असताना दुसऱ्या बाजूला समाजातील एक घटक हे परचक्र उलथवून टाकण्यासाठी प्रयत्नशील होता. हा घटक होता तत्कालीन पदच्युत सत्ताधीशांचा. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणांमुळे अनेक राजे, नवाब आपल्या सत्तेपासून वंचित राहिले होते. याचे पर्यवसन जरी १८५७ च्या अयशस्वी ठरलेल्या उठावात झाले असले तरी १९व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच इंग्रजी राजवटीला विस्कळीत व असंघटित सशस्त्र विरोध झालेले दिसून येतात. १९व्या शतकात इंग्रजांचा प्रतिकार करणाऱ्यांमध्ये मुख्यतः खानदेशातील भिल्लांसारखे, मध्यप्रांतातील गोंडांसारखे आदिवासी तसेच रामोशी, कोळी, मांग वगैरे समाजाचे लोक होते. याशिवाय पेशव्यांचे एके काळचे अधिकारी आणि नागपूर, सातारा, कोल्हापूर, सावंतवाडी या ठिकाणच्या राजघराण्यांवर निष्ठा असलेल्या उच्च समजल्या जाणाऱ्या समाजातील लोकही होते. त्यांच्यामध्ये शौर्य, धाडस व निष्ठेची कमतरता नसली तरी इंग्रजांच्या सुसज्ज, शिस्तबद्ध कवायती फौजेपुढे त्यांचा निभाव लागला नाही. तथापि यांच्यापैकी काहींनी पराभव पत्करूनही हार मानली नाही. नंतर इंग्रज राजवट काहीशी स्थिरावल्यानंतर १८५७ मध्ये पुन्हा एकदा देशपातळीवर इंग्रजांविरुद्ध काहीसा संघटित लढा देण्याचा प्रयत्न झाला. या उठावात नानासाहेब पेशवे, रावसाहेब पेशवे, झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांसारखे मराठी भाषिक संस्थानिक आघाडीवर असले तरी उत्तरेत जसा बंडाचा वणवा पेटला होता तसा महाराष्ट्रासह दक्षिणेत पेटला नाही. समाजाचा मुख्य प्रवाह या बंडापासून काहीसा अलिप्तच राहिला. परिणामी हे काहीसे विस्कळीत असणारे बंड उलथवून टाकणे इंग्रजांना शक्य झाले.

## समाजकारण व राजकारण

१८५७ च्या बंडाचा एक अतिशय दूरगामी ठरणारा महत्त्वाचा परिणाम म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार बरखास्त होऊन देशावर इंग्रजांची अनिर्बंध सत्ता सुरू झाली. १८५७ मध्ये एकीकडे बंडाची धामधूम होत असताना दुसरीकडे याचवर्षी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. ही स्थापना म्हणजे इंग्रजांनी राबवलेल्या शैक्षणिक धोरणाचे फलित होते. यापूर्वी मुंबई शहरात काही मिशनऱ्यांनी काढलेल्या तर काही 'द बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी' व 'स्टुडंट्स लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी' या संस्थांतर्गत एतद्देशीयांनी काढलेल्या शाळा होत्या. मुंबई इलाख्याचे पहिले गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (१९१९-२७) यांच्या नावाने विद्यालय व संपूर्ण महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय मुंबई येथे सुरू करण्यात आले होते.

सामाजिक परिवर्तनाकडेही वाटचाल सुरू होती. यात जोतिबा फुलेंचा सत्यशोधक समाज, बंगालमधील ब्राम्हो समाजाचा मोठा पगडा असणारा प्रार्थना समाज, परमहंस मंडळी यांसारख्या संस्था उदयास येऊन समाज व धर्म सुधारणेचे काम सुरू होतेच. यामुळे झालेल्या वैचारिक क्रांतीची आता राजकारणाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली होती. हळूहळू समाजकारणाबरोबरच राजकारणही समाजाच्या नवीन बदललेल्या जाणिवेचा भाग बनले. यादरम्यान समाजकारणाबरोबरच राजकीय विचार करणाऱ्या संस्था उदयास येऊ लागल्या. यामध्ये बॉम्बे असोसिएशन (२६ ऑगस्ट १८५२), ईस्ट इंडिया असोसिएशन (१० डिसेंबर १८६६), सार्वजनिक सभा (०२ एप्रिल १८७०), यांसारख्या संस्था समाजाच्या विविध हक्कांसाठी स्थानिक पातळ्यांवर निर्माण झाल्या. देशभरातही कलकत्त्याची 'इंडियन असोसिएशन' किंवा मद्रासची 'महाजन सभा' अशा संस्था कार्यरत होत्या. तथापि स्वतंत्रपणे कार्य करणाऱ्या या संस्थांना राष्ट्रीय पातळीवरील संघटनात्मक स्वरूप नव्हते. कालांतराने या संस्थात्मक वाटचालीची सुरुवात लन ह्युम यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या राष्ट्रीय सभेच्या म्हणजेच ऑल इंडिया काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत झाली. या राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे पार पडले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेने देशाच्या तत्कालीन राजकीय जीवनातील एक मोठी उणीव भरून काढली. काँग्रेसच्या स्थापनेमुळे भारताच्या चळवळीची लहान, सौम्य आणि काहीशी अनिश्चित पण संघटित सुरुवात झाली व कालांतराने तिचा जोर वाढून परकीय सत्तेला हद्दपार करण्यासाठी सर्वसमावेशक अशी तिची व्याप्ती झाली. मूलतः सरकार दरबारी जनतेची गाऱ्हाणी सनदशीर मार्गाने मांडण्यासाठी काँग्रेसची स्थापना करण्यात आल्यामुळे सुरुवातीला




काँग्रेसचे धोरण मवाळ होते. राष्ट्रीय काँग्रेसला महाराष्ट्रात प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, न्या. म. गो. रानडे, नामदार गोखले, गो.ग.आगरकर, रा.गो. भांडारकर व टिळकवादी नेत्यांचे बौद्धिक नेतृत्व लाभले. या काळातच त्यांच्या प्रेरक लेखणीमुळे नवीन ध्येयवादी पिढी राष्ट्रीय कार्याकडे आकर्षिली गेली.

तर मवाळगटाचे नेतृत्व फिरोझशहा मेहता, दादाभाई नौरोजी, गोपाळकृष्ण गोखले यांसारख्या नेत्यांकडे होते. गोपाळकृष्ण गोखले हे महाराष्ट्रातील पहिल्या फळीतील नेते, ज्यांनी पूर्ण वेळ राजकारणासाठी देऊन लोकांना जीवन समर्पित केले.

जरी मवाळ गटाने लोकांना राजकीयदृष्ट्या शिक्षित केले व लोकशाही आणि नागरी स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले तरी त्यांच्या उच्चभ्रूपणामुळे खऱ्या अर्थाने सामान्य माणसाच्या जीवनाला ते स्पर्श करून शकले नाहीत. त्यामुळे नव्याने येऊ घातलेली काहिशी आक्रमक असलेली तरुण पिढी तडफदार व क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या बाळ गंगाधर टिळकांकडे आकर्षित झाली. लोकमान्य टिळकांच्या झंझावती व्यक्तिमत्त्वाने २०व्या शतकाच्या सुरुवातीला भारताच्या, पर्यायाने महाराष्ट्राच्या राजकारणाचा चेहरामोहराच बदलला.

आतापर्यंत मवाळ असलेले महाराष्ट्राचे राजकारण आता जहाल होऊ लागले. साधारणपणे २०व्या शतकाची सुरुवात ते टिळकांचे निधन होईपर्यंत म्हणजे १९२० पर्यंतचा काळ हा टिळकयुग म्हणून ओळखला जातो. 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांतील जहाल लेखनामुळे त्यांचे विचार महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यांत पोहोचले. सन १९०५ मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनने बंगाल इलाख्याची फाळणी केली. या फाळणीला केलेल्या आक्रमक विरोधामुळे लोकमान्य टिळक केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर देशभरातही लोकप्रिय झाले. या काळात ठिकठिकाणी जाहीर सभा घेऊन लोकमान्य टिळकांनी स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा पुरस्कार केला.

सुरुवातीच्या काँग्रेसच्या मुळमुळीत धोरणावर लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल व लाला लजपतराय यांनी कडाडून टीका केली. याची परिणीती १९०७च्या सूरत येथील काँग्रेसच्या अधिवेशनात फूट पडण्यात झाली. लोकांनी संघटित व्हावे व विचारांचे आदानप्रदान होऊन क्रांतीची बीजे पडावी, यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती साजरी करण्यास सुरुवात केली. त्यांच्या सरकारविरोधी कारवायांमुळे त्यांना प्रथम १८ महिने व नंतर सहा वर्षे तुरुंगवास सहन करावा लागला. ब्रिटिश सरकारविरोधी सुरू असलेल्या कारवायांमुळे त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला व गुन्हेगार ठरवून त्यांची रवानगी ब्रम्हदेश (सध्याचे म्यानमार) येथील मंडाले येथे करण्यात आली. तुरुंगात लोकमान्य टिळकांनी १९१४ मध्ये 'गीतारहस्य' ही

भगवद्गीतेवरील टीका लिहिली. त्यांनी मुंबई व महाराष्ट्रात 'होमरूल लीग'ची चळवळ लोकप्रिय केली. 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळवणारच' अशी गर्जना करणारा आणि 'भारतीय असंतोषाचे जनक' हे बिरुद मिरवणारा हा भारताचा सुपुत्र १ ऑगस्ट १९२० रोजी अनंतात विलीन झाला.

## क्रांतिकारी चळवळ

२०व्या शतकापासून महाराष्ट्राच्या राजकारणात मवाळ व जहाल गटाबरोबरच आणखी एक समांतरपणे कार्यरत असलेला गट म्हणजे क्रांतिकारकांचा. जहाल मतवाद्यांप्रमाणे क्रांतिकारकांचीही 'स्वराज्य' या संकल्पनेवर निष्ठा होती. तथापि त्यांचे मार्ग व उद्दिष्ट्य अधिक आक्रमक होते. इंग्रजी शिक्षणाने सुजाण झालेला नवीन मध्यमवर्ग जनतेवरील होणाऱ्या अन्यायामुळे असंतुष्ट होता. वाढती बेरोजगारी, सातत्याने येणारे दुष्काळ, भारतीय वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट, भारतीयांना शस्त्रबंदी करणारा आर्म्स ॲक्ट या सर्व कारणांमुळे हा असंतोष वाढतच गेला. त्यातून तरुण क्रांतिकारकांचा वर्ग जन्माला आला, जो इंग्रजी दडपशाहीचे उत्तर क्रांतिकारी मार्गाने देऊ पाहात होता. राजकीय चळवळी दडपून टाकून लोकनेत्यांना तुरुंगात टाकण्याची सरकारी मोहीम सुरू होती. त्या पार्श्वभूमीवर भूमिगत राहून क्रांतिकार्यात सहभागी होणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारक आघाडीवर होते.



क्रांतिकारकांच्या पहिल्या फळीत होते भारताचे आद्यक्रांतिकारक महाराष्ट्राचे सुपूत्र वासुदेव बळवंत फडके. १८५७ च्या बंडानंतर सुमारे २५ वर्ष महाराष्ट्रात शांतता होती. तथापि या २० वर्षांत घडलेल्या काही घडामोडींमुळे जसे की, १८७५चे दख्खनमधील दंगे, १८७६-७७ सालचा भीषण दुष्काळ, गव्हर्नर लिटनचे दडपशाहीचे धोरण यामुळे तरुण माणसे बंडास प्रवृत्त झाली. त्यातीलच एक म्हणजे वासुदेव बळवंत फडके, छत्रपती शिवाजी महाराजांसारखे लोकोत्तर कार्य करण्याच्या कल्पनेने झपाटलेल्या फडक्यांनी १८७९ मध्ये ब्राह्मण, रामोशी, कोळी, मांग, महार, मुसलमान अशा अठरापगड सहकाऱ्यांच्या मदतीने पुण्याच्या परिसरात दरोडे घालण्यास सुरुवात केली व इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. तथापि जुलै १८७९ मध्ये ते पकडले गेले व पुढे येमेन देशातील एडन येथे काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना मृत्यू पावले. पुढे देशातील क्रांतिकारी चळवळीचे ते स्फूर्तिस्थान बनले.

महाराष्ट्रात २०व्या शतकाच्या शेवटी प्लेगने पुणे व आजुबाजूच्या परिसरात थैमान घातले होते. या रोगाने हजारो लोक मृत्युमुखी पडले. त्यामुळे सरकारने प्लेग रिलिफ कमिटी नेमली. या कमिटीचा प्रमुख डब्ल्यू. सी. रॅंड होता. रॅंड प्लेगने त्रस्त जनतेशी निर्दयीपणे व उर्मटपणे वागत असे. अल्पावधीतच लोकांमध्ये त्याच्याबद्दल द्वेष वाढीस लागला. त्यामुळे आधीच क्रांतिकारक चळवळींमध्ये अग्रेसर असणाऱ्या दामोदर व बाळकृष्ण या चाफेकर बंधूंनी रॅंड व ले.सी.ई.अयेर्स्ट यांना गोळ्या घातल्या. पुढे त्यांच्या खटल्यादरम्यान त्यांचा तिसरा भाऊ वासुदेव व त्याचा मित्र रानडे यांनी माफीचा साक्षीदार असलेल्या रामचंद्र व गणेश यांची हत्या केली. शेवटी चाफेकर बंधू व रानडे यांना अटक होऊन फाशीची शिक्षा झाली. चाफेकर बंधूंच्या बलिदानामुळे तसेच लोकमान्य टिळकांनी चालवलेल्या चळवळींमुळे प्रभावित झालेल्या शाळकरी विद्यार्थ्यांनी व तरुणांनी १८९९ ते १९०९ या दशकात ठिकठिकाणी गुप्त संघटना सुरू केल्या. त्यापैकी सर्वात महत्त्वाची म्हणजे नाशिकच्या सावरकर बंधूंची अभिनव भारत ही संघटना. गणेश ऊर्फ बाबा सावरकर व विनायक उर्फ तात्या सावरकरांच्या या गुप्त संघटनेचे अल्पावधीतच महाराष्ट्रात जाळे पसरले. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ शिगेला पोहोचली, ज्याचे पर्यवसन नाशिक येथे अनंत लक्ष्मण कान्हेरेने केलेल्या जॅक्सन याच्या खुनात झाले. कान्हेरेंना पकडून फाशी झालीच पण या गुन्ह्यामध्ये विनायक सावरकरांना पकडले गेले. बोटीच्या प्रवासात फ्रान्सजवळील मार्सेलिस बंदरातून पळून जाण्याचा त्यांनी अयशस्वी प्रयत्न केला. त्यानंतर पोर्ट ब्लेअर येथे त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. या थोर क्रांतिकारकाचा १९६६ मध्ये स्वतंत्र भारतात मृत्यू झाला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ओजस्वी साहित्याने प्रभावित होऊन अनेकजण पुढील काळात स्वातंत्र्य चळवळीत ओढले गेले. त्यांचे मोठे बंधू गणेश सावरकर यांनाही जन्मठेपेची शिक्षा सुनावून त्यांचा तुरुंगात अमानुष छळ केला गेला. याशिवाय क्रांतिकारकांमध्ये सेनापती बापटांनी पॅरिसला जाऊन बॉम्ब तयार करण्याची विद्या अवगत केली होती.

शक्य तितकी गुप्तता राखणे ही गुप्तहेर संघटनांची गरज असल्यामुळे प्रत्यक्ष कार्यरत असणारे त्यांचे सभासद व त्या कार्याबद्दल सहानुभूती असणारे व त्यांना मदत करणारे लोक यांची माहिती दुर्दैवाने उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात ते अज्ञात नायकांप्रमाणे वावरतात. जे थोडे इतिहासाला ज्ञात होतात ते य. दी. फडके यांनी म्हटल्याप्रमाणे, ते सारे घनदाट काळोखाने भरलेल्या एखाद्या गुहेत पडलेले प्रकाशाचे कवडसे असतात. असा हा समग्र क्रांतिकारी इतिहास या ग्रंथाद्वारे उलगडत असताना अगदी नतमस्तक होऊन या हुतात्म्यांना विनम्रपणे अभिवादन करणे हेच आपले परम कर्तव्य आहे, याची मनोमन जाणीव होते.

ग्रंथाच्या शेवटी तत्कालीन वृत्तपत्राच्या बातम्यांची कात्रणे, गृह विभागाची, शासनाची गोपनीय पत्रे जशीच्या तशी पुराभिलेख संचालनालयाच्या सहकार्याने देण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील हुतात्मा स्मारके यांची यादी व आनुषंगिक शासन निर्णय यांचाही परिचय स्वातंत्र्य सैनिक कक्ष, मंत्रालय यांच्या सहकार्याने या ग्रंथात करून दिला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाकडून संरक्षित हुतात्मा स्मारके व राबवण्यात येणाऱ्या योजना यांचा अंतर्भाव करून 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या ग्रंथाला परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**(लेखक दर्शनिका विभागाचे सचिव तथा कार्यकारी संपादक आहेत.)**

**‘चरखा चला चला के, लेंगे स्वराज्य लेंगे’ यासारखी देशभक्तीपर गीते संपूर्ण देशभर ऐकू येत होती. इंग्रजांचे राज्य संपवून देश स्वातंत्र्य करण्यासाठी पुरूष, स्त्रिया, अबालवृद्ध सर्वच पुढे सरसावले होते. १९४७ चा तो काळ आणि आज आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असल्याचे औचित्य साधून दर्शनिका विभागाकडून प्रकाशित ‘स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्य’ या मालिकेतून स्वातंत्र्य चळवळीच्या विविध मोहिमांमध्ये सक्रिय असलेल्या ज्ञात-अज्ञात महिलांच्या कार्याचा आढावा...**

# स्वातंत्र्यलढा आणि महिला

**सायली पिंपळे**

स्वातंत्र्याच्या आंदोलनात पुरुष, स्त्रिया यांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण होता. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये महिलांचे योगदान उल्लेखनीय आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या विविध मोहिमांमध्ये ज्ञात-अज्ञात महिला सक्रिय होत्या.

## खानदेशी महिला स्वातंत्र्यसेनानी

१८५७ चे बंड म्हणजेच स्वातंत्र्यासाठी झालेला पहिला उठाव असे मानण्यात येते. उत्तरेतील १८५७ च्या बंडाची खबर मिळताच खानदेशातील भिल्ल जमातीतील लोकांनी काझीसिंग, भगोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरूद्ध बंड पुकारला. इंग्रजांनी जरी या बंडाचा बीमोड केला असला तरी भिल्लांनी दिलेला लढा उल्लेखनीय आहे. या दरम्यान झालेल्या अंबापाणीच्या लढाईत भिल्ल पुरुषांइतकाच त्यांच्या स्त्रियांपासूनदेखील सरकारला राज्य करण्यासाठी धोका आहे, हे ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या लक्षात आले. त्यांच्या स्त्रिया गोपनीय माहिती पुरुषांपर्यंत पोहोचवतात, त्यांच्यासाठी स्वयंपाक करतात व लढ्यातही सहभागी होतात, या कारणास्तव जवळपास ४६० महिला व लहान मुले यांना अटक करण्यात आली होती. यात काजीसिंग, मोवासिया नाईक आणि करीचा भाऊ रावळ यांच्या पत्नी प्रमुख होत्या. त्यांच्या पतींना अटक होईपर्यंत या स्त्रियांना ओलीस ठेवण्यात आल्याचे नोंदींवरून स्पष्ट होते.



## चळवळीत महिलांचा सक्रिय सहभाग

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून काँग्रेसच्या विविध उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग दिसून येतो. १८८९ च्या मुंबइतील काँग्रेस अधिवेशनात पं. रमाबाई व अन्य दहा महिला उपस्थित होत्या. पुढे ही संख्या वाढत गेली, हे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. गांधी युगापासून तर स्वातंत्र्य चळवळ ही फक्त सुशिक्षितांची न राहता सर्वसामान्य जनसमुदायाची चळवळ बनली. याशिवाय राष्ट्रसेवा दल, राष्ट्रीय स्त्री सभा, देश सेविका संघ यासारख्या संघटनांनी समाजात विशेषतः महिलावर्गात जागरूकता निर्माण करण्याचे बहुमोल कार्य केले. या संघांतर्फे सातत्याने बैठकींचे आयोजन केले जात असे. त्यात वक्त्यांची भाषणे होत, वृत्तपत्रांचे जाहीर वाचन करून त्यातील विषयांवर चर्चा केली जायची. सूतकताईचे प्रशिक्षण यासारखे सर्वसमावेशक कार्यक्रम आयोजित केले जात. साबरमती आश्रमात महिलांनी केलेली सूतकताई व विविध कार्यांची माहिती गांधीजींना नियमितपणे पत्रांद्वारे कळवली जात असे. यात आनंदी, मंगला, दुर्गा, पद्मावती, पुष्पा, शांता, लतिका, मनू, दुधीबहन, गंगाबहन यांच्या कार्याचा उल्लेख आढळतो.

## निदर्शनांमध्येही पुढाकार

दारूच्या दुकानांसमोर निदर्शने करणे, परदेशी मालाची होळी करणे हा तर सत्याग्रहींचा नित्यक्रम होता. मग त्यासाठी अटक झाली, तर जामीन न भरता सुनावलेली शिक्षा पूर्ण करून सुटका झाल्यानंतरही परत देशसेवा कार्यासाठी सज्ज होत. निदर्शन करणाऱ्या एका तुकडीस पोलिसांनी अटक केल्यास दुसरी तुकडी ती पोकळी भरून काढायची. असे हे कार्य स्त्रियांनी अविरतपणे सुरू ठेवून प्रशासनास जेरीस आणले. यासाठी त्यांना पोलीस अत्याचारही सहन करावा लागला आहे.

२६ ऑक्टोबर १९३० रोजी आझाद मैदान, मुंबई येथे बैठकीसाठी उपस्थित महिलांवर मुंबई पोलिसांनी केलेल्या अमानुष

## दर्शनिका विभाग

दर्शनिका विभाग (गॅझेटिअर डिपार्टमेंट) हे एक स्वतंत्र संचालनालय असून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. एक भौगोलिक कोश या प्रारंभिक संकल्पनेपासून ब्रिटिशांनी आपल्या अधिकाऱ्यांना प्रशासनासाठी एतद्देशीयांची माहिती पुरवणारा एक उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअरची निर्मिती केली. आज समाजाभिमुख शासनाच्या दृष्टीने विविध क्षेत्रातील विकास विषयक संकल्पनांचा आराखडा मांडताना साहाय्यभूत ठरणारा उपयुक्त ग्रंथ म्हणून गॅझेटिअर सर्वमान्य होत आहे. या विभागाकडून प्रकाशित होणाऱ्या मालिकांमध्ये जिल्हा व राज्य गॅझेटिअर यांची इंग्रजी व मराठी आवृत्ती, ब्रिटिशकालीन गॅझेटिअरचे पुनर्मुद्रित ग्रंथ, जिल्हा पुरवणी गॅझेटिअर, 'स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश' याशिवाय 'सोर्स मटेरिअल फॉर हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट' यांचा अंतर्भाव आहे.

## अधिकृत आणि उपयुक्त

'सोर्स मटेरिअल फॉर हिस्ट्री ऑफ फ्रिडम मुव्हमेंट' म्हणजेच 'स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्य' या मालिकेतून आधारसाहित्याचे प्रकाशन करण्यात येते. यात गृह विभागाचे गोपनीय अहवाल, शासकीय अभिलेखागारातील अभिलेख, जुन्या वृत्तपत्रांमधील उतारे यांचा समावेश करण्यात येतो. या आधारसाहित्यांच्या प्रकाशनामुळे गोपनीय शासकीय कागदपत्रांमधील अधिकृत माहिती इतिहास अभ्यासकांसमोर आली आहे. त्यामुळे इतिहास संशोधकांना ही माहिती उपयुक्त ठरते.

लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ २७ ऑक्टोबर रोजी माधवबाग येथे निदर्शने करण्यात आली व हा रविवार 'ब्लॅक संडे' म्हणून जाहीर करण्यात आला. या बैठकीसाठी हजारोंच्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होता. याबाबतचे सविस्तर वृत्त 'बॉम्बे क्रोनिकल' या नियतकालिकेत ४ नोव्हेंबर १९३० च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले आहे. येथे लेडी जगमोहनदास, लेडी सेतलवाद, लेडी पुरषोत्तमदास ठाकूरदास, डॉ. दोसीबाई दादाभाई, क्षमा राव, श्रीमती लुकमानी, श्रीमती सयानी, वालचंद हिराचंद, श्रीमती देशमुख, हिराबाई गिल्डर, हिरालाल कनैया, लीलावती बनकर, धरमसे ठक्कर, खाडीजा वासी, कु. मनीबेन कारा, शिरीन मुस्काटी, टि. एम. काजीजी, टेहमिना जोशी, मोतीबेन माधवी, डॉ. मालतीबाई सुखटनकर व इतर उपस्थित होत्या.





जिल्हा खादी प्रसारक मंडळ, भुलेश्वर यांच्या वतीने १९ नोव्हेंबर १९३० रोजी सार्वजनिक सभेचे केशव बाग येथे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जमलेल्या ३००च्या जनसमुदायामध्ये ५० स्त्रियांचा समावेश होता.

स्वातंत्र्य संग्रामातील सविनय कायदेभंग चळवळीत गिरणी कामगार युनियननेदेखील सहभाग नोंदवला. ११ जुलै १९३० रोजीच्या बैठकीत उषा डांगे व कमलाबाई प्रभू यांनी काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये मिल मजदुरांना अहिंसक मार्गाने भाग घेण्याबाबत विनंती केली होती.

२४ फेब्रुवारी १९४३ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया वृत्तपत्रात मुस्लीम समाजातील स्त्रियांनी महात्मा गांधींच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त करणारी बातमी प्रकाशित झाली होती. ब्लेवातस्की लॉज, मुंबई येथे श्रीमती लुकमानी यांच्या अध्यक्षतेखाली गांधीजींच्या सुटकेसाठी व्हॉइसरॉयकडे विनंती अर्ज देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये अस्मत लतीफ, मॅडम सोफिया, श्रीमती ब्रेल्वी, डॉ. गिल्डर, ए. एस. आर. चारी, जबीर अली, बाबीबाई मुलजी, कु. लाइक अली आणि लीलावती बनकर यांचा समावेश होता.

## मुंबई परिसरातील स्वातंत्र्यलढा

मुंबई परिसरातील स्वातंत्र्यलढ्यातील महिलांच्या कार्याची नोंद 'मुंबई इलाख्यातील स्वातंत्र्यलढा' या लेखात घेण्यात आली. या लेखात उल्लेख केलेल्या महिलांचा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या योगदानामुळे आज आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. दर्शनिका विभागाकडून 'स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्य' या मालिकेत १३ खंडांचे प्रकाशन करण्यात आले असून हे सर्व ग्रंथ ई-बुक स्वरूपातही उपलब्ध आहेत. तसेच विभागाची सर्व प्रकाशने https://gazetteers.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पाहता येतील. केंद्र शासनाच्या इंडियन कल्चर पोर्टलवरही ही सुविधा देण्यात आली आहे. याशिवाय आजच्या स्मार्ट फोनच्या युगात स्वातंत्र्य आंदोलन इतिहास आधारसाहित्याच्या मोबाईल ॲपचे लवकरच लोकार्पण करण्यात येणार आहे.

**(लेखिका या दर्शनिका विभाग येथे सहसंपादक आहेत.)**

**भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्य निर्मितीची चळवळ महाराष्ट्रात व देशभर झाली. भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही बॉम्बे स्टेटमधून स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली हे आपण जाणतो. त्यातून महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मंगलकलश घेऊन दिवंगत यशवंराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे नवे राज्य उदयाला आले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त १९६० ते २०२२ पर्यंतच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा आणि घवघवीत यशदायी अशा ६२ वर्षांच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.**

# महाराष्ट्राची उत्तुंग झेप

**प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची फलनिष्पत्ती म्हणून व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या केंद्र सरकारकडील कुशल व सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मराठी भाषकांचे, मराठी संस्कृतीचे व परंपरेचे महाराष्ट्र राज्य नवी स्वप्ने व नवी ध्येये घेऊन मराठी मातीत अवतरले. तीन लाख आठ हजार चौरस किलोमीटर्सचे भौगोलिक क्षेत्र व ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा असणारे हे महाराष्ट्र खरोखरीच महा असलेले राष्ट्रघटक बनले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या लढाऊ बाण्याने हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी समर्पणवृत्तीने सर्वोच्च बलिदान करायलाही पुढेमागे पाहिले नाही. महाराष्ट्र भूमी ही देशभक्तांची आणि समाजसेवकांची भूमी आहे. देशाला स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे छत्रपती शिवाजी महाराज, दादाभाई नौरोजी, महाराज सयाजीराव गायकवाड, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, न्या. रानडे, नामदार गोखले, महात्मा फुले, आगरकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, जेधे-जवळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतीसिंह नाना पाटील, सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि. रा. शिंदे, भाई माधवराव बागल, स्वामी रामानंद तीर्थ, एसेम जोशी, भाई उद्धवराव पाटील, बापूसाहेब लाड, गोविंदभाई श्रॉफ, हुतात्मा चाफेकर, राजगुरू या व अशा अनेक नामवंतांनी महाराष्ट्राला नव्हे, तर सर्व देशातील देशभक्तांना प्रेरणा दिली. थोडक्यात महाराष्ट्र राज्यातील अनेक



नररत्ने ही भारताच्या राजकीय व सामाजिक स्वातंत्र्यलढ्यात अग्रणी राहिली आणि देशातील लाखो नागरिकांना आदर्शवत ठरली. ब्रिटिशांची राजवट येण्याआधी या परकीय सत्तेविरूद्ध शेवटपर्यंत लढा महाराष्ट्राने व देशभरातील मराठा राजवटींनी दिला, हा इतिहास कसा विसरता येईल?

१९६० साली महाराष्ट्राचे थोर व देशभक्त नेते आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेले विचार येथे मांडावे वाटतात, 'महाराष्ट्राचे हे जे राज्य निर्माण झाले आहे ते मराठी जनतेच्या कल्याणाचे काम करीलच, परंतु मराठी भाषकांच्या जवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदात्त आहे, त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू. कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल. भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते, तेव्हा भारतही मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो, हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तातून भिनलेला आहे.' (यशवंतराव चव्हाण : महाराष्ट्र राज्य उद्घाटन समारंभ : १ मे १९६०) महाराष्ट्राने गेल्या ६२ वर्षांत वा सुमारे सात दशकात आजवर स्वत:चा सक्षमतेने विकास साधत साधत भारत देशालाही सबळ करण्याचे काम केले आहे. ही नक्कीच अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे.

### १९६० चा महाराष्ट्र : कसा व कुठे होता?

महाराष्ट्राची साक्षरता ही १९६० मध्ये अवघी ३५% होती व त्यातही प्रादेशिक असमतोल कमालीचा होता. मुंबई विभागात साक्षरता ३७.८%, तर पुणे विभागात ती २९.३% आणि मागासलेल्या विदर्भात २७.९% व अतिमागासलेल्या मराठवाड्यात अवघी १६.३% होती. त्यातही मराठवाड्यातील महिलांची साक्षरता धक्कादायक अशी म्हणजे ५.८% एवढी होती. थोडक्यात ७५ ते ९५% नागरिक-महिला निरक्षरतेच्या अंधारात खितपत पडलेल्या होत्या. याच मराठी भाषक मराठवाडा प्रदेशात १९५१ साली साक्षरता ही ८.९३% होती आणि महिलांची साक्षरता ही अत्यल्प म्हणजे २.२६% होती, यावर आज विश्वास बसत नाही.

उद्योगांचा विचार करता नवस्थापित महाराष्ट्र राज्यात एकूण उद्योग हे अवघे १६० होते, त्यातही विदर्भ-मराठवाडा सोडून उर्वरित महाराष्ट्रात ९०, विदर्भात ६०, तर मराठवाडा प्रदेशात १० उद्योग उभे राहिलेले होते. कापड उद्योगाबाबत (टेक्सटाईल इंडस्ट्री) पाहिले, तर महाराष्ट्रात एकूण १०१ मिल्स होत्या. कापूस पिकवणाऱ्या विदर्भात ८, तर मराठवाड्यात फक्त २ टेक्सटाईल मिल्स होत्या. व्यापारउदीम हा मुंबईतच अस्तित्वात होता, तेही हे शहर एक बंदर असल्याने. अशा अज्ञानाच्या अंधकारात असणारा व प्रादेशिक आणि सामाजिक-आर्थिक विषमतेच्या अशा महाराष्ट्र राज्याला नव्या आधुनिक, उद्योगप्रवण, कृषी-सहकार केंद्रित, ज्ञानविज्ञान केंद्रित राज्यात रूपांतरित करण्याचे आव्हान दूरदृष्टीच्या महाराष्ट्राच्या समर्थ नेत्यांनी व आजवरच्या मुख्यमंत्री महोदयांनी स्वीकारले. देशातील अव्वल क्रमांकाचे राज्य म्हणून गतिमान प्रगती झपाटलेपणाने आणि झपाट्याने करून अक्षरश: घडवले, हे कुणीही नाकारू शकत नाही. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बॅ. ए. आर. अंतुले, शरद पवार, बाबासाहेब भोसले, शिवाजीराव पाटील-निलंगेकर, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस व उद्धव ठाकरे यांचे योगदान आपापल्यापरिने राहिलेले आहे. महाराष्ट्राचे नवनियुक्त वर्तमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही राज्याला आपल्या क्षमतेने नव्या प्रगतिपथावर घेऊन जातील, अशी आशा व खात्री आहे. महाराष्ट्र आज देशातील एक संपन्नता, सुबत्ता असणारे आघाडीचे प्रगत राज्य झाले आहे. गेल्या सात दशकातील सर्व नागरिक, नेते, उद्योगपती, व्यावसायिक, युवक, शेतकरी, मजूर, सर्व राजकीय पक्षांचे समंजस कार्यकर्ते, संशोधक, युवक, खेळाडू, प्राध्यापक, शिक्षक व स्वयंसेवी संस्था-सहकारी संस्थांचे जाळे यांच्या अथक प्रयत्नांनी व सर्व घटकांना सामावून घेण्याच्या महाराष्ट्रीय वृत्तीने व महाराष्ट्र संस्कृतीने झाले आहे. जिथे शांतता नांदते, तिथेच सुबत्ता येते. जिथे सर्वांना सामावून



# समर्थ महाराष्ट्राचे समर्थ नेतृत्व

**मुख्यमंत्री**
**१९६० - २०२२**



**यशवंतराव चव्हाण**
१ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२



**मारोतराव कन्नमवार**
२१ नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३



**वसंतराव नाईक**
५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५



**शंकरराव चव्हाण**
२१ फेब्रुवारी १९७५ ते १६ एप्रिल १९७७
१४ मार्च १९८६ ते २४ जून १९८८



**वसंतदादा पाटील**
१७ एप्रिल १९७७ ते ६ मार्च १९७८
७ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८
२ फेब्रुवारी १९८३ ते ९ मार्च १९८५
१० मार्च १९८५ ते १ जून १९८५



**शरद पवार**
१८ जुलै १९७८ ते १७ फेब्रुवारी १९८०
२५ जून १९८८ ते ३ मार्च १९९०
४ मार्च १९९० ते २५ जून १९९१
६ मार्च १९९३ ते १३ मार्च १९९५




**बॅ. ए. आर. अंतुले**
९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२



**बाबासाहेब भोसले**
२० जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३



**शिवाजीराव पाटील-निलंगेकर**
३ जून १९८५ ते ७ मार्च १९८६



**सुधाकरराव नाईक**
२५ जून १९९१ ते २३ फेब्रुवारी १९९३



**मनोहर जोशी**
१४ मार्च १९९५ ते ३० जानेवारी १९९९



**नारायण राणे**
१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९



**विलासराव देशमुख**
१८ ऑक्टोबर १९९९ ते १८ जानेवारी २००३
१ नोव्हेंबर २००४ ते ७ डिसेंबर २००८



**सुशीलकुमार शिंदे**
१८ जानेवारी २००३ ते
३१ ऑक्टोबर २००४



**अशोक चव्हाण**
८ डिसेंबर २००८ ते ८ नोव्हेंबर २००९
९ नोव्हेंबर २००९ ते १० नोव्हेंबर २०१०



**पृथ्वीराज चव्हाण**
११ नोव्हेंबर २०१० ते २७ सप्टेंबर २०१४



**देवेंद्र फडणवीस**
३१ ऑक्टो. २०१४ ते ८ नोव्हें. २०१९
२३ नोव्हें. २०१९ ते २६ नोव्हें. २०१९



**उद्धव ठाकरे**
२८ नोव्हेंबर २०१९ ते २९ जून २०२२



**एकनाथ शिंदे**
३० जून २०२२ ते आजतागायत

(संदर्भ : http://mls.org.in)

घेणारी समावेशकवृत्ती असते, तेथे चौफेर विकासाचा वटवृक्ष बहरतो; हे महाराष्ट्र राज्याने सिद्ध केले आहे. कोणत्याही महाराष्ट्रीय माणसाचा ऊर भरून यावा, अशी ही गौरवगाथा आहे.

## गौरवास्पद गरूडझेप

मुंबई गेल्या सात दशकात नुसतेच विस्तारलेच नाही; तर भारताची आर्थिक राजधानी झाले. मुंबई हे भारतीय व जागतिक उद्योगसमुहांचे कॉर्पोरेट कॅपिटलही झाले. चित्रपट, संगीत व कला उद्योगाचे मुंबई केंद्र झाले आहे. महाराष्ट्र सरकारने फिल्मसिटी उभी करून चित्रपटसृष्टीला नवी बळकटी व सोयीसवलती दिल्या आहेत. सर्जनशीलतेचे तसेच मनोरंजन व माध्यम उद्योगाचे मुंबई व महाराष्ट्र महाकेंद्र बनले आहे हे कोणी नाकारू शकेल काय?

महाराष्ट्रात औद्योगिकीकरण हे केवळ मुंबईत वेगाने झाले असे नाही, तर ते पुणे-पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, जळगाव, कोकण या सर्वदूर महाराष्ट्रात उद्योगांचे जाळे उभे राहिले. रोजगार निर्मिती झाली व व्यापारउदीम-सेवा क्षेत्र विस्तारले. पर्यटन उद्योगानेही लक्षणीय गती घेतली आहे.

तालिका क्र.१

**महाराष्ट्र व प्रमुख राज्यातील कारखाने–उद्योग : तुलनात्मक चित्र**

| राज्य | कारखान्यांची संख्या |
|---|---|
| तामीळनाडू | ३७,८७८ |
| महाराष्ट्र | २८,६०१ |
| गुजरात | २३,४३३ |
| उत्तर प्रदेश | १४,८६७ |
| तेलंगना | १४,४२७ |
| कर्नाटक | १२,५६६ |
| पंजाब | १२,४१३ |
| प.बंगाल | ९,११२ |
| राजस्थान | ८,९८६ |
| मध्यप्रदेश | ४,२४० |
| बिहार | ३,५२९ |

(आधार – रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया : २०१५–१६)




तालिका क्र. एकवरून हे लक्षात येते की, महाराष्ट्र कारखाने उभ्या करण्यात प्रोत्साहक वातावरण देण्यात प्रमुख राज्यांच्या फारच पुढे आहे. कारखान्यांची संख्या सर्वाधिक तामिळनाडूमध्ये व त्यानंतर महाराष्ट्रातच आहे. उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, आसाम, ओडिशा, प.बंगाल, राजस्थान, कर्नाटक ही राज्ये कितीतरी पिछाडीवर आहेत. महाराष्ट्र उद्योगात अव्वल का आहे, त्याचा हा ठोस पुरावा म्हणता येईल.

साखर कारखान्यांची संख्या पाहिली तरी महाराष्ट्र भारतात पहिलाच आहे. भारतातील एकूण ५३२ साखर कारखान्यांपैकी महाराष्ट्रात १९५ साखर कारखाने आहेत. त्यानंतर उत्तरप्रदेशात ११९ व पंजाबमध्ये १६ आहेत. भारतातील ३५% साखर एकटा महाराष्ट्र निर्माण करतो आणि तो परदेशात निर्यातही करतो आहे. या उद्योगामुळे हजारो शेतकरी, ऊसतोड कामगार, व्यावसायिक यांना उत्पन्न व रोजगार मिळतो. अनेक साखर कारखान्यांनी आपल्या परिसराचा विकास व शैक्षणिक सुविधा दिल्या आहेत हेही विसरता येत नाही, पण अलीकडे काही आजारी साखर कारखान्यांचा व आर्थिक गैरप्रकारांचा प्रश्नही गंभीर झालेला दिसतोय. तरीही साखर कारखाने हे शेतकरी व ग्रामीण विकासाचे माध्यम राहिलेले आहेत व ग्रामीण भागात याशिवाय दुसरी मोठी कारखानदारी नाही हे लक्षात घेणेही आवश्यक आहे.

## देशाचा आर्थिक आधारस्तंभ

महाराष्ट्रातील ही औद्योगिक व वाणिज्यिक गरूडझेप एवढी जबरदस्त आहे की, महाराष्ट्र हा भारत सरकारच्या आर्थिक उत्पन्नाचा महावाटेकरी आहे. एकूण जीएसटी (गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स) या केंद्र सरकारच्या कर उत्पन्नात महाराष्ट्र राज्याचा वाटा हा देशात सर्वाधिक म्हणजे १५% आहे. कोणतेही राज्य महाराष्ट्राएवढे कर उत्पन्न देत नाही. आपणास आश्चर्यचकित व अभिमानास्पद वाटेल अशी बाब म्हणजे केंद्र सरकारला इनकम टॅक्स व कॉर्पोरेट टॅक्स हा थेट कर (डायरेक्ट टॅक्स) सर्वाधिक देणारे राज्य आपले महाराष्ट्रच आहे. एकट्या आपल्या महाराष्ट्र राज्याचा या करातील देशपातळीवरील वाटा हा ३८.३% एवढा घसघशीत आहे. २०१७-१८ साली महाराष्ट्राने एकूण ३ लाख ८४ हजार कोटी रुपयांचा थेट कर (डायरेक्ट टॅक्स) भारत सरकारला दिला आहे व दरवर्षी हा आकडा वाढतोच आहे. साधारणपणे असे म्हणता

येईल की, भारत सरकारचे जवळपास ४०% थेट कर उत्पन्न तुमचा आमचा महाराष्ट्र देते व ही आजच्या काळातील देशभक्ती व देशशक्ती म्हणायला हवी. म्हणजेच आपला महाराष्ट्र हा भारताचा अर्थआधारस्तंभ आहे, असे ठामपणे म्हणू शकतोच की!

## ग्रामीण विकासाचे रोल मॉडेल

भारत देशातील पंचायत राज्यव्यवस्था पहिल्यांदा महाराष्ट्र राज्याने बळकट केलेली आहे. या व्यवस्थेत महाराष्ट्रात महिला आरक्षण ५०% करणारे आणि महिला धोरण देशात पहिल्यांदा राबवले गेलेले आहे. राज्यात १९६०-६१ साली २१,६३६ ग्रामपंचायती होत्या. त्यांची संख्या २०२०-२१ साली २७,८३२ झालेली व जिल्हा परिषदांची संख्या ही १९६० साली २५ होती, ती आता ३४ झाली आहे व पंचायत समित्यांची संख्या ही १९६०च्या २९५ वर्णन २०२०-२१ साली ३५१पर्यंत वाढलेली आहे. नगरपालिका १९६०ला २१९ होत्या त्या २०२०-२१ साली २४१ झाल्या आहेत व त्यात १२८ नव्या नगरपंचायतींची भर पडलेली आहे. विकेंद्रित लोकशाहीची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य करत आहे. महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रात नेहमीच पुढे राहिले आहे. १९६० साली महाराष्ट्रात ३१,५६५ सहकारी सोसायट्या व सदस्य २२ लाख होते हीच संख्या २०२०-२१ या वर्षी २ लाख १७ हजार ३५५ सहकारी सोसायट्या व सदस्य संख्या ही १ कोटी ५१ लाखांवर पोहोचलेली दिसते. यावरून सहकार महाराष्ट्रात खेडोपाडी रुजलेला आहे हे मान्य करावे लागते.

ग्रामीण महाराष्ट्र हा विकासाचा केंद्रबिंदू मानल्याने यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक व त्यानंतरच्या मुख्यमंत्री महोदयांनी व सरकारांनीही प्रोत्साहन देत देशातील सर्वात प्रभावी पंचायतराज व्यवस्था, जिल्हा परिषदा, हजारो सहकारी संस्था, कृषी पतसंस्था, खेडोपाडी सहकारी सोसायट्या, राज्य व जिल्हा सहकारी बँका, ग्रामीण कृषी व बिगरकृषी पतपेढ्यांचे दमदार जाळे निर्माण केले. भारतीय सहकारी चळवळीचे पितामह मानले गेलेले वैकुंठभाई मेहता, काकासाहेब गाडगीळ व विठ्ठलराव विखे-पाटील, वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्यासारख्या कृषिआधारित उद्योगांमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. सहकार व कृषी औद्योगिक धोरणाने महाराष्ट्र देशातील कृषी क्षेत्रातील पंजाबप्रमाणे अव्वल राज्य झाले. पुढे फळबाग योजना, अन्न व फळप्रक्रिया, भाजीपाला व कृषी विद्यापीठांचे आधुनिक संशोधित वाण यामुळे महाराष्ट्र राज्याने देशाला अन्नधान्याचे बाबतीत आत्मनिर्भर करणाऱ्या हरितक्रांतीमध्ये महत्त्वाचे योगदान ७०च्या दशकात शेतकरी वर्गाच्या समर्थ साथीने दिले हे कसे विसरता येईल? पुन्हा त्याला पूरक अशा दुग्धव्यवसायाची जबरदस्त जोड देऊन लाखो शेतकरी, शेतमजूर व महिला यांना रोख उत्पन्नदायी जोडधंदा दिला. पण हे घडावे म्हणून हजारो सहकारी दूध संघांचे जाळे सरकार, सहकार खात्याच्या व ग्रामीण कार्यकर्ते यांच्या उपक्रमशीलतेतून उभे केले गेले. शिवाय कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढीपालन याद्वारे पूरक उत्पन्नाचे मार्ग दिले गेले.



महाराष्ट्रात हजारो महिला बचतगटांच्या स्थापनेतून लाखो ग्रामीण व वंचित महिलांचे सक्षमीकरण केले गेले व त्यांना राज्याच्या अर्थकारणातील सक्रिय घटक केले गेले. महिला बचतगट ही एक सहकारी चळवळ आहे व याची परंपरा असल्यानेच हे घडले आहे. भारतातील महाराष्ट्राप्रमाणे मोजक्या राज्यांनाच महिला बचतगटांच्या विधायक व आर्थिक सबलीकरणात घवघवीत यश आले हे मान्य करावे लागेल. आता तर शेतकरी उत्पादक गट शेती व शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन करून पुन्हा सहकाराच्या मार्गानेच शेतमाल, ज्वारी-बाजरी, तांदूळ, कांदा, द्राक्षे, आंबा, तेल व अन्य फळे, पालेभाज्यांची व फुलांची निर्यात करण्यापर्यंत नव्या पिढीच्या शेतकरी युवकांची मजल गेली आहे. कृषी उत्पादन व प्रक्रिया केलेल्या उत्पादनातही जागतिक बाजारपेठ महाराष्ट्र काबिज करून देशाला परकीय चलन मिळवून देऊन प्रगत शेतकरी राज्याला व शेतकरीवर्गाला पुढे नेताहेत. सहकारी कृषिआधारित उद्योगाचे हे नवे दणकट दालन महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेताना दिसत आहे. मात्र शेती किफायतशीर केली गेली, तरच महाराष्ट्र राज्यातील आत्महत्यांचे महासंकट दूर होऊ शकेल.

## वैभवशाली वाटचाल !

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले तेव्हा महाराष्ट्राची वीज उत्पादन, आरोग्य व शिक्षण अशा प्रमुख क्षेत्रातील स्थिती काय होती. आज महाराष्ट्र कुठे आहे हे अभ्यासणे उद्बोधक ठरते. यावरून महाराष्ट्र राज्याने केलेली वैभवशाली वाटचाल व अभिमानास्पद विकासप्रवास लक्षात येतो.

## गुंतवणुकीत 'महा'योगदान

कोणतेही राज्य देशाला किती बळकट करते हे पाहायचे असेल, तर ते राज्य

तालिका क्र.२

| महाराष्ट्र १९६० व महाराष्ट्र २०२२ : एक आकलन | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्षेत्र** | **१९६०-६१** | **१९८०-८१** | **२०१०-११** | **२०२०-२१** |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ५१,०४५ | ७५,६९५ | १,०६,३३८ |
| माध्यमिक शाळा | २,४६८ | ६,११९ | १५, ३८९ | २८,५०५ |
| रुग्णालये | २९९ | ५३० | १,३६८ | १,४०२ |
| रस्ते (कि.मी.) | ३९,२४१ | १,४१,१३१ | २, १६,९६८ | ३,२०,५३५ |
| सहकारी सोसायटी | ३१,५६५ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,१७,३५५ |
| रेल्वे (कि.मी.) | | ५,०५६ | ५,९८४ | ६२०४ |

(आधार - आर्थिक सर्वेक्षण महाराष्ट्र)

देशाच्या निर्यातीत किती वाटा उचलते व देशाला किती परकीय चलन मिळवून देते आणि त्याद्वारे देशाची अर्थव्यवस्था किती मजबूत करते हे पाहावे लागते. महाराष्ट्र राज्य हे जसे भारताला आयकर व कार्पोरेट कराच्या माध्यमातून जसे खंबीर अर्थबल देते, त्याचप्रकारे महाराष्ट्र निर्यात वा एक्सपोर्टद्वारे देशात दणदणीत वाटा उचलते. देशाच्या एकूण निर्यातीतील महाराष्ट्र राज्याचा वाटा हा घसघशीत २२.७% आहे ही नक्कीच गौरवाची बाब आहे. महाराष्ट्राचे निर्यातीतील २०२०-२१ या वर्षातील सहभाग हा ४ लाख ३१ हजार ६९९ कोटी रुपयांचा (५८.४० बिलियन डॉलर) आहे. भारताच्या नीति आयोगाने एक्सपोर्ट प्रिपेअर्नेस इंडेक्स (ईपीआय) राज्यवार २०२० मध्ये काढला आहे. त्या क्रमवारीत महाराष्ट्र राज्य देशात दुसरे स्थान पटकावू शकला आहे. विदेशातील गुंतवणुकीचा (फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट : एफडीआय) विचार केला तरी महाराष्ट्र राज्य देशात सर्वाधिक परदेशी गुंतवणूक मिळवणारे राज्य राहिलेले आहे. भारतातील एकूण विदेशी गुंतवणुकीतील २८% महावाटा महाराष्ट्राचा आहे. ही परकीय गुंतवणूक आक्टोबर २०१९ ते मार्च २०२१ दरम्यान भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार २३,४३२ दशलक्ष डॉलरवर पोहोचलेली आहे. या काळात कोरोनाचा कालखंड येतोय, तरीही ही गरुडझेप चालूच राहिलेली दिसते आहे. वस्तू व सेवा कर (गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स) मध्ये महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या स्थानावर आहे. पुराव्यासह सांगायचे झाले, तर एप्रिल २०२२ या महिन्यातील भारतातील एकूण जीएसटी कर संकलन हे १ लाख ६७ हजार ५४० कोटी झाले व त्यात एकट्या महाराष्ट्र राज्याचा वाटा देशातील सर्वाधिक म्हणजे २७ हजार ४९५ कोटी राहिलेला आहे व हे प्रमाण देशाच्या एकूण जीएसटीतील १६.४०% एवढे भरते. महाराष्ट्रविना राष्ट्र गाडा न चाले असे उगीच नाही म्हटले जात.

तालिका क्र.३

| वस्तू व सेवा कर (जीएसटी) : महाराष्ट्र देशात अव्वल (एप्रिल २०२२ महिन्याचे) संकलन | | |
|---|---|---|
| **क्रम** | **राज्य** | **जीएसटी वाटा (कोटींमध्ये)** |
| १ | महाराष्ट्र | २७, ४९५ |
| २ | कर्नाटक | ११,८२० |
| ३ | गुजरात | ११, २६४ |
| ४ | उत्तरप्रदेश | ८,५३४ |
| ५ | हरियाणा | ८,१९७ |

(आधार - जीएसटी कौन्सिल, भारत सरकार)

## रोजगार निर्मिती योगदान

महाराष्ट्र राज्य हे कृषिउद्योग केंद्रित राज्य असल्याने व प्रारंभापासून हेच महाराष्ट्र राज्याचे सर्वसमावेशक धोरण राहिलेले आहे आणि महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र सरकारने व राज्यातील प्रयोगशील, समाजशील, उद्योगशील धुरीणांनी मनुष्यबळ निर्मितीसाठी अत्यावश्यक असणारे शिक्षण-उच्चशिक्षण व्यवस्थेचे बळकट असे गुणवत्तेचे जाळे उभे केले आहे. त्याच्या परिणामी महाराष्ट्र राज्य हे गेल्या सात दशकात देशातील चांगल्या आणि गुणवत्तेच्या शिक्षणाचे केंद्र झाले आहे. महाराष्ट्रात दरवर्षी हजारो गुणवान विद्यार्थी महाराष्ट्रात येतात आणि इथल्या गुणवंत विद्यार्थी वर्गाच्या बरोबर येथेच उच्चशिक्षण घेऊन स्थायिक होतात व महाराष्ट्राच्या विकासात लक्षणीय योगदान देतात. महाराष्ट्रात म्हणूनच सूक्ष्म, लघू व मध्यम व कॉर्पोरेट उद्योगांचे महाविश्व तयार झाले आहे, हे कोणालाही मान्य करावे लागेल.

## नावीन्यता आणि स्टार्टअपमध्ये प्रथम

नावीन्यता आणि स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. स्टार्टअप रँकिंग २०२१ मध्ये महाराष्ट्र राज्याचा टाप परफॉर्मर श्रेणीमध्ये आहे. देशातील १०४ युनिकॉर्नपैकी २४ युनिकॉर्नस् (२३%) राज्यात आहेत. (यूनिकॉर्न म्हणजे अशी कंपनी जिचे मुल्यांकन १ बिलियन अमेरिकन डॉलर्स म्हणजे ७९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.) देशातील एकूण २,१३,५६१ स्टार्टअप्सपैकी ३६,८८० स्टार्टअप्स (१८%) महाराष्ट्रातील आहेत. प्रत्येक जिल्ह्यात किमान २५ ते ३० स्टार्टअप्स आहेत.

**जिल्हे आणि स्टार्टअप्सची संख्या :-** गडचिरोली - ३२, नंदुरबार - ३७, मुंबई महानगर - १४७१०, पुणे - ८६०३, नागपूर - २०५२, औरंगाबाद - ८७७, सिंधुदुर्ग - ६३.

## सामाजिक न्यायाचे कार्य

सामाजिक न्याय व समतेच्या चळवळीतील महाराष्ट्र राज्याचे मौलिक योगदान राहिलेले आहे. महात्मा जोतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, सावित्रीबाई

तालिका क्र.४

| सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील (एमएसएमई) महाराष्ट्राची घोडदौड (नोव्हेंबर २०२१ पर्यंत) (एकूण रोजगार निर्मिती : ६१.८५ लाख) | | |
|---|---|---|
| उद्योग | संख्या | रोजगार (लाख) |
| सूक्ष्म | ९,८६,३३० | ४३.४८ |
| लघू | ३८,९५४ | १०.५८ |
| मध्यम | ५,४३३ | ७.७९ |

(आधार – उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य)

फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. पंजाबराव देशमुख, प्रबोधनकार ठाकरे यांच्या समता चळवळीचा अलौकिक वारसा आहे. त्यामुळेच महाराष्ट्र सामाजिक न्यायाबाबत सदैव देशात अव्वल स्थानी राहिलेला आहे, हा इतिहास आहे. राज्यात १९७० च्या दशकात गंभीर दुष्काळ पडला होता, तेव्हा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक व तत्कालीन विरोधी पक्ष नेत्यांनी एकत्र येऊन



क्रांतिकारक अशी रोजगार हमी योजना निर्माण केली. त्यातून गोरगरीब, दलित आणि वंचित मागासवर्गीयांसाठी रोजगाराची व आजीविकेची हमी दिली. दुष्काळात महाराष्ट्रात लाखो मजुरांना रोजगार मिळाला. अभिमानास्पद बाब म्हणजे पुढे भारत सरकारने ही योजना देशभरात मनरेगा (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) या नावाने राबवली गेली व अजूनही ती देशभर कार्यरत आहे. महाराष्ट्र राज्याची ही पुरोगामी रोजगार देणगी राष्ट्राला भेट दिली आहे. कोट्यवधी गरिबी वंचित-दलित-आदिवासींची ती आजीविका जगण्याचे माध्यम झाली आहे. महाराष्ट्रात मनरेगाद्वारे २०२०-२१ वर्षात १६ लाख ८८ हजार कुटुंबांना रोजगार दिला आहे आणि त्यातून पाच कोटी ६७ लाख मनुष्यदिवस रोजगार देण्यात यश आले आहे. महिला बचतगट चळवळीत महाराष्ट्र देशात चौथ्या स्थानी आहे. लाखो ग्रामीण व शहरी गरीब महिलांना महाराष्ट्राने आर्थिक न्याय व सामाजिक न्यायाचे मौलिक काम केले आहे. महाराष्ट्र राज्याने दलित-वंचित-आदिवासी व ओबीसी या वर्गातील अक्षरशः लाखो पहिल्या पिढीच्या पदवीधर व संशोधक, प्रशासक, प्राध्यापक, अधिकारी-कर्मचारी वर्गाच्या जीवनात मन्वंतर घडवले आहे. महाराष्ट्र राज्यातील दलित-वंचित हजारो बुद्धिमान युवक भारताच्या सर्व राज्यात व जगभरात उत्तम कार्य करताहेत व शेकडोंनी उद्योजकही झालेले आहे. वंचितांचे व्यवसाय परिवर्तन ही समाज उन्नतीचा महामार्ग असतो आणि महाराष्ट्राने १९६० ते २०२२ पर्यंतच्या वैभवशाली वाटचालीत लोकविलक्षण असा चौफेर, सर्वांगीण व शाश्वत विकास साधला आहे आणि ही विकासयात्रा यापुढेही अशी व अधिक वेगवान होत जाईल, याची मला अभ्यासक म्हणून खात्री आहे.

## अनुसूचित जातींमधील उद्योजक

सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख लक्षण असते ते व्यवसाय परिवर्तन. भारतातील जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था ही व्यवसाय

| अनुसूचित जातींमधील सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग : प्रमुख राज्ये | | |
|---|---|---|
| अ.क्र | राज्य | एमएसएमई उद्योग संख्या |
| १ | महाराष्ट्र | ९६,८०५ |
| २ | तामिळनाडू | ४२,९९७ |
| ३ | राजस्थान | ३८,५१७ |
| ४ | उत्तरप्रदेश | ३६९१३ |
| ५ | कर्नाटक | २८,८०३ |

(आधार – उद्यम पोर्टल एमएसएमई)

वर्गवारी करणारी व्यवस्था आहे. पारंपरिक जातिव्यवस्थेने दिलेला पारंपरिक हीन व दीन व्यवसाय शिक्षणाच्या क्रांतीमुळे बदलतो व हेच समाज परिवर्तन असते. दलित-वंचित समाजाचा व्यवसाय परिवर्तन म्हणूनच महत्त्वपूर्ण ठरते. या वर्गातील तरुणांचा स्वत:चा उद्योग असणे ही सामाजिक क्रांतिकारक बाब. दलित-वंचित समाजातील युवकांनी लोकशाही व्यवस्थेत शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन उद्योगउदीम उभा करणे मौलिक ठरते. भारत देशात पुरोगामी महाराष्ट्र राज्याने अनुसूचित जातींतून सर्वाधिक उद्योजक निर्माण करून अव्वल स्थान पटकावले आहे. महाराष्ट्र राज्यात सूक्ष्म, लघू व मध्यम (एमएसएमई)चे ९६,८०५ उद्योग उभे करून महाराष्ट्राने भीमपराक्रम केला आहे. इतर राज्ये महाराष्ट्राच्या कितीतरी मागे आहेत हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाची अधिक गतीने कृती करणारे राज्य महाराष्ट्र आहे, हे कोणीही मान्य करेल.

**(लेखक हे माजी कुलगुरू व सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक आहेत.)**

**आपल्या देशासाठी ध्वज निर्मिती करणारी म्हणून भारतभर केवळ ओळख निर्माण करणारीच नव्हे, तर आपल्या गुणवत्तेची मोहर ठसवणारी संस्था म्हणून नांदेडच्या मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीची नोंद घ्यावी लागते. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या संस्थेच्या कार्याचा थोडक्यात आढावा...**

## मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती

# ध्वज निर्मिती करणारी संस्था

**डॉ. भास्कर भोसले**

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती ही संस्था स्थापन होण्यापूर्वी हैदराबाद खादी समितीत कार्यरत होती. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विकेंद्रीकरणानुसार १ जून १९६७ रोजी संस्थेला मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीकडे हस्तांतरित केले. यापूर्वीचा इतिहास पाहिला तर हैदराबाद खादी समितीचे अध्यक्ष स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाडा प्रदेशातील सर्व खादी कर्मचाऱ्यांची सभा बोलावत मे १९६७ मध्ये मराठवाडा खादी ग्रामोद्योगची स्थापना करत एका नव्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. विशेष म्हणजे तत्कालीन स्थापनेच्या वेळी संस्थेकडे कोणतेही भागभांडवल नव्हते. नंतर त्याची जुळवाजुळव केली गेली. संस्थेकडे मोठ्या प्रमाणावर स्टॉक, खूप सारे चरखे माग (लूम) अडगळीत पडलेल्या अवस्थेत होते. अशाही स्थितीत संस्थेने हाती घेतलेले खादीचे धनुष्य पेलत सगळी जमवाजमव करत कामाची सुरुवात केली.

प्रथम अध्यक्षाचा मान दिगंबरराव बिंदू व सचिव पदाची (मंत्री) सूत्रे भगवानराव गांजवे यांच्याकडे दिली गेली. संस्थेच्या अन्य सदस्यांमध्ये अप्पासाहेब सहस्त्रबुद्धे, शंकरराव चव्हाण, दामोदर पांगरेकर, नारायणराव लोहारेकर, गोविंदभाई श्रॉफ तथा देवीसिंह चौव्हाण यांना व्यवस्थापन समितीमध्ये स्थान मिळाले. संस्थेचे मुख्यालय नांदेडला करत १९६७ मध्ये संस्थेकडे नांदेडसह औसा, अंबाजोगाई व उदगीर अशी चार प्रमुख उत्पादन केंद्रे होती. तसेच १४ विक्री भांडारगृहही होती. त्यात औरंगाबाद, कन्नड, जालना, बीड, अंबाजोगाई, परभणी, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, उदगीर, औसा, उमरगा या शहरांचा समावेश होता. सर्व विक्रीकेंद्रांना (भांडारगृहे) नांदेडच्या मध्यवर्ती भांडारगृहातून खादी ग्रामोद्योग मध्ये तयार झालेला माल पाठवला जायचा.

विशेष म्हणजे संस्थेला १९६७ मध्ये पहिल्याच वर्षी उत्पादन व विक्रीतून ५० हजार २१३ रुपयांचा फायदा झाला. संस्था खादी सोबतच ग्रामोद्योगचेही उत्पादन करत होती. उदगीरमध्ये तेल/ऑईल उत्पादन, औसा व नांदेडमध्ये हाथ कागदाचे उत्पादन होत होते. त्या वेळी समितीकडे सूत कातणारे ७२४, बुधाची कामासाठी २८०, पूर्व प्रोसेसच्या कामासाठी ७० कारागीर तथा कर्मचारी ५२ असे एकूण ९२५ कर्मचारी कामावर होते. संस्थेची




काळाप्रमाणे प्रगती होत गेली. १९९० नंतर परळी, पैठण, लातूर, नांदेड, लोहा, निलंगा, सेलू येथेही अतिरिक्त विक्री केंद्रे उघडली गेली.



### ध्वज निर्मितीतून उत्पादन

ध्वज निर्मिती करणारी नांदेडची संस्था ही देशासाठी एक शान म्हणून आजही तितक्याच दिमाखाने उभी आणि कार्यरत आहे. मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती खादीसोबतच ध्वज निर्मिती (राष्ट्रध्वज)चे उत्पादन १९९३ पासून करते. मुंबई खादी ग्रामोद्योग संघातील ध्वज निर्मितीत कार्यरत सुरेश जोशी हे नांदेडला आल्यापासून १९९४ च्या कालावधीत नांदेडने मुंबईला ध्वज निर्मितीसाठी लागणारा कपडा देणे

बंद केले. श्री. जोशी यांनी नांदेडला रुजू झाल्यानंतर शुभ्र खादीसाठी डाईंग म्हणजे कलर करणे कामी अहमदाबादच्या बी.एम. पी. टेक्स्टाईलकडे कपडा पाठवला. तिथून हिरवा, केसरी आणि श्वेत कपडा डाईंग करून नांदेडच्या मुख्यालयात आणला.




चक्रपट्टीची छपाईचे काम मुंबईत करून घेतले. शेवटी नांदेडमध्येच ११ टेलरिंग मशीनवरती ध्वज निर्मितीचे काम सुरू झाले. प्रारंभीच्या काळात संस्थेने २२ विक्री भवनातून ध्वज विक्री सुरू केली त्या वर्षी ३० ते ३५ लाखांचे उत्पादन झाले.

## राष्ट्रध्वजाची गुणवत्ता

जस जसा वेळ गेला, तसे बदलत्या आधुनिक काळाच्या सोबतीने काम करण्यासाठी नवतंत्रज्ञान आणि ध्वज निर्मितीच्या कामातील गुणवत्ता तपासणीसाठी समितीने काही मशिनरी, इक्विपमेंट्स घेतली. त्यामुळे ध्वज निर्मिती उत्पादनाची गतीही वाढली आता मुंबईत होणारे चक्रपट्टी छपाईचे काम नांदेडमध्येच होत आहे. भारतीय मानक ब्युरो (बी.आय. एस.) च्या नियमानुसार संस्थेमध्ये एकूण नऊ आकाराचे ध्वज बनवले जातात. यात १४ x २१, ८ x १२, ६ x ९, ४ x ६, ३ x ४.५, २ x ३ फूट आणि १८ x २७ इंच, १२ x १८ इंच तसेच कार फ्लैग, टेबल फ्लॅग बनवले जातात. १४ x २१ फुटाचे ध्वज साधारणपणे संसद अथवा मोठ्या किल्ल्यावर लावले जातात. ८ x १२ फुटाचे राष्ट्रध्वज मंत्रालयावर फडकले जातात. ६ x ९ फुटाचे ध्वज जिल्हा परिषद, पोलीस मुख्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयात लावले जातात. याचबरोबर ४ x ६ फूट आणि ३ x ४.५ फुटाचे ध्वज महाविद्यालय, पंचायत समिती, शाळा आदी ठिकाणी फडकवले जातात.

सांगायचे झाले तर वर्ष २०१९-२० मध्ये विविध आकारांची १५ हजार १५७ ध्वज उत्पादित होऊन ११८.०४ लाखांचे उत्पादन झाले. हाच आकडा २०२०-२१ मध्ये कोरोनाच्या काळात घटला होता. पुन्हा एक जून २०१९ पासून उत्पादनास सुरुवात झाली. ही संस्था ध्वज निर्मिती करून आपल्या विविध १७ विक्री केंद्रांच्या सोबतच देशभरातील विविध खादी संस्थांनासुद्धा ध्वज पाठवते. यामध्ये प्रामुख्याने मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, कर्नाटक, हरियाणा यांसह इतर १३ राज्यांमध्येसुद्धा ठोक विक्री केली जाते. या ठोक विक्रीवरती संस्था १३ टक्के कमिशनही देती खादी ग्रामोद्योग आयोग खाती उत्पादनावर एमडीए देते, परंतु ध्वज निर्मितीवर एमडीए देत नाही. २०२०-२१ मध्ये ८६.१५ लाखांच्या ध्वजांची विक्री झालेली आहे. संस्था राष्ट्रध्वज बी.आय. एस.च्या नियमानुसार उत्पादन करते आणि यापुढील टप्पा आयएसआय मार्क घेण्याचा आहे. त्या पद्धतीने संस्थेचा निरंतर प्रवास सुरू आहे.

## गौरवाची बाब

देशाचा गौरव तथा या संस्थेची शान असलेल्या ध्वज निर्मितीच्या उत्पादनाची प्रक्रिया बघण्यासाठी, समजून घेण्यासाठी विविध भागांतील शाळांतील मुलांच्या सहलीसुद्धा या खादी ग्रामोद्योग संस्थेला भेटी देतात. भारतभरातून अनेक नामवंत मंडळीसुद्धा या संस्थेला भेट देतात. या संस्थेने ध्वज निर्मितीच्या बाबतीत गौरवशाली परंपरा निर्माण केली आहे हे नांदेडच्या दृष्टीनेसुद्धा सौभाग्याचेच उदाहरण मानावे लागेल. देशाची गरिमा वाढणे, नागरिकांत राष्ट्रप्रेम जागवण्याच्या कामी या राष्ट्रीय अभियानात नांदेडच्या संस्थेने मोठे यश मिळवले आहे. ही केवळ नांदेडसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठीच गौरवाची बाब आहे.

## गुणवत्तेतही सरस

सातत्यपूर्ण गुणवत्तेच्या कसोटीवर खरे उतरत आणि ग्राहकांच्या मागणीप्रमाणे उत्पादन निर्मिती करणे या बळावर मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीने संस्था गुणवत्तेच्या बाबतीतही कुठेही मागे नाही हे सिद्ध केलेले आहे. याला कारणही असेच आहे की, एक नियमित गुणवत्ता खात्री प्रणालीच्या कठीण परीक्षणाची प्रक्रियाही येथे होते. यातून मग निर्मित होते ती उत्तम गुणवत्ताधारी, उत्तम दर्जाची वस्तू. शुद्धतेला दिली जाणारी प्राथमिकता आणि आयएसओ प्रमाणित या निकषावर १०० टक्के खादी गुणवत्तेवर टिकली आहे. यासाठी संस्थेकडे स्वतःच्या (इन हाऊस) प्रयोगशाळा आणि चाचणी विभागाचीही सोय उपलब्ध आहे. समितीच्या विद्यमान अध्यक्षपदाची जबाबदारी ॲड. शिवशंभ अप्पा चवडा, तर ट्रस्टी व सचिव माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांच्याकडे आहे. समितीच्या कार्याची गौरवशाली परंपरा यापुढेही कार्यरत राहील.

**(लेखक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात सहायक प्राध्यापक आहेत.)**

**देशात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत आहे. या निमित्ताने देशभरात 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' हे अभियान देशभरासह महाराष्ट्रातही १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवण्यात आले. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. महाराष्ट्रात राबवण्यात आलेल्या 'घरोघरी तिरंगा' या अभियानाविषयी...**

# घरोघरी तिरंगा अभियान

**वर्षा फडके**

तिरंगा म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीकच. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात राष्ट्रध्वजाचा मान आणि सन्मान राखून घरोघरी तिरंगा हे देशव्यापी अभियान राबवण्यात आले. महाराष्ट्रातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात आपला सहभाग नोंदवला.

'घरोघरी तिरंगा' या अभियानात महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाने आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात केले होते. विशेष म्हणजे याच कार्यक्रमात प्रत्येक नागरिकाने राष्ट्रध्वज विकत घेऊन स्वयंस्फूर्तीने 'घरोघरी तिरंगा' हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उमेद अभियानांतर्गत महिला बचतगटाच्या विक्री दालनातून राष्ट्रध्वज विकत घेतले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात 'घरोघरी तिरंगा' अभियानानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत राष्ट्रध्वजासह सेल्फी काढून घेण्यासाठी एकच गर्दी उसळली होती. मंत्रालयातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमवेत तिरंगा ध्वज घेऊन सेल्फी काढायची होती. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील सर्वांच्या इच्छेला मान देत, प्रत्येकाजवळ थांबत सेल्फी काढत होते. या वेळी त्रिमूर्ती प्रांगणातील सर्व वातावरण तिरंगामय झाले होते. 'भारत माता की जय' आणि 'जय हिंद' अशा घोषणांनी मंत्रालय दणाणले.



मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात 'घरोघरी तिरंगा' अभियानानिमित्त कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

## उत्सव स्वातंत्र्याचा

सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत स्वातंत्र्यदिनी रात्री ८ वाजता रवींद्र नाट्य मंदिर येथे 'उत्सव स्वातंत्र्याचा' हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते.

## सांगीतिक कार्यक्रमांचे आयोजन

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवांतर्गत स्वराज्य सप्ताह ९ ते १७ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आला होता. स्वराज्य सप्ताह निमित्ताने 'आजादी का अमृतमहोत्सव', 'लेणं देशभक्तीचं', 'लोकरंग स्वरधारा', 'मिले सुर मेरा तुम्हारा', 'नाट्यसंगीताचा स्वातंत्र्यसंग्राम', 'गाथा बलिदानाची' हे सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## डिजिटल तिरंगा राखी

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आले. या अंतर्गत सीमेवरील तैनात सैनिकांना डिजिटल तिरंगा राखी पाठवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाने केले होते. ११ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून, 'डिजिटल तिरंगा राखी' ही संकल्पना पुढे आली होती. या डिजिटल राख्या ऑनलाइन पद्धतीने पाठवण्यात आल्या.

## समुपदेशनात्मक कार्यक्रम

छोट्यामोठ्या चुकांमुळे कैदी बनून आयुष्य जगणाऱ्या बनलेल्या अनेकांसाठी ११ ऑगस्टचा दिवस विशेष ठरला. निमित्त होते,

‘जीवन गाणे गातच जावे...’ या अनोख्या कार्यक्रमाचे... स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत, राज्यातील ३६ प्रमुख कारागृहांमध्ये सांस्कृतिक, प्रबोधनात्मक व समुपदेशनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून सांस्कृतिक कार्य संचालनालयाने एक अनोखा विक्रम केला. ‘जीवन गाणे गातच जावे...’ या विशेष कार्यक्रमाचे एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात कारागृहात आयोजन होण्याची ही घटना, देशाच्या व राज्याच्या इतिहासात प्रथमच घडली. व्यावसायिक कलाकारांसोबतच, कारागृहातील कैद्यांनीही या कार्यक्रमात सादरीकरण केले हे या कार्यक्रमांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात अनेक अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणजे राज्यातील प्रमुख कारागृहात सांस्कृतिक, समुपदेशनात्मक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन एकाच वेळी करण्यात आले. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत या कार्यक्रमासाठी एकूण ३६ कलासमूह निवडण्यात आले होते. सांस्कृतिक कार्य संचालनालयाने या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी गृह विभागाच्या मदतीने सूक्ष्म नियोजन केले होते. या कार्यक्रमांत १००० हून अधिक कलाकार सहभागी झाले होते. बहुतांश कार्यक्रमासाठी संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक, न्यायाधीश उपस्थित होते. कारागृहातील कैद्यांसाठी झालेल्या कार्यक्रमात, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला, प्रबोधन, समुपदेशन, योग क्रिया याबरोबरच इतर कार्यक्रमही आयोजित केले होते.

## उत्कृष्ट सादरीकरण

‘जीवन गाणे गातच जावे...’ या कार्यक्रमात कारागृहातील अनेक कैद्यांनी सादरीकरणात सहभाग घेतला. काही कैद्यांनी अप्रतिम वादन, गायन, काव्यवाचन आणि नृत्य करून त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव दिला. कैद्यांमधील कलाकार पाहण्याची दुर्मीळ संधी या वेळेस सर्वांना मिळाली. अशा कार्यक्रमांचे आयोजन वारंवार करावे, अशी अपेक्षाही अनेकांनी केली. जाणताअजाणता झालेल्या चुकांमुळे, शिक्षा भोगावी लागत असल्याचे काही कैद्यांनी स्पष्ट केले. मात्र या कार्यक्रमामुळे नवी दिशा मिळाली असून, भावी आयुष्यासाठी त्याचा चांगला उपयोग होईल, अशी आशाही अनेकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे शीर्षक ‘जीवन गाणे गातच जावे..’, यामुळेही एक नवी ऊर्जा मिळाली असून जीवनात नवा अध्याय सुरू करणार असल्याची भावनाही काही कैद्यांनी बोलून दाखवली.

## गृह विभागाचे सहकार्य

राज्याच्या गृह विभागाने या उपक्रमासाठी सर्व सहकार्य केले. तुरुंग प्रशासन आणि गृह विभाग यांनी केलेल्या सहकार्यामुळे हे कार्यक्रम होऊ शकले. राज्याच्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत तुरुंग प्रशासनाला आदेश देऊन सहकार्य करण्याबाबत कळवले होते. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधार सेवा पुणे, सुनील रामानंद यांनी वैयक्तिक लक्ष घालून याबाबत संबंधितांना योग्य ते निर्देश दिले. हेमंत पवार संशोधन अधिकारी, कारागृह व सुधार सेवा यांनी याबाबत योग्य तो समन्वय ठेवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

## लेणं देशभक्तीचं

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ‘लेणं देशभक्तीचं’ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लोककलेतून राष्ट्रभक्तीचा प्रसार, देशाबद्दल आत्मीयतेची भावना आणि राष्ट्रजागृती निर्माण व्हावी, या हेतूने डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. धकाधकीच्या आयुष्यात माणसाला आपल्या कलांद्वारे मोहित करण्याची किमया साधणाऱ्या वासुदेव, गोंधळ, जागरण, लोकगीत, शेतकरी गीत, लावणी, अभंग, पोवाडा, शाहिरी, सवाल जबाब अशा नवरंगांचा समावेश असलेल्या कार्यक्रमाचे सादरीकरण या वेळी करण्यात आले.

## समूह राष्ट्रगीत गायन

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने देशभरात ‘स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव’ साजरा करण्यात येत आहे. राज्यात ९ ते १७ ऑगस्ट दरम्यान सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्वराज्य महोत्सव आयोजित करण्यात आला. राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. याच उपक्रमांतर्गत १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता ‘समूह राष्ट्रगीत गायन’ उपक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत राज्यातील खासगी, शासकीय आणि इतर सर्व प्रकारच्या शाळा / महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यापीठे यामधील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी सहभाग नोंदवला.

**विभागीय संपर्क अधिकारी**

## वारसा पदयात्रा प्रभातफेरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि युवक बिरादरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत ‘घरोघरी तिरंगा’ अभियानांतर्गत ९ ऑगस्ट रोजी भारतीय विद्या भवन ते ऑगस्ट क्रांती मैदान या मार्गावर वारसा पदयात्रा म्हणजेच प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभातफेरीत ५०० पेक्षा अधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

युवकांमध्ये राष्ट्रभक्तीचा प्रसार, देशाबद्दल आत्मीयतेची भावना आणि राष्ट्रजागृती निर्माण व्हावी, या हेतूने प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. प्रभातफेरी संपन्न झाल्यावर भारतीय विद्या भवन सभागृह येथे ‘एक सूर एक ताल’ हा कार्यक्रम सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला होता. यानंतर भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि इतिहासाचे प्रदर्शन करणारा ‘पुण्यतीर्थ बॅले’ हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# • आपले मंत्री •

**९ ऑगस्ट २०२२ रोजी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी १८ नवनियुक्त मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राजभवनातील दरबार हॉल येथे हा शपथविधी सोहळा संपन्न झाला. या १८ नवनियुक्त मंत्र्यांचा संक्षिप्त परिचय..**



## राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील

जन्म : १५ जून १९५९
जन्म ठिकाण : श्रीरामपूर, जिल्हा - अहमदनगर
शिक्षण : बी.एस्सी.(ॲग्री). ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी ● वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शालिनीताई ● अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली)
व्यवसाय : शेती ● पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : २१८-शिर्डी, जिल्हा-अहमदनगर

### संक्षिप्त माहिती

१९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मे १९९८ ते फेब्रुवारी १९९९ कृषी व जलसंधारण खात्याचे मंत्री; फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ कृषी, जलसंधारण, दुग्धविकास आणि पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री, डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत शालेय शिक्षण, विधी व न्याय खात्याचे मंत्री व औरंगाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री; नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१० परिवहन, बंदरे, विधी व न्याय खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ कृषी व पणन खात्याचे मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१४ ते जून २०१९ विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य, जून २०१९ ते नोव्हेंबर २०१९ गृहनिर्माण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास या खात्याचा कार्यभार.



## सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार

जन्म : ३० जुलै १९६२ ● जन्म ठिकाण : चंद्रपूर
शिक्षण : एम.कॉम., एल.एल.बी., बी.जे., डी.बी.एम., एम.फिल.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सपना
अपत्ये : एकूण १ (एक मुलगी)
व्यवसाय : शेती ● पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : ७२ - बल्लारपूर, जिल्हा - चंद्रपूर

### संक्षिप्त माहिती

१९७९ सचिव, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, चंद्रपूर; १९९३ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चा; १९९६ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००२ उपाध्यक्ष, अखिल भारतीय युवा मोर्चा; एप्रिल २०१०-२०१३ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ पर्यटन व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे विधानसभेतील १९९८चा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार; २००९-२०१२ विधिमंडळ भारतीय जनता पक्षाचे प्रतोद; ३१ ऑक्टोबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ वित्त व नियोजन आणि वने खात्याचे मंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; २०२० पासून समिती प्रमुख, लोकलेखा समिती. ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय या खात्याचा कार्यभार.



## चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील

जन्म : १० जून १९५९
जन्म ठिकाण : मुंबई
शिक्षण : बी.कॉम
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अंजली
व्यवसाय : टेलिकॉम मार्केटिंग
पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : २१० – कोथरूड, जि. पुणे

### संक्षिप्त माहिती

सन १९७७-१९८० विद्यार्थी कार्यकर्ता; १९८०-१९९३ पूर्णवेळ कार्यकर्ता व १९९०-१९९३ राष्ट्रीय सरचिटणीस, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद; सचिव, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई; १९९५-९९ सहकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कोल्हापूर विभाग; २००४-२००७ चिटणीस व दक्षिण महाराष्ट्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००७-२०१० प्रदेश सरचिटणीस, २०१०-२०१५ प्रदेश उपाध्यक्ष, जुलै २०१९ पासून प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; सन २००८-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद, ऑक्टोबर २०१४ ते ऑक्टोबर २०१९ महसूल व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; २०१४-२०१९ विधान परिषदेचे सभागृह नेते; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य या खात्याचा कार्यभार.



## डॉ. विजयकुमार कृष्णराव गावित

जन्म : १५ ऑगस्ट १९५५
जन्म ठिकाण : लोभाणी, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार.
शिक्षण : एम,बी.बी.एस., एम.डी.(मेडिसीन).
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, भिल व अहिराणी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कुमुदिनी
अपत्ये : एकूण २ (दोन मुली)
व्यवसाय : वैद्यकीय व शेती ● पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : ३ – नंदुरबार (अनुसूचित जमाती), जि. नंदुरबार.

### संक्षिप्त माहिती

१९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च १९९७ ते जुलै १९९९ सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये आणि कुटुंब कल्याण खात्याचे राज्यमंत्री; मार्च २००१ ते जुलै २००२ सामान्य प्रशासन, समाजकल्याण, दारुबंदी प्रचारकार्य खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००२ ते जुलै २००४ सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क आणि व्यसनमुक्ती कार्य खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००४ ते ऑक्टोबर २००४ सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, भटक्या विमुक्त जाती व इतर मागासवर्ग कल्याण व राजशिष्टाचार यांसह (ऑगस्ट, २००४ पासून व्यसनमुक्त कार्य) खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ आदिवासी विकास खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००९ ते १९ मार्च २०१४ वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन व पर्यटन (२००९-२०११) खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. आदिवासी विकास या खात्याचा कार्यभार.



## गिरीष दत्तात्रय महाजन

जन्म : १७ मे १९६० ● जन्म ठिकाण : जामनेर, जि. जळगाव
शिक्षण : बी.कॉम ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती साधना
अपत्ये : एकूण २ (दोन मुली)
व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य
पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : १९–जामनेर, जिल्हा–जळगाव

### संक्षिप्त माहिती

संचालक, श्रीकृष्ण दूध उत्पादक सहकारी संस्था; संचालक, तापी पूर्णा शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रिज, लि. जळगाव; कार्याध्यक्ष, गोविंद महाराज संस्थान, जामनेर; जिल्हाध्यक्ष, व्हॉलीबॉल व बॅडमिंटन असोसिएशन; अध्यक्ष, जिल्हा शूटिंग बॉल असोसिएशन; अध्यक्ष, सिद्धगड मंदिर देवस्थान, रामपुर जिल्हा जामनेर; अध्यक्ष, सोनेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट, जामनेर; लातूर व गुजरात भुकंपग्रस्तांना मदत कार्य; १९९२-९५ सरपंच, ग्रामपंचायत, जामनेर; कायम निमंत्रित सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९०-९२ उपाध्यक्ष, जामनेर तालुका कार्यकारणी, भारतीय जनता पक्ष; १९९३-९५ सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९५-१९९९, १९९९-२००४; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ जलसंपदा खात्याचे मंत्री, नाशिक व नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. ग्रामविकास आणि पंचायतराज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण या खात्याचा कार्यभार.




## गुलाबराव रघुनाथ पाटील

जन्म : ५ जून १९६७ ● जन्म ठिकाण : बोरखेडा, तालुका–धरणगाव, जिल्हा – जळगाव. ● शिक्षण : एच.एस.सी.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व मारवाडी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मायाबाई
अपत्ये : एकूण ३ (दोन मुले व एक मुलगी)
व्यवसाय : शेती व व्यापार
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : १४– जळगाव–ग्रामीण, जिल्हा–जळगाव.

### संक्षिप्त माहिती

गरीब व अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि उन्नतीसाठी विविध मदतकार्य; रक्तदान शिबिरांचे आयोजन; सामाजिक अन्यायाविरुद्धच्या जनआंदोलनात सक्रिय सहभाग; १९९२-९७ सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती, एरंडोल; १९९७-९९ सदस्य व सभापती, कृषी समिती, जिल्हा परिषद, जळगाव; १९९२-९७ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धरणगाव, १९९६-९९ सदस्य, म्हाडा, नाशिक विभाग; १९८४-८९ शिवसेना पक्षाचे शाखाप्रमुख, उप तालुकाप्रमुख व १९९६ जिल्हाप्रमुख; २००३ उपनेता म्हणून कार्य; शिवसेनेची मुलुख मैदानी तोफ म्हणून विशेष ओळख; १९९९-२००४, २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळाच्या पंचायतराज, रोजगार हमी, अंदाज समिती व आश्वासन समितीचे सदस्य; जुलै २०१६ ते नोव्हेंबर २०१९ सहकार खात्याचे राज्यमंत्री; परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. पाणीपुरवठा व स्वच्छता या खात्याचा कार्यभार.



## दादाजी दगडू भुसे

जन्म : ६ मार्च १९६४
जन्म ठिकाण : मालेगाव, जिल्हा – नाशिक
शिक्षण : डी.सी.ई. ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनिता
अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे)
व्यवसाय : शेती व बांधकाम
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : ११५– मालेगाव–बाह्य, जिल्हा– नाशिक.

### संक्षिप्त माहिती

शिवसेना तालुका प्रमुख, मालेगाव; पक्षाच्या सर्व उपक्रमांत सक्रिय सहभाग; जागर शिवशाहीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली; संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन अनुदान योजना व श्रावण बाळ योजनेचे अनुदान लाभार्थींना मिळवून दिले; सामुहिक विवाहांचे आयोजन, गोरगरीब रुग्णांना मदत, रक्तदान शिबिरांचे आयोजन; आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली; शालोपयोगी वस्तुंचे वाटप; संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू केले; जिमखाना सुरू केला; व्यसनमुक्ती व स्वच्छता अभियान राबवले; जागर शिवशाहीचा कार्यक्रमाच्या माध्यमातून जातीचे दाखले मिळवून दिले; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सहकार खात्याचे राज्यमंत्री व धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ दरम्यान महाराष्ट्र राज्याचे कृषी व माजी सैनिकांचे कल्याण खात्याचे मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. बंदरे आणि खनिकर्म या खात्याचा कार्यभार.




## संजय दुलीचंद राठोड

जन्म : ३० जून १९७१
जन्म ठिकाण : यवतमाळ
शिक्षण : बी.कॉम., बी.पी.एड.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व बंजारा.
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शितल
अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)
व्यवसाय : शेती ● पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : ७९–दिग्रस, जिल्हा–यवतमाळ.

### संक्षिप्त माहिती

सचिव, छत्रपती शिवाजी कला, शिक्षण, क्रीडा, कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, शिवपुरी, तालुका कळंब, जिल्हा यवतमाळ; आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; आदिवासींसाठी नृत्य व लोकनृत्य स्पर्धांचे आयोजन; २००३-२००४ प्लास्टिकमुक्ती अभियानाचे आयोजन; २००२-२००४ मच्छरमुक्ती अभियानांचे आयोजन; १९९१ पासून शिवसेनेचे कार्य; १९९७ जिल्हा प्रमुख, शिवसेना यवतमाळ जिल्हा; शिवसेनेच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग; विदर्भस्तरीय आदिवासी परिषद, बंजारा समाज मेळावा व सरपंच परिषदेचे आयोजन; निराधारांना अनुदानासाठी तसेच पाणी प्रश्न व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी धरणे तसेच अन्याय अत्याचार विरोधी आंदोलनात सक्रिय सहभाग; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायतराज समिती, सदस्य, उपविधान समिती ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ महसूल खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०१९ ते २८ फेब्रुवारी २०२१ वने व भुकंप पुनर्वसन खात्याचे मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. अन्न व औषध प्रशासन या खात्याचा कार्यभार.



## डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे

जन्म : १ जून १९५८ ● जन्म ठिकाण : पेड, तालुका–तासगाव, जिल्हा–सांगली. ● शिक्षण : अभियांत्रिकी (वेल्डिंग) डिप्लोमा , डी.लिट. ● (श्रीलंकेतील आंतरराष्ट्रीय कोलंबो विद्यापीठाने उत्कृष्ट समाजसेवेबद्दल पदवी प्रदान केली.)
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुमन
अपत्ये : एकूण २ (दोन मुले)
व्यवसाय : शेती व उद्योग ● पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : २८१– मिरज (अनुसूचित जाती), जिल्हा–सांगली.

### संक्षिप्त माहिती

संस्थापक-अध्यक्ष, दास बहुउद्देशीय शिक्षण संस्था, या संस्थेमार्फत मिरज येथे आमदार सुरेश (भाऊ) खाडे इंग्लिश मेडियम स्कुल सुरू केले; आय.ए.एस. व आय.पी.एस.च्या विद्यार्थ्यांना पुस्तके व आर्थिक मदत; जत साखर कारखान्याच्या माध्यमातून दुष्काळात चारा छावणी सुरू केली; अनेक गावात स्वखर्चाने बोअरवेल बसवल्या; टँकरने पाणीपुरवठा केला; २०१०-२०१३ सांगली जिल्हा अध्यक्ष (ग्रामीण), २०१३-२०१५ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; पूर परिस्थितीत पुरग्रस्तांना तसेच गरीब व निराधार महिलांना संसारोपयोगी साहित्य दिले; मिरज तालुक्यातील रस्त्यांचा अनुशेष भरून काढला, बेळंकी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीसाठी १५ कोटी निधी मंजुरीसाठी विशेष प्रयत्न; अनेक गावांच्या विकासासाठी भरीव निधी मिळवून दिला; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अंदाज समिती, पंचायतराज समिती, अनुसूचित जाती कल्याण समिती व उपविधान समिती; २०१५ ते २०१९ अनुसूचित जाती कल्याण समितीचे समिती प्रमुख; जून २०१९ ते ऑक्टोबर २०१९ सामाजिक न्याय व मदत साहाय्य खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. कामगार या खात्याचा कार्यभार.



## संदिपानराव आसाराम भुमरे

जन्म : १३ जुलै १९६३
जन्म ठिकाण : पाचोड बु., तालुका– पैठण, जि. औरंगाबाद.
शिक्षण : एस.एस.सी.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी.
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पुष्पा
अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली)
व्यवसाय : शेती ● पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : ११० – पैठण, जिल्हा – औरंगाबाद

### संक्षिप्त माहिती

साक्षरता अभियान कार्यक्रमात सहभाग; ग्रामीण भागात प्राथमिक शाळा सुरू केली; हुंडाविरोधी चळवळ राबवली, सामूहिक विवाहांचे आयोजन; ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहन; नाट्य स्पर्धा, कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन; लेझिम पथक व व्यायामशाळा सुरू केल्या; १९८९ शिवसेना शाखाप्रमुख व सर्कलप्रमुख, पाचोड; १९८९-९४ सदस्य, ग्रामपंचायत, पाचोड; १९९२-९४ उपसभापती, पंचायत समिती, पैठण; संचालक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९३-२०१४ संचालक, संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि; पैठण; १९९५- १९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ रोजगार हमी व फलोत्पादन खात्याचे मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. रोजगार हमी योजना व फलोत्पादन या खात्याचा कार्यभार.



## उदय रवींद्र सामंत

जन्म : २६ डिसेंबर १९७५ ● जन्म ठिकाण : गोवा
शिक्षण : डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती जया
अपत्ये : एकूण २ (दोन मुली)
व्यवसाय : शेती व व्यापार
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : २६६ – रत्नागिरी, जिल्हा – रत्नागिरी.

### संक्षिप्त माहिती

१९९६-१९९९ अध्यक्ष, युवा मंच, पाली; कोकण रेल्वे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न, २००३-२००४ चा महाराष्ट्र पत्रकार संघाचा 'कोकण रत्न' पुरस्कार व २००४-२००५ चा रमजान मुबारकतर्फे 'युवा रत्न' पुरस्कार प्राप्त; सन २००७चा दि प्राईड ऑफ इंडियाचा भास्कर पुरस्कार प्राप्त; सन २०१३ मध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेचा साहित्य मित्र सन्मान पुरस्कार प्राप्त; १९९६-१९९९ एन.एस.यु.आय. च्या कार्यात सक्रिय सहभाग, फेब्रुवारी १९९५ ते मे १९९९ उपाध्यक्ष, जिल्हा युवक काँग्रेस; अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस; १९९९-२००१ निरीक्षक, कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस: १९९९-२००० चिटणीस, जुलै २०१० ते २०१२ अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेस; ऑक्टोबर २०१४ पासून शिवसेना पक्षाचे कार्य, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, ११ जून २०१३ ते सप्टेंबर २०१४ नगरविकास वने, विधी व न्याय, बंदरे व मत्स्यव्यवसाय खात्याचे राज्यमंत्री, विधिमंडळाच्या रोजगार हमी व पंचायतराज समितीचे सदस्य; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते जून २०२२ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. उद्योग या खात्याचा कार्यभार.



## डॉ. तानाजी जयवंत सावंत

जन्म : १ जून १९६४
जन्म ठिकाण : मु.पो.वाकाव, तालुका माढा, जिल्हा सोलापूर
शिक्षण : डी.ई.ई., बी.ई (इलेक्ट्रॉनिक्स), पी. जी. डी.एम., पी.एचडी ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शुभांगी
अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे) ● व्यवसाय : व्यापार
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : २४३– परांडा, जिल्हा उस्मानाबाद.

### संक्षिप्त माहिती

शैक्षणिक संस्था स्थापन करून विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली; प्रतिवर्षी सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन; पुरग्रस्तांना मदत; दुष्काळी भागात पाच हजार पाण्याच्या टाक्यांचे वाटप; दुष्काळी भागात एक हजार टन चारा वाटप; बाळासाहेब ठाकरे शिवजल क्रांती योजनेतून १४८ कि.मी. नदी, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केले; कोविडच्या काळात भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अभियंत्रिकी महाविद्यालय बार्शी येथे एक हजार खाटाचे जम्बो कोविड सेंटरची उभारणी करून हजारो रुग्णांच्या उपचाराची सोय केली; सन २०१६ पासून शिवसेनेचे उप नेते; शिवसेना संपर्कप्रमुख, उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा; डिसेंबर २०१६ ते ऑक्टोबर २०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; सदस्य, पंचायतराज समिती विनंती अर्ज समिती व आमदार निवास आहार व्यवस्था समिती; माहे जून २०१९ ते ऑक्टोबर २०१९ जलसंधारण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण या खात्याचा कार्यभार.



## रवींद्र दत्तात्रय चव्हाण

जन्म : २० सप्टेंबर १९७०
जन्म ठिकाण : मुंबई ● शिक्षण : एस.वाय.बी.ए.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुहासी
अपत्ये : एकूण २ (दोन मुली)
व्यवसाय : बांधकाम
पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : १४३–डोंबिवली, जिल्हा–ठाणे.

### संक्षिप्त माहिती

२००५ नगरसेवक, २००६ सदस्य व २००७ सभापती, स्थायी समिती, कल्याण-डोंबिवली महागरपालिका; २००५ अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, कल्याण; संस्थापक, डोंबिवली रिक्षा चालक-मालक संघटना ; बी.एस.यु.पी. या प्रकल्पांतर्गत ८२५० गरीब झोपडपट्टीधारकांना मोफत घरे योजना राबवली; कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत घरेलू कामगार संघटनेची स्थापना करून त्यांचे न्याय हक्कासाठी लढा दिला; डोंबिवली एक सांस्कृतिक परिवार मासिकाचे संपादक; आपुलकी हेल्पलाईन सुरू करून अनेक स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न; नवउद्घोष साप्ताहिकाचे संपादक म्हणून कार्य केले; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ८ जुलै २०१६ ते ९ नोव्हेंबर २०१९ बंदरे, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, वैद्यकीय शिक्षण खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या खात्याचा कार्यभार.



## अब्दुल नबी सत्तार

जन्म : १ जानेवारी १९६५
जन्म ठिकाण : सिल्लोड, जिल्हा–औरंगाबाद
शिक्षण : बी.ए. ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नफिजा बेगम
अपत्ये : एकूण ७ (दोन मुले व पाच मुली)
व्यवसाय : व्यापार ● पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : १०४–सिल्लोड, जिल्हा–औरंगाबाद

### संक्षिप्त माहिती

१९८४ ते १९९० सदस्य, ग्रामपंचायत, सिल्लोड; ५ मार्च १९९४ ते ९ जानेवारी १९९६, २९ ऑगस्ट १९९८ ते ४ मार्च १९९९ व १५ फेब्रुवारी २००० ते ६ सप्टेंबर २००१, अध्यक्ष, नगरपरिषद, सिल्लोड; चेअरमन, विविध कार्य सेवा सोसायटी, सिल्लोड; संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सिल्लोड; संचालक, म्हसोबा महाराज तेलबिया उत्पादक सहकारी संस्था संचालक, दूध उत्पादक सहकारी संस्था, सिल्लोड; संचालक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २००१-२००६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, २ नोव्हेंबर २००९ ते डिसेंबर २०१० अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक बांधकाम खात्याचे राज्यमंत्री, २ जून २०१४ ते ऑक्टोबर २०१४ पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री, मे २०१९ पासून शिवसेना पक्षाचे कार्य, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, जानेवारी २०२० ते जून २०२२ महसूल, ग्रामविकास, बंदरे, खारजमिनी विकास व विशेष साहाय्य खात्याचे राज्य मंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. कृषी या खात्याचा कार्यभार.



## दीपक वसंतराव केसरकर

जन्म : १८ जुलै १९५५ ● जन्म ठिकाण : सावंतवाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग ● शिक्षण : बी. कॉम., डिप्लोमा इन एक्सपोर्ट मॅनेजमेंट. ● ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पल्लवी
अपत्ये : एकूण १ (एक मुलगी)
व्यवसाय : बांधकाम व्यावसायिक व शेती
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : २७०-सावंतवाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग.

### संक्षिप्त माहिती

कार्यकारी सदस्य, जवाहर नवोदय विद्यालय, सांगली (भारत सरकार उपक्रम); उपाध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, सावंतवाडी; अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळ; संचालक, इंडियन प्लायवूड रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्युट (भारत सरकार) बेंगलोर, संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ; काँग्रेस पक्षाचे १० वर्षे तालुकाध्यक्ष; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ९ वर्षे जिल्हाध्यक्ष, ४ वर्षे प्रदेश कार्यकारणी सदस्य. सप्टेंबर २०१४ पासून शिवसेनेचे कार्य, १५ वर्षे सदस्य आणि ८ वर्षे नगराध्यक्ष, नगरपरिषद, सावंतवाडी; शहरातील जनतेच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या; ५ वर्षे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद महासंघ, मुंबई. २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते ८ जुलै २०१६ वित्त व ग्रामविकास खात्याचे राज्यमंत्री. ८ जुलै २०१६ ते ९ ऑक्टोबर २०१९ वित्त, नियोजन व गृह (ग्रामीण) खात्याचे राज्यमंत्री. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; २०२० पासून समितीप्रमुख, विशेष हक्क समिती, विधानसभा; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. शालेय शिक्षण, मराठी भाषा या खात्याचा कार्यभार.



## अतुल मोरेश्वर सावे

जन्म : २६ फेब्रुवारी १९६२ ● जन्म ठिकाण : नांदेड
शिक्षण : बी. कॉम.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अंजली
अपत्ये : एकूण २ (दोन मुले)
व्यवसाय : उद्योग
पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : १०९-औरंगाबाद पूर्व, जिल्हा-औरंगाबाद.

### संक्षिप्त माहिती

सदस्य, मुकूलहार शिक्षण संस्था, औरंगाबाद; उपाध्यक्ष, श्री. भद्रामारूती देवस्थान ट्रस्ट, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद; १९९६-१९९९ सदस्य, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई; १९९८-२००३ औरंगाबाद शहर अध्यक्ष, २००३-२००९ महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य व २००९-२०१५ चिटणीस, भारतीय जनता पक्ष; २००५ ते २०१४ या काळातील एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स कंपनी बेस्ट व्हेंडर अॅवॉर्डने सन्मानित; २०१०-२०११ आय.के. ई.ए., बेस्ट इनोव्हेशन अॅवॉर्ड. २०१२ दैनिक भास्करचा बिझनेस मॅन ऑफ द इअर अॅवॉर्ड व २०१४ चा स्पेशल अॅवॉर्ड फॉर एक्सपोर्ट तसेच इपेक इंडिया स्टार परफॉर्मर इन डोमॅस्टिक होम प्रॉडक्ट्स पुरस्काराने सन्मानित; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १६ जून २०१९ ते ९ ऑक्टोबर २०१९ उद्योग, खनिकर्म, अल्पसंख्याक विकास व वक्फ खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण या खात्याचा कार्यभार.





## शंभूराज शिवाजीराव देसाई

जन्म : १७ नोव्हेंबर १९६६
जन्म ठिकाण : मुंबई ● शिक्षण : एस.वाय.बी.कॉम.
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती स्मितादेवी
अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)
व्यवसाय : शेती
पक्ष : शिवसेना
मतदारसंघ : २६१–पाटण, जिल्हा–सातारा.

### संक्षिप्त माहिती

अध्यक्ष, लोकनेते बाळासाहेब देसाई फाऊंडेशन, दौलतनगर; मार्गदर्शक, बाळासाहेब देसाई शिक्षण समुह, दौलतनगर; वयाच्या १९ व्या वर्षी १९८६ पासून संचालक व १९८६-९६ चेअरमन, १९९६-२०१४ मार्गदर्शक-संचालक, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना लि. दौलतनगर; सहकार क्षेत्रात १९व्या वर्षी आशिया खंडातील सर्वात कमी वयाचे चेअरमन म्हणून निवड; १९९७ पासून पाटण तालुक्यात व सातारा जिल्ह्यात शिवसेनेचे संघटनात्मक कार्य; १९९२-९७ सदस्य, पंचायत समिती, पाटण; १९९२-२००२ सदस्य, जिल्हा परिषद, सातारा; २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; शिवसेना पक्षाचे विधिमंडळ पक्ष प्रतोद; विधिमंडळ लोकलेखा समितीचे सदस्य; विशाखापट्टणम येथील १७ व्या अखिल भारतीय प्रतोद परिषदेत प्रतिनिधित्व केले; सदस्य, ग्रंथालय समिती, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २००७-२००८ चा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०१९ ते जून २०२२ गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता आणि पणन खात्याचे राज्यमंत्री; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. राज्य उत्पादन शुल्क या खात्याचा कार्यभार.

## मंगलप्रभात गुमानमल लोढा

जन्म : १८ डिसेंबर १९५५ ● जन्म ठिकाण : जोधपूर (राजस्थान) ● शिक्षण : बी.कॉम., एलएल.बी., सी.ए.(इंटर).
ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती
वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंजुला
अपत्ये : एकूण २ (दोन मुले)
व्यवसाय : उद्योग व व्यापार
पक्ष : भारतीय जनता पक्ष
मतदारसंघ : १८५–मलबार हिल, जिल्हा–मुंबई शहर.

### संक्षिप्त माहिती

बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी मोफत सेवायोजन विभागाची निर्मिती; ९ ऑगस्ट १९९७ रोजी क्रांतिदिनी 'भारत जोडो'साठी मानवी साखळीचे आयोजन; सामूहिक गोविंदा, आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी शिबीर, ज्येष्ठ नागरिक सहल, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप, विद्यार्थ्यांकडून माफक शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे यासाठी प्रयत्न; दिवाळी सणानिमित्त ना नफा ना तोटा तत्त्वावर जीवनावश्यक वस्तुंचे वाटप इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन; १९९७ महाराष्ट्रात प्रथमच माहितीचा अधिकार हे अशासकीय विधेयक आणले व या विषयावर योग्य चर्चा घडवली. सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार कायदा पास केला, केंद्र शासनाने तो स्वीकारला; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड; ९ ऑगस्ट २०२२ रोजी मंत्रिपदाची शपथ. पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बालविकास या खात्याचा कार्यभार.

**(सर्व मंत्रिमहोदयांची संक्षिप्त माहिती : संदर्भ–१४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

**गणराया म्हणजे बुद्धिदेवता, शक्तीदेवता आणि सामर्थ्यदेवता म्हणून गणली जाते. संत ज्ञानदेवांनी 'ओम नमोजी आद्या' या श्लोकातून गणरायाला वंदन करून ओंकाररूपाचे स्मरण केले होते. मग अशा चौदा विद्या व चौसष्ट कलांच्या अधिपतीचे नाते समृद्ध निसर्गाशी घट्ट करण्यासाठी आपण डोळसपणे या उत्सवाकडे पाहत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याची गरज आहे.**

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**संजय भुस्कुटे**

आपण मुळातच उत्सवप्रिय आहोत. आपल्या उत्सवांना अनेक वर्षांची परंपरा आहे. या उत्सवांचे नाते संस्कृती आणि निसर्ग यांच्याशी घट्टपणे जोडले गेले आहे. काही वर्षांपूर्वी सण उत्सवातील आनंद हा कौटुंबिक आणि सामाजिक एकात्मतेशी निगडित होता. पण विशेषतः नव्वदच्या दशकात झालेली संगणकीय क्रांती, इलेक्ट्रॉनिक जगतातील विलक्षण प्रगती याने साऱ्या जगाच्या सीमारेषा पुसल्या गेल्या. वास्तविक पाहता या प्रगतीमुळे मानवी जीवनातील सुसंवाद वाढणे अपेक्षित होते. पण या प्रगतीच्या रेट्यामुळे जीवनातील गती वाढली आणि सांस्कृतिक मूल्यांची पडझड हा एक गंभीर प्रश्न समोर येऊ लागला. साहजिकच याचा नकळत परिणाम दैनंदिन जीवनाबरोबरच वर्षभरातील सणउत्सवांवर होणे हे घडू लागले. मग काही वर्षांपूर्वी निर्सगाशी नाते जोडत साजरे केले जाणारे सण, उत्सव हे निसर्गाशी विसंगत साजरे होऊ लागले.

गेल्या तीन दशकांच्या वाटचालीत विज्ञानाने केलेली अजब क्रांती त्यामुळे 'कमी वेळात जास्त उत्पादन' हे सूत्र व्यवहारातील प्रत्येक बाबतीत नकळतपणे स्वीकारले गेले. वास्तविक पाहता वैज्ञानिक शोध व क्रांतीमुळे प्रगतीच्या वाटा समृद्ध होत असताना यातून पर्यावरणाचा समतोल साधता येणे सहज शक्य होते. पण विकासाच्या उन्मादात निसर्गाशी असणारा सुसंवाद कधी विसंवादाशी नाते जोडून गेला याचे भानच आपल्याला राहिले नाही. कारण मानवाला निसर्गाच्या साधन संपत्तीला ओरबाडण्याचा हव्यास आज ग्लोबल वॉर्मिंगसारख्या महाराक्षसाचे रूप घेऊन आव्हान देत आहे.

## ध्वनिप्रदूषणाची समस्या

आपण जर तीन दशकांपलीकडे जाऊन डोकावून पाहिले, तर भारतीय वार्षिक सण,



उत्सवांचे आणि निसर्गाचे घट्ट नाते होते. श्रावण महिन्यापासून सुरू होणाऱ्या प्रत्येक उत्सवाकडे बारकाईने पाहिल्यास आपल्याला याचे महत्त्व समजू शकेल. पण गेल्या काही वर्षांपासून उत्सव साजरे करण्याच्या उत्साहाच्या भरात आपण निसर्गाला हानी पोहोचवू लागलो आहोत. या बदलत्या उत्सवाचे उदाहरण म्हणजे साजरा होणारा गणेशोत्सव. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक प्रबोधनासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. तत्पूर्वी घरगुती गणेशोत्सव हा नित्यवर्षी साजरा केला जातच होता. या वेळी गणेशाची मूर्ती ही शाडूच्या मातीची पूजली जात होती. पण त्याची जागा प्लास्टर ऑफ पॅरिसने घेतली आणि प्रदूषणाच्या प्रश्नाला सुरुवात झाली. वास्तविक पाहता प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती विसर्जित केल्यानंतर त्यामुळे नैसर्गिक जलस्रोत अडवले जातात. कारण प्लास्टर ऑफ पॅरिसची गणेशमूर्ती पाण्यात न विरघळता त्याचा दगड होतो. त्याचबरोबर या गणेशमूर्तीला दिलेल्या रासायनिक रंगांमुळे मोठ्या प्रमाणात जल प्रदूषण होते. याच्या जोडीला गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत डॉल्बी साऊंडमुळे निर्माण होणारे ध्वनी प्रदूषण ही आणखी एक समस्या आहे. या सर्व प्रश्नांकडे पाहिल्यास हे सर्व प्रश्न मानवनिर्मित आहेत.

## व्यापक जनजागृती आवश्यक

गणराया गजानन म्हणजे बुद्धिदेवता, शक्तीदेवता आणि सामर्थ्यदेवता म्हणून गणली जाते. संत ज्ञानदेवांनी 'ओम नमोजी आद्या' या श्लोकातून गणरायाला वंदन करून ओमकार रूपाचे स्मरण केले होते. मग अशा चौदा विद्या व चौसष्ट कलांच्या अधिपतीचे नाते समृद्ध निसर्गाशी घट्ट करण्यासाठी आपण डोळसपणे या उत्सवाकडे पाहायला हवे. मग यासाठी सर्वसामान्य नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करणे आवश्यक असल्याचे लक्षात आले होते.

याबाबत जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या दहा वर्षांपासून विशेष प्रयत्न केले आहेत. केवळ कायद्याच्या बंधनातून प्रदूषणावर



नियंत्रण मिळवणे हे अशक्यप्राय आहे. त्याकरिता सर्वसामान्य नागरिकांच्या मानसिकतेत व्यापक बदल करण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या काही वर्षांपासून राज्यातील अग्रगण्य वर्तमानपत्रे, दूरचित्रवाहिन्या, रेडिओ वाहिन्या यांच्या सहकार्याने विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

दहा वर्षांपूर्वी 'इको-फ्रेंडली गणपती' ही संकल्पना फारशी रुजली नव्हती, पण गेल्या पाच वर्षांत पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणी वाढू लागली आहे. बाजारातील आर्थिक उलाढालीच्या नियमाप्रमाणे 'मागणी तसा पुरवठा' या पद्धतीने पेणसारख्या गणपतीचे माहेरघर असणाऱ्या तालुक्यात अनेक कारखानदार शाडूच्या मातीच्या मूर्ती तयार करू लागले आहेत. गेल्या पाच वर्षांचा अंदाजे आढावा घेतल्यास पेणमधील अनेक मूर्तिकारांनी शाडूच्या मातीच्या मूर्ती तयार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. याचे कारण मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांत ते अगदी परदेशापर्यंत पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणी वाढू लागली आहे. त्याबरोबरीने इको-फ्रेंडली डेकोरेशनदेखील आज बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. अनेक ट्रक थर्माकोल विकणाऱ्या नानासाहेब शेंडकर यांच्यासारख्या व्यावसायिकांनी केवळ नफा मिळतो म्हणून हा व्यवसाय न करता त्यात बदल करून पर्यावरणपूरक रेडिमेड सजावट उपलब्ध करून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. श्री गणेश कला केंद्राचे प्रमोद बेंद्रे, चैतन्य तागडे यांनी संपूर्ण राज्यात पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती विक्रीकरिता मोठी आघाडी घेतली आहे, तर केवळ पर्यावरणपूरक गणेशमूर्तीच तयार केल्या जातात, असे गणेश मूर्तिकार आहेत कणकवलीचे प्रमोद पालव. त्यांनी गेल्या १५ वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करायला सुरुवात केली होती. आज प्रमोद पालव यांच्या दोन हजार इको-फ्रेंडली मूर्ती मुंबई शहरात विकल्या जात आहेत. त्याबरोबर सहा वर्षांपूर्वी विलेपार्ले कोल डोंगरी विभागातील क्रांतिमित्र मंडळाची २१ फुटी पर्यावरणपूरक गणपतीची मूर्ती पालव यांनी घडवली होती. या मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच करण्यात आले होते. या प्रेरणेतून गत वर्षापर्यंत मुंबई शहरात २०० पेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरणस्नेही गणेशमूर्तींची स्थापना केली

आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दशकभरात विविध जनजागृतीपर उपक्रमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा याकरिता व्यापक जनजागृती मोहीम राज्यातील अग्रगण्य वर्तमानपत्रे, दूरचित्रवाहिन्या यांच्या माध्यमातून आयोजित केली जात आहे. त्याचबरोबर मंडळाने श्री गणेश कला केंद्र, गणगौरव आर्ट्स, पर्यावरण दक्षता मंच, मंगलमूर्ती डॉट कॉम, ई-गणेशा अशा काही सामाजिक संस्थाच्या सहकार्यातून मुंबई शहर व आजूबाजूच्या परिसरात किमान एक लाखापेक्षाही जास्त घरगुती गणेशमूर्ती उपलब्ध होतील, असा प्रयत्न केला आहे व याला भरघोस प्रतिसाद मिळत आहे.

श्री गणेश कला केंद्र, मुंबई पुणे या संस्थेच्या सहकार्याने मुंबई, पुणे व उर्वरित



राज्यातील २५० डिजिटल सिनेमा थिएटर्समध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृतीचे संदेश नामवंत चित्रपट कलावंतांच्या सहकार्यातून प्रसारित केले जात आहेत. या पाच वर्षांच्या जनजागृतीपर अथक प्रयत्नातून आज मुंबईसारख्या शहरात, राज्यातील इतर महत्त्वाच्या शहरात किंवा ग्रामीण भागात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणी प्रचंड वाढत आहे.

गेली काही वर्ष महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महाराष्ट्र येथे पर्यावरणस्नेही गणेशमूर्तींचे विक्री स्टॉल लावण्यात आले आहेत. श्री गणेश कला केंद्र या संस्थेचे प्रतिनिधी प्रमोद बेंद्रे यांनी मुंबई शहरात, तर पुणे येथे चैतन्य तागडे यांनी उभारलेले पर्यावरणस्नेही गणेशमूर्तींच्या स्टॉल्सने पर्यावरणस्नेही गणेशमूर्तींची चळवळ व्यापक झाली आहे. पुणे येथे चैतन्य तागडे यांनी गणेश कला केंद्राच्या माध्यमातून 'प्लास्टर ऑफ पॅरिसच्या भावात पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती' या आयोजित केलेल्या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. याचाच अर्थ पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सर्वजण तयार आहेत. पण त्याकरिता पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची उपलब्धतादेखील असणे आवश्यक आहे. त्याकरिता मंडळाने जास्तीत जास्त पुढाकार घेऊन ही मागणी पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. कोणताही प्रश्न मांडण्यापेक्षा तो सोडवण्यासाठी सकारात्मक भावनेतून काम केल्यास त्याला निश्चितच चांगला प्रतिसाद मिळतो. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या वतीने विविध सामाजिक जनजागृतीपर उपक्रमाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जात असते. याला लोकांचा मिळणारा भरघोस पाठिंबा हेच या चळवळीचे यश मानायला हवे.

## निसर्गाशी नाते जोडू या...

वास्तविक पाहता पर्यावरण व प्रदूषणाविषयी हे सर्व प्रश्न नियंत्रित करण्यासाठी सर्वसामान्य माणसाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. केवळ कायदे करून हे प्रश्न सुटणार नाहीत त्याकरिता व्यापक मानसिक परिवर्तनाची नितांत गरज आहे. याबाबत शासनाने कितीही ध्येयधोरणे ठरवली तरी त्यांच्या अंमलबजावणीकरिता सर्वसामान्यांचे सहकार्य ही महत्त्वाची बाब आहे. उदाहरणार्थ प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी असतानाही अनेक ठिकाणी यांचा दिसणारा वापर, ही गोष्ट आपण टाळायला हवी. म्हणूनच कोणत्याही परिवर्तनाची सुरुवात आपल्या घराच्या उंबरठ्यापासून सुरू करायला हवी. जसे आपण आपल्या कुटुंबात सहकार्याच्या भावनेतून सर्व सहमतीने कुटुंबात येणारे विविध प्रश्न सोडवत असतो, त्याच पद्धतीने या राज्यातील नागरिकांनी शासनालादेखील याच भावनेतून सकारात्मक सहकार्य करत संघटितपणे मदत केली, तर सामाजिक स्तरावरचे पर्यावरणाचे बहुतांशी प्रश्न सहज सुटू शकतात. याकरिता या गणेशोत्सवात निश्चय करू या, समृद्ध निसर्गाशी नाते जोडण्याचा.

**(लेखक हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**

**महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास साधण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार राज्य शासनामार्फत १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)ची स्थापना करण्यात आली. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी तत्कालीन वित्तमंत्री स. गो. बर्वे यांच्यासमवेत महामंडळाचे बीज रोवले. आज, महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेले आणि अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध असलेले प्रगत राज्य झाले आहे.**

# पर्व औद्योगिक क्रांतीचे !

**अभिजित घोरपडे**

मुंबईलगत असलेल्या ठाण्यातील वागळे इस्टेट येथे केवळ एका औद्योगिक वसाहतीपासून सुरुवात झाली, परंतु आज एमआयडीसीमध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांत असलेल्या आपल्या प्रादेशिक आणि विभागीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात २८९ हून अधिक औद्योगिक वसाहती उभ्या आहेत. एमआयडीसीने २.२५ लाख एकरपेक्षा जास्त जमीन विकसित केली असून तेथे अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## अद्ययावत पायाभूत सुविधा

राज्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक असतो. रस्ते महामार्ग, रेल्वे, हवाई आणि समुद्री वाहतूक, बंदरे या दळणवळणाच्या साधनांमुळे दैनंदिन जीवन सुलभ होते. राज्यात औद्योगिक क्षेत्रात अशा सुविधांचे मोठे जाळे विणण्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. राज्यात पाणी, वीज, रस्ते, पथदिवे, जलशुद्धीकरण व सांडपाणी प्रक्रिया केंद्र इत्यादी पायाभूत सुविधा एमआयडीसीमार्फत पुरवल्या जातात. यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही राज्यातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारी महाराष्ट्र शासनाची नोडल एजन्सी आहे. एमआयडीसीमार्फत उद्योगांना अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करणारी एमआयडीसी ही महाराष्ट्र शासनाची प्रमुख संस्था आहे. एमआयडीसीने आजवर विशेष औद्योगिक क्षेत्रे म्हणजेच सेझ, सिल्व्हर झोन, आयटी, बीटी, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) आणि रत्नांसाठी विशेष औद्योगिक पार्क तयार केले आहेत.

एमआयडीसीने २८९ औद्योगिक वसाहती विकसित केल्या असून त्यामध्ये २५३ मोठी औद्योगिक क्षेत्रे, २५ लघुक्षेत्रे, तर ११ विकास केंद्रांचा समावेश आहे. ही क्षेत्रे अतिशय किफायतशीर दरात उपलब्ध असून प्लग आणि प्ले इन्फ्रास्ट्रक्चर या उपक्रमा अंतर्गत उद्योगांना रेडी-टू-मूव्ह-इन फॅक्टरी शेड्स म्हणजेच थेट उत्पादनासाठी भाडेतत्त्वावर अद्ययावत सुविधा पुरवण्यात येणार आहेत. एमआयडीसीने आयडीबीआय बँकेच्या सहकार्याने एअरोस्पेस आणि डिफेन्स क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी व्हेंचर कॅपिटल फंड तयार केला आहे. औरंगाबाद आणि नागपूर येथे सीईपीईटीच्या सहकार्याने कौशल्य विकास केंद्रांना प्रोत्साहन देऊन कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. एमआयडीसीची पाणीपुरवठा योजना आशिया खंडात सर्वात मोठी आहे. महाराष्ट्रातून जाणाऱ्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी एमआयडीसी ही नोडल एजन्सी आहे.

## ४५ हजार एकर जमीन

एमआयडीसीने ४५ हजार एकरहून अधिक जमीन उद्योगांसाठी अधिग्रहित केली आहे. यात मुंबई - ठाणे रायगड (१५,००० एकर), पुणे - चाकण - तळेगाव - सातारा (८००० एकर), नाशिक - मालेगाव - अहमदनगर (५००० एकर), औरंगाबाद (ऑरीक - डीएमआयसी) व जालना (१०,००० एकर), नागपूर - अमरावती (४००० एकर) आणि रत्नागिरी

एमआयडीसी औद्योगिक वसाहत



- सिंधुदुर्ग (५१५० एकर) जमिनीचा समावेश आहे.

## सर्वात मोठी पाणीपुरवठा यंत्रणा

एमआयडीसीकडे आशियातील सर्वात मोठी पाणीपुरवठा यंत्रणा आहे. याद्वारे दररोज २५०० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. गेल्या दोन वर्षात एमआयडीसीद्वारे सरासरी १४२२.३५ एमएलडी पाणीपुरवठा केला गेला आहे. वागळे इस्टेट, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, टीटीसी, तळोजा, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ, बदलापूर इ. औद्योगिक क्षेत्रांना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा करण्यासाठी एमआयडीसीने १९७२ मध्ये बदलापूरजवळील पिंपळोली गावाजवळ बारवी नदीवर १३०.४० एमसीएम क्षमतेचे धरण बांधले. पाण्याच्या मागणीतील वाढ लक्षात घेऊन, बारवी धरणाची उंची वाढवून याची क्षमता १७८.२६ एमसीएम करण्यात आली. तर २०१९ मध्ये धरणाच्या एकूण क्षमतेत ३४०.४८ एमसीएम इतकी वाढ झाली.

**वीज** : एमआयडीसीकडे भारतातील विजेची सर्वाधिक म्हणजेच ४३ गिगावॅट इतकी स्थापित क्षमता आहे. तसेच अपारंपरिक उर्जा निर्मितीसाठी ९ गिगावॅट इतकी चौथी सर्वात मोठी क्षमता स्थापित आहे.

## सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प

एमआयडीसीच्यावतीने औद्योगिक क्षेत्रात १९ कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट म्हणजेच सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आले आहेत. तळोजा औद्योगिक क्षेत्रामध्ये जुन्या प्रकल्पांचे विस्तारीकरण व अद्ययावतीकरण करून २७.५० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. तारापूर एमआयडीसीत ५० एमएलडी क्षमतेचा सीईटीपी तयार आहे. रोहा औद्योगिक क्षेत्रासाठी २२.५० एमएलडी क्षमतेचा सीईटीपी तयार होत आहे, तर अतिरिक्त अंबरनाथ, कोल्हापूर आणि अतिरिक्त बुटीबोरीमध्ये सीईटीपीचे बांधकाम सुरू आहे.

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

- महाराष्ट्र-भारताच्या विकासाचे पॉवर हाऊस
- महाराष्ट्र हे क्षेत्रफळाने तिसरे आणि लोकसंख्येने दुसरे सर्वात मोठे राज्य
- भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था
- महाराष्ट्राच्या जीएसडीपीचा आकार ४०२ अब्ज; देशाच्या जीडीपीच्या १४%
- एफडीआयमध्ये सर्वात मोठा हिस्सा
- २०००-२०२० मध्ये १४० अब्ज एफडीआय आकर्षित, भारताच्या हिश्श्यापैकी ३०% हिस्सा
- उत्पादनामध्ये अग्रेसर
- भारतामध्ये औद्योगिक उत्पादनाचा महाराष्ट्राचा हिस्सा १५% आहे.
- दर्जेदार पायाभूत सुविधा
- ३ आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळे, २ प्रमुख आणि ५३ लघु पोर्ट्स
- ४३ जीडब्ल्यूची सर्वात मोठी पॉवर क्षमता (२९ जीडब्ल्यू थर्मल, ३ जीडब्ल्यु हायड्रो, १ जीडब्ल्यू न्युक्लिअर, ९ जीडब्ल्यु अक्षय)
- निर्यातीचे सर्वाधिक मूल्य ५८ अब्ज डॉलर्स, भारताच्या निर्यातीत २०% हिस्सा आहे.
- उत्कृष्ट गुणवत्ता कार्यबल
- दरवर्षी सुमारे ४ लाख विद्यार्थी पदवीधर होत असलेल्या भारतात रोजगारक्षम नवीन प्रतिभेच्या कर्मचाऱ्यांची सर्वोच्च पातळी
- भारतातील सर्वोत्तम कौशल्य विकास संस्था
- १००० अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालये आणि ९५८ आयटीआय असणारे आघाडीचे राज्य.
- भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची सर्वात मोठी संख्या ९७ दशलक्ष आहे. १३३ दशलक्ष टेलिकॉम ग्राहक आणि १०९% टेलिडेन्सिटी.

## रस्त्यांचे जाळे

राज्यात २.५ लाख कि.मी. लांबीच्या रस्त्याचे जाळे उपलब्ध आहे. त्यात एमआयडीसीने गेल्या दोन वर्षात २७२ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले आहेत. राज्यात ५ आंतरराष्ट्रीय विमानतळ, १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख बंदरे आणि ५३ लहान बंदरे हवाई आणि समुद्री वाहतुकीसाठी उपलब्ध आहेत. एमआयडीसी लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करण्यासाठी साहाय्य करते. यात वेअरहाऊस, कोल्ड स्टोरेज, मल्टी-मोडल लॉजिस्टिक पार्क्सचा समावेश आहे. प्रधानमंत्री गती शक्ती योजनेद्वारे येत्या काही वर्षांत दळणवळणाला चालना दिली जाईल.

## औद्योगिक क्लस्टर आणि उद्याने

एमआयडीसीने राज्यात २०० हून अधिक औद्योगिक क्लस्टर्स विकसित केली आहेत. यात प्रामुख्याने फूड प्रोसेसिंग, टेक्सटाइल, इंजिनिअरिंग, ईएसडीएम, ऑटोमोबाइल्स क्लस्टरचा समावेश आहे. ही क्लस्टर्स मुंबई आणि ठाणे, पुणे, सोलापूर, अहमदनगर - नाशिक, अमरावती - नागपूर आणि औरंगाबाद या सहा विभागांमध्ये स्थित आहेत. औद्योगिक क्लस्टरच्या विकासासह एमआयडीसीने खालील सेक्टर स्पेसिफिक पार्क विकसित केले आहेत.

- हाय-टेक ईएसडीएम पार्क्स - रांजणगाव आणि तळेगाव
- फार्मास्युटिकल आणि बल्क ड्रग्ज पार्क्स - साळाव आणि शाहपूर - धेरंड
- मेगा फूडपार्क - ऑरीक, दिंडोरी, खालापूर, सिन्नर
- मेगा टेक्सटाइल पार्क - अमरावती, नवापूर
- संरक्षण आणि अंतराळ - बुटीबोरी
- स्टार्टअप आणि डेटासेंटर - नवी मुंबई, मुंबई, पुणे
- वैद्यकीय उपकरणे - ऑरीक, पुणे, सिंधुदुर्ग
- एकात्मिक मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्क्स - चाकण, खालापूर आणि भिवंडी
- जेम्स अँड ज्वेलरी पार्क - तळोजा
- बायोटेक्नॉलॉजी पार्क - दिंडोरी
- प्लास्टिक पार्क - मालेगाव

## भविष्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प

महाराष्ट्राने ४० अब्ज डॉलर्सहून अधिक गुंतवणुकीच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे




एमआयडीसी मुख्यालय, मुंबई

नियोजन केले आहे. सध्या राज्यात ३० हून अधिक मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प निर्माणाधीन असून याचा ४८ दशलक्ष नागरिकांच्या आयुष्यावर परिणाम होईल. भविष्यात राज्याचा चेहरामोहरा बदलून टाकतील अशा अनेक प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर आहेत. यात प्रामुख्याने दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, रायगड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, मुंबई कोस्टल रोड प्रकल्प व मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग यांचा समावेश आहे.

औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी नवनवीन धोरणे आखली जात आहेत. यात प्रामुख्याने राज्याने जाहिर केलेले इलेक्ट्रिक वाहन धोरणाचा समावेश आहे. मात्र, केवळ ई-वाहने आणून चालणार नाही तर या वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या चार्जिंगसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यास चालना देणे गरजेचे आहे. राज्याने त्यासाठीही विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पायाभूत सुविधा क्षेत्रात महाराष्ट्राची पकड वाढत आहे. यातून महाराष्ट्राचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

## पूरग्रस्तांसाठी महामंडळाची मदत

कोकण तसेच पश्चिम महाराष्ट्रातल्या काही जिल्ह्यांत २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले असल्याने त्यांना जीवनावश्यक वस्तुंच्या मदतीची गरज भासत होती. याचा विचार करून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या हेतूने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पुढाकार घेत राज्यातील कंपन्यांना सीएसआर फंडाच्या माध्यमातून मदत करण्याचे आवाहन केले होते.

त्यास अनेक कंपन्यांनी प्रतिसाद देत चिपळूण, खेड व महाड तालुक्यातील पूरग्रस्तांना भरीव मदत एमआयडीसीमार्फत उपलब्ध करून दिली. एमआयडीसीने एकूण ३,२५,००,००० रुपये इतक्या रकमेच्या वस्तू पूरग्रस्तांना उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला.

## कोरोना काळात मदतीचा हात

कोरोना या साथरोगाचा प्रसार राज्यात झाल्यानंतर सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून मदत करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास सर्वस्तरावरून मोठा प्रतिसाद लाभला होता. राज्यातील अनेक लहान-मोठ्या उद्योगांनी सॅनिटायझर, फेस मास्क, हॅन्डग्लोज, पीपीई किट, थर्मामिटर, व्हेंटिलेटर्स, डायलेसिस मशिन, ऑक्सिजन कॉन्सट्रेटर्स, बेडशिट्स इ. वैद्यकीय बाबींसाठी ४२८ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची मदत महामंडळामार्फत केली. त्यात मर्क लाईफ सायन्सेस, आयसीआयसीआय बँक, इन्फोसिस, बजाज, सिमेन्स, महिंद्रा, फ्लिपकार्ट, फोक्सवॅगन इ. अनेक कंपन्यांनी आपले योगदान दिले.

मुख्यमंत्री साहाय्यता निधीमध्ये १०७ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा करण्यात आली. सीएसआरमधून उपलब्ध झालेल्या वस्तू, जसे की फेसमास्क, पीपीई किट, सॅनिटायझर, हॅन्डग्लोव्हज, थर्मामीटर, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन कॉन्सट्रेटर्स, डायलेसिस मशिन, फूड पॅकेट्स, गरजवंतांना पोहोचवण्यात आल्या. धारावीसारख्या संवेदनशील भागात महामंडळामार्फत अन्नधान्य पुरवठा करण्यात आला.

एमआयडीसी ही महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा अविभाज्य घटक आहे. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या अनेक प्रमुख कार्यक्रमांमध्ये एमआयडीसी आघाडीवर असते. राज्य सरकारच्या सर्वात व्यावसायिक आणि कार्यक्षम कॉर्पोरेशन्समध्ये एमआयडीसी अग्रणी आहे आणि औद्योगिक मूल्य शृंखलेत एमआयडीसीने आपले अस्तित्व प्रस्थापित केले आहे.

एमआयडीसीने नेहमीच एक पाऊल पुढे राहण्याचा सतत प्रयत्न केला आहे आणि महाराष्ट्राच्या भवितव्याची बांधणी केली आहे. राज्य शासनाने एमआयडीसीला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून आणि गुंतवणूक प्रोत्साहन संस्था म्हणून जबाबदारी दिलेली आहे. एमआयडीसीला जागतिक मंचावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अनेकदा मिळाली आहे, ही जबाबदारी समर्पितपणे पार पाडली आहे. एमआयडीसी केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील सर्वोत्तम औद्योगिक महामंडळांपैकी एक बनण्यासाठी आणि

महाराष्ट्राच्या विकासात अधिकाधिक योगदान देण्यासाठी सक्षम आहे.

राज्याच्या अर्थचक्रास गती देणारा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे एमआयडीसीमार्फत होत असलेली गुंतवणूक. २०१६ मधील भारतातील पहिला मेक इन इंडिया आणि २०१८ मधील मॅग्नेटिक महाराष्ट्र या परिषदेत एमआयडीसी नोडल एजन्सी होती, त्यात ९,११,३३४ कोटी रुपयांच्या एकत्रित मुल्यासह २७७५ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. त्यानंतर एमआयडीसीने गेल्या दोन वर्षांत १२३ सामंजस्य करार केले आहेत. या गुंतवणुकीव्यतिरिक्त, महाराष्ट्र राज्याने एप्रिल २०१६ ते मार्च २०२२ पर्यंत जवळजवळ ६.८ लाख कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूकदेखील आकर्षित केली आहे, त्यात भारताच्या जवळपास ३०% वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे. गुंतवणुकीस चालना मिळाल्यामुळे महाराष्ट्राला वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे ध्येय गाठण्यामध्ये निश्चितच मदत होईल.

### मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०

### ६ लाख कोटी रुपयांच्यावर गुंतवणुकीस चालना

- एकूण १२३ (जून २०२० - मे २०२२) गुंतवणूक करार २,७० कोटी रुपये
- संभाव्य रोजगार निर्मिती ४,३०,२०२
- प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक २,८८,९०५ कोटी रुपये (ऑक्टोबर २०१९ - मार्च २०२२)
- नियमित गुंतवणूक ६२,९६३ कोटी रुपये (डिसेंबर २०२० पासून)

### रिलेशन मॅनेजर्स व एक्झिक्युटिव्हज्

गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करून त्यांना गुंतवणुकीबाबत सर्वतोपरी मदत करण्यासाठी रिलेशनशिप मॅनेजर्स (आरएम) आणि रिलेशनशिप एक्झिक्युटिव्हज् (आरई) नियुक्त केले जातात.

### प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा : ६ क्षेत्रे, ५,९५० एकर, ४५० शेड्स

१०० टक्के पर्यावरणपूरक वातावरणात परवडणाऱ्या दरात आधुनिक सुविधांनी युक्त शेड निर्मितीचे ध्येय आहे.

### लँड बँक

राज्याच्या २८९ एमआयडीसीमध्ये २.२५ लाख एकर जमीन आहे. शिवाय मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत राज्याने ६०,००० एकरपेक्षा जास्त जमीन औद्योगिक वापराकरिता विकसित करण्यासाठी राखून ठेवली आहे.

एमआयडीसी आज, नवीन युगातील तंत्रज्ञानासह विविध धोरणे सक्षमपणे राबवत आहे आणि पायाभूत सुविधादेखील तयार करत आहे, जेणेकरून नवनवीन उद्योग महाराष्ट्रात यशस्वीपणे स्थापित केले जातील आणि स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल.

औद्योगिक विकास आणि गुंतवणुकीच्या संदर्भात राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर एमआयडीसी राज्याचे प्रतिनिधित्व

शेंद्रा एमआयडीसी, औरंगाबाद



### महापरवाना

- २०+विभाग, १००+परवानग्या
- गुंतवणूकदारांना ४८ तासात कामकाज सुरू करण्यासाठी एक खिडकी योजना प्रणाली.

### समर्पित विदेश कक्ष

महाराष्ट्रामध्ये प्राधान्याने गुंतवणूक करणाऱ्या १५ देशांसाठी समर्पित विदेश कक्ष तयार करण्यात आले असून विदेशी गुंतवणूकदारांना माहिती देऊन त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना गुंतवणुकीसाठी साहाय्य करण्यासाठी रिलेशनशिप मॅनेजर्स व रिलेशनशिप एक्झिक्युटिव्हज् नेमण्यात आले आहेत.

यशस्वीरीत्या करत आहे. एमआयडीसी आपल्या ६० वर्षांच्या गौरवशाली प्रवासात महाराष्ट्रातील औद्योगिक आस्थापनांसाठी जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे.

महाराष्ट्राच्या यशात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने समर्पक भूमिका बजावली आहे. एमआयडीसीच्या स्थापनेच्या हीरक महोत्सवाचे औचित्य साधून हीच यशोगाथा मोठ्या दिमाखात साजरी करण्यात येत आहे. गेल्या ६० वर्षांत एमआयडीसीच्या यशात ज्यांनी-ज्यांनी योगदान दिले, त्या प्रत्येकाचा हा गौरव आहे.

(लेखक हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक (जनसंपर्क) आहेत.)


नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वंशाचे लेखक व्ही. एस. नायपॉल यांना मुंबईतील वास्तव्यात नामदेव ढसाळ यांनी कामाठीपुरा या वेश्यावस्तीसह पिचलेल्या लोकांच्या जगाचे दर्शन घडवले. पुढे नायपॉल यांनी त्यांच्या 'इंडिया – अ मिलियन म्युटिनीज नाऊ' या ग्रंथात नामदेव ढसाळ यांना एक संपूर्ण प्रकरण समर्पित करून कवी म्हणून नामदेव ढसाळ यांची अभिजातता जगापुढे आणली. अरुण कोलटकरांसोबतच नामदेव ढसाळांनी मराठी कवितेला जागतिक स्तरावर स्थान मिळवून दिले.

वाचू आनंदे

# आधुनिक प्रतिभावंत कवी

**दीपक कपूर**

महान संत कवी तुकाराम महाराज शब्दांचा गौरव करताना म्हणतात, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू । शब्दे वाटू धन जनलोका । तुका म्हणे पाहा शब्दची हा देव । शब्देची गौरव पूजा करू ।




तुकाराम महाराजांप्रमाणेच शब्दांचा गौरव करणारे, कवी अरुण कोलटकर यांच्याव्यतिरिक्त मराठीतील कवी म्हणजे नामदेव ढसाळ. नामदेव ढसाळ मराठी कवितेतील असा आवाज आहे, ज्याने प्रभावी प्रतिमा आणि विद्रोही भाषेद्वारे संपूर्ण व्यवस्थेच्या विरोधात एका चळवळीला जन्म दिला, त्यातून मराठी साहित्याच्या विश्वात आधुनिक प्रतिभावंत कवी म्हणून त्यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. मुंबईतील वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या गोलपिठा या भागातील जीवनसंघर्षाचा वेध घेणाऱ्या त्यांच्या गोलपिठा या कवितासंग्रहाने मराठी कवितेत वास्तववादी लेखनाचे वादळ आणले, जे यापूर्वी कधीही अनुभवले गेले नव्हते. महाराष्ट्राच्या सौहार्दपूर्ण सामाजिक जडणघडणीला नख लावणाऱ्या कठोर जातिव्यवस्थेविरुद्धचा त्यांचा हा एल्गार होता. ते म्हणतात,

***'येथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच असतो***
***म्हणून फांदीला नुसता सांगाडाच***
***लटकवून भागत नाही रे***
***इथे पापणीलाच केस नसतो***
***आणि बुबळांच्या काचा झालेल्या***
***असतात रे'***

नामदेव ढसाळ यांची कविता अशी कडवट, संतप्त आणि हताश आहे. कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे नामदेव ढसाळ यांना २०व्या शतकातील सर्वात मोठे कवी मानतात. ते म्हणतात, नामदेव ढसाळ हे वॉल्ट व्हिटमन आणि नेरुदा यांच्या पंक्तीतले मोठे कवी आहेत. पण वॉल्ट व्हिटमन आणि नेरुदा यांच्यापेक्षा ढसाळ यांच्या कवितांमध्ये जगाच्या वास्तववादी आणि काळ्याकुट्ट बाजूचे भेदक चित्रण दिसून येते. नामदेव ढसाळ यांनी मराठी कवितेच्या मातीचे चक्र अशा वाईट आणि टाकाऊ मानल्या गेलेल्या द्रव्यांनी पुनर्स्थापित केले, जी भविष्यात तिच्या वाढीसाठी पोषक ठरतील.

नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वंशाचे लेखक व्ही. एस. नायपॉल यांना मुंबईतील वास्तव्यात नामदेव ढसाळ यांनी कामाठीपुरा या वेश्यावस्तीसह पिचलेल्या लोकांच्या जगाचे दर्शन घडवले. पुढे नायपॉल यांनी त्यांच्या इंडिया - अ मिलियन म्युटिनीज नाऊ या ग्रंथात ढसाळ यांना एक संपूर्ण प्रकरण समर्पित करून कवी म्हणून नामदेव ढसाळ यांची अभिजातता जगापुढे आणली. अरुण कोलटकरांसोबतच नामदेव ढसाळ यांनी मराठी कवितेला जागतिक स्तरावर स्थान मिळवून दिले.

नामदेव ढसाळ प्रतिभावान कवी तर होतेच आणि त्यांनी लिहिलेल्या दोन प्रभावी कादंबऱ्यांमधून त्यांच्यातील उत्तम लेखकदेखील दिसला. वृत्तपत्रांमध्ये त्यांनी स्तंभलेखन केलेल्या लेखांचा एक मोठा संग्रह 'आंधळे शतक' या नावाने प्रकाशित करण्यात आला आहे.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आईच्या छत्रछायेखाली वाढताना जगण्याच्या संघर्षात त्यांना जातीयवादाच्या कडवट अनुभवांचा सामना करावा लागला होता. त्यातूनच पुढे त्यांनी विद्रोहाची तुतारी फुंकली.

टी. एस. एलियटच्या 'द वेस्टलँड' या अभिजात संग्रहाप्रमाणेच त्यांचा गोलपिठा हा संग्रह मराठीतील अभिजात मानला गेला आणि त्यांच्या साहित्यसेवेतील योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. गोलपिठानंतर नामदेव ढसाळ यांचे एकाहून एक सरस व मर्मभेदक असे आणखी सहा कवितासंग्रह आले, तरीही नामदेव ढसाळ हे प्रामुख्याने 'गोलपिठाकर' म्हणूनच ओळखले जातात. संतप्त, दुखावलेले आणि बंडखोरीने पेटून उठलेले नामदेव ढसाळ त्यांच्या शब्दांतून जणू तप्त लाव्हारस ओततात.

अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात
किती दिवस राहायचं आम्ही?
श्वास घुसमटत!
लक्तरांत गुंडाळलेली आमुची अब्रू
गोलपिठ्यावर नागविणाऱ्यांनो -
-- तुमचा ऱ्हास जवळ आलाय

शेवटी शोकांतिका नामदेव ढसाळ यांची नाही. शोकांतिका आहे ती व्यवस्थेची. जिने हे ओळखले आहे की, नामदेव ढसाळ यांचे साहित्य आता अधिकाधिक भाषांमध्ये भाषांतरित झाले असून जगभरातील लोकांना मराठीतील या महान कवीची ओळख झाली असली, तरी आता फारसा फरक पडणार नाही. किंबहुना नामदेव ढसाळ यांनी म्हटल्याप्रमाणे गोष्टी जितक्या बदलतात, तितक्या त्या तशाच राहतात.

(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अपर मुख्य सचिव तथा महासंचालक आहेत.)

**राज्य शासनामध्ये निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. जनहिताचे विविध निर्णय झपाट्याने घेतले जात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणीचा आढावा घेत प्रशासनास काही सूचना, निर्देश दिले आहेत. तसेच राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांना कोविड प्रतिबंधक लशीचा दुसरा तसेच बुस्टर डोस देण्यासाठी नियोजन करून लसीकरणाची गती वाढवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी कोविड व्हॅक्सिन अमृतमहोत्सव अंतर्गत लसीकरणाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला आहे, अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा..**

# पाऊल पडते पुढे

## लसीकरणाचा प्रारंभ

राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसीचा दुसरा तसेच बुस्टर डोस देण्यासाठी नियोजन करून लसीकरणाची गती वाढवावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कोविड व्हॅक्सिन अमृतमहोत्सव अंतर्गत लसीकरणाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. विधिमंडळातील समिती कक्षात सुभाष पाटील आणि अशका पवार यांना लस देण्यात आली. परिचारिका लता कोहाड यांनी त्यांना लस दिली.

या वेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास, अपर मुख्य सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालक दीपक कपूर, आरोग्य आयुक्त डॉ. रामास्वामी एन.,आरोग्य संचालक डॉ. साधना तायडे आदी उपस्थित होते.

केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशानुसार ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत कोविड व्हॅक्सिन अमृतमहोत्सवांतर्गत सर्व शासकीय केंद्रांवर १८ वर्षांवरील सर्व नागरिकांना मोफत लस दिली जाणार आहे. मात्र नागरिकांनी कोविड प्रतिबंधक लसीच्या दुसरी मात्रा घेऊन सहा महिने अथवा २६ आठवड्यांचा कालावधी पूर्ण केलेला असावा, अशा सूचना देण्यात आल्या.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत
कोविड व्हॅक्सिन अमृतमहोत्सव अंतर्गत लसीकरणाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला.

## महामंडळाच्या माध्यमातून विकास

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या माध्यमातून या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना, या समाज घटकासाठी विनातारण कर्ज योजना राबवणार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न मिळावा यासाठी शासन स्वतः केंद्राकडे शिफारस करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

चेंबूर येथील फाईन आर्ट्स कल्चरल सेंटरमध्ये आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०२ व्या जयंती महोत्सव कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार राहुल शेवाळे, आमदार प्रकाश फातर्पेकर, सुधाकर भालेराव, मंगेश कुडाळकर, नरेंद्र भोंडेकर, सामाजिक कार्यकर्त्या कुसुमताई गोपले, समाज कल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बार्टी)चे महासंचालक धम्मज्योती गजभिये, सहसचिव दिनेश डिंगळे, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे संचालक अनिल आहिरे यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे खूप मोलाचे योगदान होते. सर्वसामान्य माणसाला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत

जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी केले. त्यांचे साहित्य व पोवाडा यातून तत्कालिन परिस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब दिसते. त्यांनी अविरतपणे वंचितांसाठी काम केलेच. परंतु मराठी भाषेची पताका सातासमुद्रापलीकडे नेण्याचे महत्त्वपूर्ण कामही त्यांनी केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या राहत्या घराचे भव्य स्मारक व्हावे यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर काम करेल. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अधिकाधिक सक्षम करून या समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येतील. उच्च शिक्षणासाठी प्राधान्याने योजना राबवण्यात येतील, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

या वेळी प्रवासी वाहतुकीकरिता कर्ज योजनेसाठी गौरव लोंढे यांना कर्ज योजनेचा धनादेशाचे वितरण या वेळी करण्यात आले. तसेच नांदेड जिल्ह्यातील लक्ष्मी येडवे यांना शौर्य पुरस्कार वितरण करण्यात आले.

## महामंडळाचे मोठे योगदान

महाराष्ट्राचा देशातील पहिला क्रमांक कायम राखण्यासह राज्याच्या औद्योगिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मोठे योगदान आहे. यापुढे प्रगतिपथावर जाण्यासाठी केंद्र व राज्य शासन अशी दोन इंजिन कार्यरत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हिरकमहोत्सवानिमित्ताने बांद्रा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महामंडळाचे कार्य उल्लेखनीय आहे. आतापर्यंतचे सर्वाधिक भूसंपादन महामंडळाने केले आहे. पायाभूत सुविधा उभ्या केल्या आहेत. तरुणांसाठी रोजगार निर्मिती या महामंडळाच्या माध्यमातून होत आहेत. कोविड काळात उद्योग बंद होऊ न देता काम सुरू राहिले. राज्यात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे होत आहेत. समृद्धी महामार्ग, ट्रान्सहार्बर लिंक यामुळे दळणवळण सोपे होणार आहे. पर्यायाने राज्यातील व्यवसायात वाढ होणार आहे. प्रधानमंत्री यांनी राज्याला सहकार्य करण्याचे आश्वासन दिलेले आहे. तेव्हा सगळ्यांच्या सहकार्याने औद्योगिक क्षेत्रात पुढे जाता येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

उद्योग विभागाचे माजी अपर मुख्य सचिव बलदेव सिंग, प्रधान सचिव तथा उद्योग आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी अनबलगन, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रंगानाईक, पी. डी मलिकनेर उपस्थित होते.

या वेळी 'विकास दर्पण' या माहिती पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले तर, चर्नी रोड येथे प्रस्तावित असलेले महामंडळाचे कार्यालय कसे असेल, याबाबत ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले.

## योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा

नव्या सरकारकडून प्रधानमंत्र्यांनीदेखील मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. विशेषतः केंद्र आणि राज्य भागीदारीच्या योजना अगदी शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचणे



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हीरकमहोत्सव कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

## विभाजन विभीषिका स्मृती दिवस

आपला इतिहास विसरणाऱ्या पिढीला स्वातंत्र्याचे मोल कळत नाही. त्यामुळे देशाप्रती संवेदनशील असणारी, आत्मभान असणारी नवी पिढी निर्माण करण्यासाठी विभाजन विभीषिका स्मृती दिवस पाळला जात असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांमध्ये १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन विभीषिका स्मृती दिवस केंद्र व राज्य शासनाने जाहीर केला आहे. यानिमित्त महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये फाळणी वेदना दिवस पाळला जात आहे. यानिमित्ताने 'फाळणी आणि वेदना' या विषयावर नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनात जिल्हा माहिती कार्यालयाने प्रदर्शन आयोजित केले. यामध्ये फाळणीची वस्तुस्थिती मांडली. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी फाळणीमध्ये विस्थापित झालेल्या कुटुंबांचा सन्मान व नागरिकत्व दाखले यांचे वितरण करण्यात आले, तर स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मानही करण्यात आला.



नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनात जिल्हा माहिती कार्यालयाने आयोजित केलेल्या विभाजन विभीषिका स्मृती दिवस प्रदर्शनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशिष जयस्वाल, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी प्रसन्ना-बिदरी, मनरेगा आयुक्त शर्तनू गोयल, महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्णन बी., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तरुण भारतचे मुख्य संपादक गजानन निमदेव उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कसा साजरा करावा, याबद्दलचे नियोजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव हा सरकारी नव्हे, सामाजिक उपक्रम झाला पाहिजे. देशाच्या प्रत्येक नागरिकांमध्ये सामाजिक भान निर्माण करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अधिकाधिक समाजघटक यामध्ये सहभागी झाले पाहिजे. आज आम्ही जो दिवस पाळत आहोत, हा अतिशय दुःखाचा आहे. त्यामुळे आजचा दिवस साजरा नव्हे तर पाळत आहोत असे आपण म्हटले पाहिजे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी शेषराव विश्वनाथ मुरकुटे, वसंतकुमार अनंतकुमार चौरसिया, महादेव किसन कामडी, यादवराव देवगडे, गणपतराव कुंभारे या स्वातंत्र्य सैनिकाचा सत्कार करण्यात आला, तर जनभागीदारी अंतर्गत फाळणीने विस्थापित झालेल्या खटूराम कुकरेजा, सुंगध बत्रा यांना नागरिकत्व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तसेच शोभराज तोलाराम आहुजा, अनंतकुमार आसुदानी या विस्थापित कुटुंबाचा सन्मान करण्यात आला. 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा'मध्ये कार्य करणाऱ्या ऐश्वर्या चुटे, महेश कोरे, रवी घोडेश्वार, संदीप चरडे यांना उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वज वितरण करण्यात आले.

आवश्यक आहे. त्यामुळे सरकार म्हणून नागरिकांपर्यंत पोहोचावे, आपली कार्यक्षमता वाढवतांना एकमेकांमध्ये समन्वय ठेवावा. तसेच योजनांमध्ये लोकांचाही सहभाग वाढवावा, अशी सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. राज्यातील सर्व योजनांच्या लाभार्थींना वैयक्तिकरीत्या मुख्यमंत्र्यांचे पत्र पाठवा, असेही निर्देश या वेळी देण्यात आले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात राबवण्यात येणाऱ्या केंद्राच्या योजना किती प्रमाणात लाभार्थीपर्यंत पोहोचल्या आहेत, याचा विस्तृत आढावा घेतला. या वेळी मुख्यमंत्र्यांनी सचिवांना योजनांच्या अंमलबजावणीविषयी महत्त्वाच्या सूचना केल्या.

या वेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, प्रधानमंत्र्यांच्या भेटीस गेलो असता त्यांनी केंद्र राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही दिली आहे. त्यामुळे आपली जबाबदारी वाढली असून अंमलबजावणीत कोणत्याही स्वरूपाच्या अडचणी आल्या तरी आपण त्या दूर करू. नवनवीन उपक्रमांचे स्वागत आहे. केंद्राचा जास्तीत जास्त निधी कसा मिळेल हे पाहून तत्काळ असे प्रस्ताव सादर करावेत. शासन आणि प्रशासन ही राज्य कारभाराच्या रथाची दोन चाके आहेत. दोघांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. लोकाभिमुख योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी,असेही त्यांनी सांगितले.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी विविध योजनांच्या बाबतीत काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. राज्यातील आकांक्षित जिल्ह्यांतील एका गावात पालक सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन मुक्काम करावा. वैयक्तिक लाभार्थींना आपल्या स्वाक्षरीचे पत्र द्यावे. नागरिकांचा योजनांमधील सहभाग वाढेल असे पाहावे. विशेषतः जलजीवन मिशन, कौशल्य विकास, प्रधानमंत्री आवास योजना, जनआरोग्य योजना, अटल पेन्शन योजना, पीएम गतिशक्ती, क्षयरोगाचे उच्चाटन, पीएम स्वनिधी योजना,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अशा विविध १४ योजनांच्या अंमलबजावणीचा त्यांनी आढावा घेतला.

### ब्रिटिश उच्चायुक्तांची भेट

महाराष्ट्रात उत्तम पायाभूत सुविधा तसेच कुशल मनुष्यबळ असल्याने येथे गुंतवणुकीच्या विविध संधी उपलब्ध असून इंग्लंडमधील उद्योजकांनी येथे गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ब्रिटिश उच्चायुक्त अलेक्स इलिस यांच्यासमवेत चर्चेदरम्यान केले.



**ब्रिटिश उच्चायुक्त अलेक्स इलिस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली.**

भारतातील ब्रिटिश उच्चायुक्त अलेक्स इलिस यांनी शिष्टमंडळासह मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी ब्रिटनच्या मुंबईतील उपउच्चायुक्त कॅथरीन बार्न्स, उपउच्चायुक्तांचे सल्लागार सचिन निकार्गे तसेच राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय विभागाच्या प्रधान सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी राज्यात सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी उपक्रमांबाबत ब्रिटिश उच्चायुक्तांना माहिती दिली. जागतिक दर्जाच्या समृद्धी महामार्गाचे काम पूर्णत्वास आले असून यामुळे विदर्भातील औद्योगिकीकरणास मोठी चालना मिळणार आहे. मेट्रो रेल्वे प्रकल्प, बंगळुरू-मुंबई कॉरिडॉर, कोस्टल रोड, गोवा महामार्ग असे विविध पायाभूत सुविधा प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. याचबरोबर २८ टक्क्यांसह महाराष्ट्र हे परकीय गुंतवणुकीमध्ये देशातील आघाडीचे राज्य असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आदींची उपलब्धता आहे. देशातील सर्वाधिक स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत. येथे गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना राज्य शासन सर्व ते सहकार्य करेल, असे सांगून महाराष्ट्र आणि इंग्लंडमधील घनिष्ठ संबंध भविष्यात अधिक दृढ होतील, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी या वेळी व्यक्त केला.

अलेक्स इलिस यांनी ब्रिटिश शासनाच्या वतीने व्यापार, गुंतवणूक आदींमधील संधींबाबत मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा करून महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### अधिमूल्य भरण्यास मुदतवाढ

शासनाने प्रदान केलेल्या जमिनीच्या हस्तांतरण (फ्री होल्ड) प्रक्रियेसाठी काही वेळा विलंब होतो हे लक्षात घेता अधिमूल्य भरण्याच्या कालावधीस मुदतवाढ देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शासनाने प्रदान केलेल्या जमिनीच्या (कलेक्टर लँड) हस्तांतरण (फ्री होल्ड) जमिनीचा धारणाधिकार रूपांतरणाबाबत बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला आमदार भरत गोगावले, आमदार मंगेश कुडाळकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी निधी चौधरी, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भोगवटादार वर्ग - २ चे रुपांतर वर्ग - १ मध्ये करण्याच्या अनुषंगाने सवलतीच्या दराने अधिमूल्याची रक्कम भरण्याच्या तीन वर्षांच्या पहिल्या टप्प्याच्या कालावधीस कोविडची पार्श्वभूमी विचारात घेऊन दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. फ्री होल्डच्या प्रक्रियेसाठी काही वेळेला बराच विलंब होतो हे लक्षात घेऊन अधिमूल्य भरण्याच्या कालावधीस मुदतवाढ देण्यात येईल. शासनाने प्रदान केलेल्या जमिनीच्या (कलेक्टर लँड) हस्तांतरण (फ्री होल्ड) जमिनीचा धारणाधिकार रूपांतरण करण्याकरिता ८ मार्च २०१९ च्या अधिसूचनेनुसार असलेला शुल्क बाजारमूल्यावर १० ते १५ टक्के आहे. हा शुल्क कमी करता येईल का याबाबत महसूल विभागाने अभ्यास करावा, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेंतर्गत मागासवर्गीय समाजाला जमिनी देण्यात आल्या आहेत. मागासवर्गीय योजनेंतर्गत ज्या जमिनी प्रदान केल्या आहेत, त्यांना फ्री होल्डच्या योजनेचा भाग मिळाल्यानंतर रहिवाश्यांना याचा फायदा मिळणार आहे. त्यामुळेच महसूल विभाग आणि सामाजिक न्याय विभागाने याबाबत संयुक्तिक आणि सकारात्मक पद्धतीने विचार करावा असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

### प्रशिक्षण केंद्रासाठी जमीन

पश्चिम महाराष्ट्रात वारंवार येणाऱ्या आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी नजीकच्या ठिकाणी राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील प्रस्तावित राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल व पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी महसूल विभागाने जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मंत्रालयातील मुख्यमंत्री समिती कक्षात पाटण तालुक्यातील मौजे गोकुळ तर्फ हेळवाक (कोयनानगर) येथे राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल व पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या बैठकीला आमदार शंभुराज देसाई, अपर मुख्य सचिव (महसूल) डॉ.नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव

असिम कुमार गुप्ता, प्रधान सचिव (वने) वेणुगोपाल रेड्डी, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, वित्त विभागाच्या सचिव ए. शैला, राज्य राखीव पोलीस दलाचे महासंचालक चिरंजीव प्रसाद, उपमहानिरीक्षक अभिषेक त्रिमुखे, सातारा जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, पाटणचे उपविभागीय अधिकारी सुनील गाडे यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पाटण तालुक्यातील कोयनानगर येथे नव्याने राज्य राखीव आपत्ती प्रतिसाद दल व पोलीस प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार निश्चित केलेल्या ३९ हेक्टर जमिनीची मागणी पोलीस महासंचालकांनी महसूल विभागाकडे केली आहे त्यानुसार ही जागा पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे वर्ग करण्याबाबत महसूल विभागाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

## पुनर्वसनासाठी निधी

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आंबेघर खालचे, आंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी (जिंती) या सात गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न सोडवण्यासाठी चार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मंत्रालयातील मुख्यमंत्री समिती कक्षात पाटण विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या बाधित गावांच्या पुनर्वसनाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी बैठकीला आमदार शंभूराज देसाई, अपर मुख्य सचिव (महसूल) नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिम कुमार गुप्ता, वित्त विभागाच्या सचिव ए. शैला, सातारा जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, पाटणचे उपविभागीय अधिकारी सुनिल गाडे यांसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील अतिवृष्टीमुळे भूस्खलन झालेल्या आंबेघर खालचे आंबेघर वरचे, ढोकावळे, मिरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी (जिंती) या ७ गावांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने खासगी जमीन खरेदी करण्याकरिता तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच या गावांमध्ये नव्याने ५५० घरे उभारण्याच्या कामाला गती देण्यात यावी. या गावांचा कायमस्वरूपी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने व जोमाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिले.



**वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रकल्पांना आशियाई विकास बँकेमार्फत वित्त साहाय्य आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेसोबतची आढावा बैठक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन, मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, वरिष्ठ अधिकारी, आशियाई विकास बँकेचे आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

## जनहिताच्या निर्णयांना वेग

राज्य सरकारमध्ये निर्णय प्रक्रियेला वेग आला असून नवीन सरकारने कार्यभार स्वीकारल्यापासून ते आजतागायत जनहिताचे विविध निर्णय झपाट्याने घेतले आहेत. १ जुलै ते अगदी आतापर्यंत म्हणजे ८ ऑगस्टपर्यंतच्या कालावधीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३९९ फाईल्सचा निपटारा केला आहे. विशेष म्हणजे यात नैसर्गिक आपत्तिमधील मदत, गरजूंना मदत, कृषी विभाग, मंत्री मंडळासमोर अणावयाचे प्रस्ताव, फाईल्स, विविध नवीन शासकीय नियुक्त्या, सरळ सेवा भरती, वन विभाग, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण अशा विविध विभागाच्या फाईल्सचा समावेश आहे.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या पहिल्याच बैठकीत विविध विभागाच्या सचिवांना सर्वसामान्यांची तसेच जनहिताची कामे गतिमान रीतीने झाली पाहिजेत, तसेच लोकांची कामे अडणार नाहीत हे पाहण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जनहितासाठी तत्परतेने निर्णय घेण्यात येत आहेत.

## नीती आयोगाची बैठक

पीक पद्धतीतील वैविध्य, सिंचन व्यवस्थेचे बळकटीकरण, शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारंपरिक शेतीबरोबरच सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे आदींच्या माध्यमातून राज्यातील कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्यावर राज्याचा भर असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नीति आयोगाच्या बैठकीत सांगितले.

नीति आयोगाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या सूचनांनुसार राज्यसरकार विविध उपयायोजनांच्या माध्यमातून देश विकासात सहभाग देईल, असा विश्वासही श्री.शिंदे यांनी या बैठकीत व्यक्त केला.

राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रात आयोजित या बैठकीस गृह तथा सहकार मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अन्य केंद्रीय मंत्री, देशातील राज्यांचे मुख्यमंत्री, सचिव आदी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ

शिंदे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव या बैठकीस उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित 'नीति आयोगाच्या नियामक परिषदे'च्या सातव्या बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे सहभागी झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीविषयी माहिती पत्रकार परिषदेत दिली. या वेळी केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील, खासदार राहुल शेवाळे, धैर्यशिल माने या वेळी उपस्थित होते.

राज्यातील पडीक जमीन बागायती शेतीखाली आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. गेल्या पाच वर्षांत राज्यातील चार लाख हेक्टर अन्य व पडीक जमीन बागायती शेतीखाली आणण्यात आली आहे. एकात्मिक बागायती विकास



नीती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

मिशन अंतर्गत (एम.आय.डी.एच) २०१५ मध्ये करण्यात आलेले नियम कायम असल्याने बागायती शेती विकासास अडसर निर्माण होत असून या मानदंडावर पुनर्विचार करण्यात यावा, अशी सूचनाही श्री.शिंदे यांनी बैठकीत केली.

## ओबीसी महासंघाचे अधिवेशन

ओबीसी समाजाच्या समस्या समजून घेऊन त्या दूर करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ओबीसी महासंघाचे सातवे महाअधिवेशन येथील तालकटोरा स्टेडियम येथे आयोजित करण्यात आले. या सभेस उपमुख्यमंत्री फडणवीस संबोधित करत होते. या कार्यक्रमास केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्री कपिल पाटील, खासदार बाळू धानोरकर, आमदार डॉ. परिणय फुके, नाना पटोले, राज्यातील ओबीसी समाजाचे नेते बबनराव तायवाडे तसेच देशभरातील ओबीसी महासंघातील सदस्य, ओबीसी समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




महाराष्ट्रात ओबीसी समाजाकरिता स्वतंत्र मंत्रालय सुरू करण्यात आले. त्या वेळी ओबीसी समाजासाठीच्या २१ मागण्या पूर्ण करण्यात आल्या. शिक्षण, वसतिगृह, उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्यासाठी शिष्यवृत्ती, भारतीय प्रशासकीय सेवेच्या स्पर्धा परिक्षार्थीचे प्रशिक्षण वर्ग आदि विषयांबाबतही निर्णय घेऊन ओबीसी समाजातील सर्वच घटकांना लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी काही मागण्या आल्यास त्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी आश्वस्त केले. ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा देण्याचे काम केंद्र शासनाने केले असल्याचेही श्री. फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

राज्यातील जमीन सिंचनाखाली आणण्यात जलयुक्त शिवार योजना साहाय्यभूत ठरली असून या योजनेमुळे डाळ व कडधान्य वर्गीय पिकांचे उत्पादन वाढले आहे. राज्य सरकार या योजनेस प्रोत्साहन देणार असल्याचेही श्री. शिंदे यांनी बैठकीत सांगितले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन कटिबद्ध असून त्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याला आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी श्री.शिंदे यांनी केली. डिजिटल मूलभूत सुविधा स्थापित करण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) राज्यातील आकांक्षित जिल्हे आणि दुर्गम भागात उच्च शिक्षण संस्थांना आर्थिक साहाय्यतेची गरज आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य विद्याशाखा विकास प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे. भारत नेट कार्यक्रमांतर्गत शाळांना डिजिटल करण्यासाठी ब्रॉडबँड सेवेने जोडण्यात येणार आहे. राज्यातील कोणतीही शाळा 'एक शिक्षकी' राहणार नाही यावर राज्याचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांच्या योगदानाप्रति कृतज्ञभाव दर्शवण्यासाठी 'आमचे गुरुजी' उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचेही श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

राज्यात ग्रीन फिल्ड शहर निर्माण करण्यावर शासनाचा भर असून या अंतर्गत नवी मुंबईजवळ ४०० चौ.कि. क्षेत्रावर शहरी केंद्र उभारण्यात येत आहे. ७०० कि.मी.च्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर २० स्मार्ट शहरे उभारण्यात येत आहेत. राज्य शासनाने २८ जुलै २०२२ रोजी शहर सौंदर्यीकरण कार्यक्रमास सुरवात केली असून याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध स्पर्धांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शहर सौंदर्यीकरण करण्यावर भर देण्यात येत असल्याने त्यांनी सांगितले.

## सर्वांगीण विकास कटिबद्ध

आदिवासी समाजाच्या विकासासाठी

## जगदीप धनखड १४ वे उपराष्ट्रपती



पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल जगदीप धनखड यांनी देशाचे १४ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्री.धनखड यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. दिल्लीतील राष्ट्रपती भवनात हा शपथविधी सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह विविध पक्षातील नेते या शपथविधी सोहळ्यात उपस्थित होते.

जगदीप धनखड यांचा जन्म १८ मे १९५१ रोजी राजस्थानमधील झुंझुनू जिल्ह्यातील किठाणा या गावात झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण किठाणा गावातील शासकीय माध्यमिक विद्यालयातून झाले. पुढे त्यांनी चित्तौडगड येथील सैनिक स्कूलमध्येही शिक्षण घेतले. बारावीनंतर त्यांनी भौतिकशास्त्रात पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी कायद्याचे शिक्षणही पूर्ण केले. राजस्थान उच्च न्यायालयातून त्यांनी वकिली सुरू केली. ते राजस्थान बार कौन्सिलचे अध्यक्षही होते. श्री.धनखड यांनी आपल्या राजकारणाची सुरुवात जनता दलमधून केली. ते १९८९ मध्ये झुंझुनूमधून ते पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आले. १९८९ ते १९९१ या काळात केंद्रीय मंत्री होते. मात्र, १९९१ ला त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि १९९३ मध्ये अजमेरमधील किशनगडमधून काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली आणि आमदार झाले. २००३ त्यांनी काँग्रेससोडून भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ मध्ये त्यांना पश्चिम बंगालचे राज्यपाल बनवण्यात आले. आता त्यांची देशाचे १४वे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे.

आर्थिक वर्ष २०२२ - २३ मध्ये ११ हजार १९९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे पालघर जिल्ह्यातील आदिवासी बांधवाना संबोधित केले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जागतिक आदिवासी दिनानिमित्त जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन तसेच जिल्ह्यातील आदिवासी बांधव उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या रूपाने देशात प्रथमच सर्वोच्च पदावर आदिवासी महिला विराजमान झाल्या आहेत; ही बाब आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. राज्यात १ कोटी ५ लाख आदिवासी बांधव असून त्यांच्या प्रगतीवर शासन विशेष लक्ष देत आहे. आदिवासी समाजाचा राहणीमानाचा दर्जा उंचावून त्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी उपाययोजना राबवण्यात येत आहे. या उपाययोजनांमध्ये राज्यातील १६ जिल्हे ६८ तालुके ६ हजार २६२ गावांचा समावेश असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय आश्रम शाळांमध्ये समूह योजनेंतर्गत निवास, शिक्षण, भोजनासह इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ५५६ अनुदानित आश्रम शाळेतून जवळपास २ लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याशिवाय ४९४ शासकीय वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्था करून देण्यात आली आहे.

१७३ नामांकित निवासी शाळेच्या माध्यमातून ५३ हजार ३५३ विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यात येत आहे. पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंयोजनेच्या माध्यमातून जवळपास २१ हजार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

आदिवासी समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी दिल्ली व पुणे येथे खासगी संस्थांच्या सहकार्याने प्रशिक्षण देण्याची योजना राबवण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## मुंबई मॅरेथॉनला गौरवशाली परंपरा

आशियातील सर्वात मोठ्या टाटा मुंबई मॅरेथॉनला गौरवाशाली परंपरा आहे. टाटा मुंबई मॅरेथॉन ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शासनाकडून सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. जगभरातील धावपटूंचे आकर्षण असलेली ही स्पर्धा १५ जानेवारी २०२३ मध्ये होणार असून या स्पर्धेसाठी इच्छुकांनी नोंदणी करावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

हॉटेल ट्रायडंट येथे टाटा मुंबई मॅरेथॉन नोंदणी शुभारंभाची घोषणा करताना मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुंबई महापालिका आयुक्त इकबाल सिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, टाटा सन्सचे ब्रँड संरक्षक हरीश भट, टाटा सन्सचे उपाध्यक्ष उज्ज्वल माथूर, आयडीएफसी बँकेचे मुख्य कार्य अधिकारी बी. माधवन, एफआय चे अध्यक्ष अदीले सुमरीवाला, वेस्टर्न नेव्हल कमांडट कृष्ण स्वामिनाथन, बीसीसीएलचे अध्यक्ष शिवकुमार सुंदरम, टाटा मोटर्सचे मार्केटिंग हेड विवेक श्रीवास्तव यांसह मान्यवर उपस्थित होते.

कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे सार्वजनिक कार्यक्रमांना मर्यादा होत्या. तथापि, सध्या जनजीवन पूर्वपदावर आल्याने

मोठ्या कालावधीनंतर, सर्व स्पर्धकांसाठी ही आनंदाची बातमी आहे. मॅरेथॉन २०२३ मध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक धावपटू आतुरतेने वाट पाहत होते. त्यांना आता या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेत ५० हजारांहून अधिक हौशी तसेच व्यावसायिक धावपटू जगभरातून सहभागी होतील, ही स्पर्धा अधिक आकर्षक होईल, अशी अपेक्षा आहे. सर्वांना एकाच मंचावर आणण्याठी मॅरेथॉन हे एक उत्तम माध्यम आहे. सामान्य नागरिकांसोबतच सेलिब्रिटी, लोकप्रतिनिधीदेखील या मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदवतील, अशी आशा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केली.

या वेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर, टाटा सन्सचे ब्रँड संरक्षक हरीश भट, टाटा सन्सचे उपाध्यक्ष उज्ज्वल माथूर, आयडीएफसी बँकेचे मुख्य कार्यअधिकारी बी. माधवन आदींनी मनोगत व्यक्त केले तसेच अधिकाधिक धावपटूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

टाटा मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी tatamumbaimarathon.procam.in या अधिकृत वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन टाटा सन्सचे ब्रँड संरक्षक हरीश भट यांनी केले.

## इतर घडामोडी

### स्टार्टअप रँकिंग : 'टॉप परफॉर्मर'

केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या व्यापार आणि उद्योग संवर्धन विभागाच्यावतीने राज्यांच्या स्टार्टअप रँकिंग कार्यक्रमाच्या तिसऱ्या आवृत्तीमधे स्टार्टअप संस्थांसाठीच्या साहाय्य कामगिरीच्या क्रमवारीत महाराष्ट्राने 'टॉप परफॉर्मर' क्रमांक पटकावला. या क्रमवारीवर आधारित २०२१ च्या आवृत्तीच्या निकालाची घोषणा आणि सत्कार समारंभ केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे झाला. राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेन्द्र सिंह कुशवाह यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

२०१८ मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्टार्टअपच्या परिसंस्था वाढीसाठी नियम सुलभ करण्याच्या दिशेने आणि स्टार्टअप परिसंस्थेला बळकट पाठिंबा देण्यास विविध निकषांच्या आधारावर स्टार्टअप रँकिंग हा उपक्रम सुरू करण्यात आला. २०२१ च्या आवृत्तीमध्ये ७ व्यापक सुधारणा क्षेत्रांचा विचार करण्यात आला ज्यामध्ये २६ कृती मुद्दे होते जे स्टार्टअप्स आणि परिसंस्थेच्या भागधारकांना नियामक तसेच धोरण आणि आर्थिक समर्थन प्रदान करण्यासाठी आवश्यक आहेत. या सुधारणा क्षेत्रांमध्ये संस्थात्मक समर्थन, नावीन्यता आणि उद्योजकतेला चालना देणे, बाजारपेठेत प्रवेश, इनक्युबेशन समर्थन, निधी समर्थन, मार्गदर्शन आणि क्षमता निर्मिती यांचा समावेश होता. महाराष्ट्र स्टार्टअप वीक, स्टार्टअप पोर्टल आणि महिला इनक्युबेशन सेंटर या प्रमुख उपक्रमांमुळे या क्रमवारीत महाराष्ट्राने 'टॉप परफॉर्मर' क्रमांक पटकावला. २०१८ च्या आवृत्तीत महाराष्ट्र हे उद्योन्मुख राज्य श्रेणीमध्ये होते, तर २०१९ च्या आवृत्तीत नेतृत्व श्रेणीमध्ये होते.

### राष्ट्रीय खनिज विकास पुरस्कार

खनिज क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी महाराष्ट्राला केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते राष्ट्रीय खनिज पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासोबतच राज्याला २ कोटी ७ लाख ३४ हजार ३७५ रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्यात आली.

केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्रालयाच्यावतीने येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित सहाव्या खाण व खनिज संमेलनात हे पुरस्कार व प्रोत्साहन रक्कम वितरित करण्यात आली. या वेळी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री प्रल्हाद जोशी, राज्यमंत्री रावसाहेब दानवे, विभागाचे सचिव आलोक टंडन उपस्थित होते.


खनिज क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी महाराष्ट्राला केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते राष्ट्रीय खनिज पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या समारंभात वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१ करिता एकूण तीन श्रेणींमध्ये प्रत्येकी ३ राष्ट्रीय खनिज विकास पुरस्कार प्रदान करण्यात आले. खनिज श्रेणीत महाराष्ट्राला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंह यांनी हा पुरस्कार स्वीकारला. १ कोटी रुपये रोख, चषक आणि सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

वर्ष २०२०-२०२१ दरम्यान खनिज ब्लॉकच्या यशस्वी लिलावासाठी देशातील १० राज्यांना या समारंभात मंत्री श्री. शाह यांच्या हस्ते प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्यात आली. महाराष्ट्रालाही या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी २ कोटी ७ लाख ३४ हजार आणि ३७५ रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्यात आली. राज्याच्या उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंह यांनी ही रक्कम स्वीकारली.

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्थेने प्राथमिक खनिज शोध लावलेल्या महाराष्ट्रातील ५ ब्लॉकचेही या वेळी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री प्रल्हाद जोशी आणि राज्यमंत्री श्री. दानवे यांच्या हस्ते राज्याला हस्तांतरण करण्यात आले. भंडारा, नागपूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी हे एकूण ५ ब्लॉक हस्तांतरित करण्यात आले. या हस्तांरणानंतर राज्य शासनाला संबंधित ब्लॉकचा लिलाव करून अधिक खनिज सर्वेक्षण करता येऊ शकेल. या समारंभात केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री श्री. जोशी आणि राज्यमंत्री श्री. दानवे यांच्या हस्ते देशातील ४० खाणींना उत्कृष्ट कार्यासाठी गौरवण्यात आले. महाराष्ट्रातील ६ खाणींचा यात समावेश आहे.

## विकास निधी योजनेला पहिला क्रमांक

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी योजनेच्या लाभासाठी जास्तीत-जास्त उद्योजकांना प्रेरित करणे व या योजनेबाबत जागरुकता निर्माण करण्यात महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला. या उपलब्धीसाठी केंद्रीय मत्स्य, पशुसंवर्धन आणि दुग्ध मंत्री पुरुषोत्तम रूपाला यांच्या हस्ते राज्याला सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय मत्स्य, पशुसंवर्धन आणि दुग्ध मंत्रालयाच्यावतीने येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित 'पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी संमेलनात' हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या प्रसंगी केंद्रीय मत्स्य, पशुसंवर्धन आणि दुग्ध राज्यमंत्री डॉ. संजीव कुमार बालियान आणि विभागाचे सचिव अतुल चतुर्वेदी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्ये, उद्योजक आणि बँकांना या वेळी सन्मानित करण्यात आले. स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी योजनेत जास्तीत-जास्त उद्योजकांना प्रेरित करण्यासाठी व योजनेच्या जागरूकतेकरिता केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी या वेळी देशातील तीन राज्यांना गौरवण्यात आले. यात महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी पुरस्कार स्वीकारला. कर्नाटक राज्याला दुसरा, तर उत्तर प्रदेशला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार वितरित करण्यात आला.

## उच्च शैक्षणिक क्षेत्रात : महाराष्ट्र दुसरा

उच्च शैक्षणिक क्षेत्रातील सर्वंकष १०० उत्कृष्ट संस्थांमध्ये महाराष्ट्राच्या १२ शैक्षणिक संस्थांच्या समावेशसह देशात राज्याने दुसऱ्या क्रमांक पटकावला आहे. यासह प्रथम दहामध्ये मुंबई आयआयटी तिसऱ्या क्रमांकावर आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने 'इंडिया रँकिंग -२०२२' हा कार्यक्रम इंडिया हॅबिटेट सेंटरच्या स्टेन सभागृहात आयोजित करण्यात आला. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय उच्चशिक्षण सचिव के. संजय मूर्ती, युजीसीचे अध्यक्ष एम. जे. कुमार तसेच शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. या वेळी केंद्रीय मंत्री श्री. प्रधान यांनी उच्चशिक्षण क्षेत्रातील सर्वंकष क्रमवारी तसेच उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध ९ अभ्यासक्रमांची श्रेणी 'इंडिया रँकिंग-२०२२' ची यादी जाहीर केली. या कार्यक्रमात प्रत्येक श्रेणीतील प्रथम तीन संस्थांना प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

उच्चशिक्षण क्षेत्रातील सर्वंकष १०० उत्कृष्ट संस्थांमध्ये राज्याचा दुसरा क्रमांक आहे. प्रथम क्रमांकावर तामिळनाडूतील १८ उच्च शैक्षणिक संस्थांचा समोवश आहे. प्रथम १०० उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये राज्यातील १२ संस्था आहेत. यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयआयटी), २५व्या क्रमांकावर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, २६व्या क्रमांकावर भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था पुणे, २८व्या क्रमांकावर इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, ३३व्या क्रमांकावर होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई, ६२व्या क्रमांकावर सिम्बायोसिस इंटरनॅशनल, पुणे, ६८व्या क्रमांकावर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर, ७६व्या क्रमांकावर डॉ.डी वाय पाटील विद्यापीठ, पुणे, ८१व्या क्रमाकांवर मुंबई विद्यापीठ, मुंबई, ८९व्या क्रमांकावर एसव्हीकेएम नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज, मुंबई, ९२ व्या क्रमांकावर दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, वर्धा, ९९व्या क्रमांकावर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या संस्था पहिल्या १०० सर्वोत्कृष्ट संस्थांमध्ये समाविष्ट आहेत.

देशभरातील उत्कृष्ट १०० विद्यापीठांमध्ये राज्यातील १३ विद्यापीठांचा समावेश आहे. उत्कृष्ट १०० महाविद्यालयांमध्ये राज्यातील ३ महाविद्यालयांचा समावेश आहे. उत्कृष्ट ५० संशोधन संस्थांमध्ये राज्यातील ५ संस्थांचा समावेश आहे. उत्कृष्ट २०० अभियांत्रिकी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांमध्ये राज्यातील १७ संस्थांचा समावेश आहे.

उत्कृष्ट १०० व्यवस्थापन संस्थांमध्ये राज्यातील १० संस्थांचा समावेश आहे. उत्कृष्ट १०० फॉर्मसी महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांमध्ये राज्यातील १६ संस्थांचा समोवश आहे. उत्कृष्ट ५० वैद्यकीय महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांमध्ये राज्यातील ४ महाविद्यालये/संस्था/ विद्यापीठांचा समावेश आहे. उत्कृष्ट ४० दंत महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांमध्ये राज्यातील ६ महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांचा समावेश आहे. उत्कृष्ट ३० विधी महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांमध्ये राज्यातील एका संस्थेचा समावेश आहे. यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर सिम्बायोसिस लॉ स्कुल, पुणे या संस्थेचा समावेश आहे. उत्कृष्ट वास्तुकला महाविद्यालय/संस्था/ विद्यापीठांमध्ये राज्यातील ८ व्या क्रमांकावरील विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर, या एका संस्थेचा समावेश आहे. https://www.nirfindia.org/2022/Ranking.html या संकेतस्थळावर सविस्तर यादी उपलब्ध आहे.

## 'प्रमुख शहरांच्या' श्रेणीत चौथा क्रमांक

नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या भारतीय नावीन्य निर्देशांक २०२१ मध्ये 'प्रमुख शहरांच्या' श्रेणीत महाराष्ट्र १६.६ गुणांसह चौथ्या क्रमांकावर असल्याचे अहवालात नोंदवण्यात आले आहे.

येथील नीती आयोगामध्ये नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांच्या हस्ते 'भारतीय नावीन्य निर्देशांक २०२१' प्रसिद्ध झाला. या वेळी आयोगाचे सदस्य डॉ. व्ही के सारस्वत, मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वरन अय्यर, वरिष्ठ सल्लागार नीरज सिन्हा आणि इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पिटिटिव्हनेसचे अध्यक्ष डॉ. अमित कपूर उपस्थित होते.

'मुख्य शहरांच्या' श्रेणीत कर्नाटकाचा प्रथम क्रमांक असून यात महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. 'ईशान्य आणि डोंगरी प्रदेशातील राज्ये' या श्रेणीत मणिपूर सर्वात वरच्या क्रमांकावर आहे, तर 'केंद्रशासित प्रदेश आणि शहरी राज्ये' या श्रेणीत चंडीगढ अग्रस्थानी आहे.

**– टीम लोकराज्य**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, औरंगाबाद, पुणे, हिंगोली, नांदेड आणि सातारा जिल्ह्याचा दौरा केला. या वेळी विभागांचा आढावा त्यांनी घेतला तसेच पूरग्रस्त भागांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधून दिलासा दिला. या वेळी विकासकामांचा शुभारंभ, इमारतींचे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचा थोडक्यात आढावा..**

# सर्वसामान्यांशी संवाद

## नाशिक

### इमारतीचे लोकार्पण

कायदा-सुव्यवस्थेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलिसांसाठी राज्यात मोठ्या प्रमाणात घरांची निर्मिती करण्यात येईल. अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मालेगाव उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मालेगाव कॅम्प पोलीस ठाणे व २०५ पोलीस निवासस्थाने यांच्या नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आमदार दादाजी भुसे, आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा अपर पोलीस महासंचालक अर्चना त्यागी, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर-पाटील, पोलीस अधीक्षक सचिन पाटील, नाशिकचे पोलीस आयुक्त जयंत नाईकनवरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड उपस्थित होते.

पोलिसांच्या प्रश्नांच्या बाबतीत हे सरकार संवेदनशील आहे. पोलिसांच्या घरांच्या बाबतीत मुंबईत बैठक घेण्यात आली आहे. येत्या काळात शासनाच्या सर्व गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून पोलिसांच्या घरांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करण्यात येईल. मुंबई पोलिसांसाठी ५० हजार घरांची गरज आहे. मात्र सध्या १९ हजार घरे उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीतील घरांची डागडुजी व देखभालीची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शासन काम करत आहे. सध्याचे सरकार हे सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी यांचे सरकार आहे.



मालेगाव उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मालेगाव कॅम्प पोलीस ठाणे व २०५ पोलीस निवासस्थाने यांच्या नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्यातील अतिवृष्टीच्या पंचनाम्याचे काम १०० टक्के झाले आहे. अशा शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन युद्धपातळीवर काम करत आहे. लवकरच शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचणार आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

या वेळी ५ पोलीस अधिकारी-कर्मचारी यांना प्रातिनिधिक स्वरूपात निवासस्थानाच्या किल्ल्या देण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडून या इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. या वेळी मालेगाव पोलिसांच्या ताफ्यातील नवीन चारचाकी वाहनांचे लोकार्पण हिरवा झेंडा दाखवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमानंतर महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या काष्टी (ता. मालेगाव) येथील कृषी विज्ञान संकुलाचे (१६९.२४ कोटी) भुमीपूजन व कोनशीला अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

### नाशिक विभागाचा आढावा

राज्य शासनाच्या सर्व विभागांनी आपापल्या जिल्ह्यात सांघिकपणे कार्य करीत विकास कामांना गती द्यावी. लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मालेगाव येथील तालुका क्रीडा संकुलात नाशिक विभागाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या बैठकीस विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, खासदार हेमंत गोडसे, आमदार दादाजी भुसे, गुलाबराव पाटील, मौलाना मुफ्ती मोहंमद इस्माईल, चिमणराव पाटील, किशोर पाटील, चंद्रकांत पाटील, बबनराव पाचपुते, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, नितीन पवार, सुहास कांदे, फारुक शाह, आमदार मंजुळाताई गावित, लताताई सोनवणे, नाशिक विभागाचे महसूल आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी गंगाथरण डी. (नाशिक), नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर-पाटील, नाशिकचे पोलीस आयुक्त जयंत नाईकनवरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड (नाशिक), यांच्यासह विविध

विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## औरंगाबाद

### मराठवाडा विभागीय बैठक आढावा

अतिवृष्टीने नुकसान झालेल्या प्रत्येकाला वेळेत मदत मिळावी यासाठी मराठवाड्यातील बाधित शेतकरी, नागरिकांना तातडीने आवश्यक ते साहाय्य करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच



औरंगाबाद शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या योजनेच्या दुरुस्तीसाठी २०० कोटींचा निधी देण्याचेही त्यांनी या वेळी जाहीर केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिवृष्टी, पीक परिस्थिती, विकासकामे तसेच इतर विविध बाबींसंदर्भात विभागीय आढावा बैठक घेतली. या बैठकीस केंद्रीय रेल्वे, कोळसा व खाणी राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, खासदार इम्तियाज जलील, आमदार हरिभाऊ बागडे, प्रदीप जैस्वाल, अब्दुल सत्तार, संजय शिरसाठ, संदिपान भुमरे, अतुल सावे, माजी मंत्री रामदास कदम, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलीस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, महापलिकेचे प्रशासक तथा आयुक्त अस्तिक कुमार पाण्डेय, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटणे तसेच विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### औद्योगिक विकासासाठी प्रयत्न

राज्याच्या विकासात उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असून औद्योगिक विकासासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसाला होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या इंडस्ट्रिज अँड ॲग्रिकल्चरतर्फे आयोजित राज्यस्तरीय व्यापार महापरिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. महाराष्ट्राच्या विकासात व्यापार क्षेत्राचा सहभाग, या विषयावर ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमास केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार अब्दुल सत्तार, उद्योजक उमेश दाशराथी, प्रफुल्ल मालानी, सत्यनारायण लाहोटी, घनश्याम गोयल, ललित गांधी यांच्यासह राज्यातील विविध व्यापारी महासंघाचे अध्यक्ष, उद्योजक यांची उपस्थिती होती.

### संकेत सरगरला पारितोषिक जाहीर

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ स्पर्धांमध्ये रौप्यपदक विजयी कामगिरी करणाऱ्या सांगली येथील संकेत सरगर या वेटलिफ्टरला राज्य शासनाकडून ३० लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औरंगाबाद येथे केली.

कॉमनवेल्थ स्पर्धेत देशासह महाराष्ट्राच्या नावावर रौप्यपदकाची मोहोर उमटवणाऱ्या सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या संकेत सरगर या खेळाडुची ही कामगिरी उल्लेखनीय व अभिनंदनीय बाब आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने संकेत सरगरला ३० लाख रुपये, तर त्याच्या मार्गदर्शकांनाही साडेसात लाखांचे पारितोषिक जाहीर केला. संकेतची कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## पुणे

### जनहिताची कामे थांबणार नाहीत

पुणे विभागातील जनहिताच्या विकासकामांसाठी कोणत्याही प्रकारे निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. जनतेच्या कामांसाठी क्रियान्वयनातील टप्पे कमी करून विकासकामे वेगाने पूर्ण करावी. विकासकामांसाठी प्रशासनाला शासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात पाऊस, अतिवृष्टी, पीक पाहणी आणि विकासकामांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार तानाजी सावंत, आमदार दिलीप मोहिते-पाटील, माधुरी मिसाळ, संग्राम थोपटे, महेश लांडगे, सुनील कांबळे, अशोक पवार, चेतन तुपे, सुनील टिंगरे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, संजय जगताप, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त राजेश पाटील, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, अंकुश शिंदे, विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागातील इतर अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.

पूरग्रस्त भागातील नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम त्वरित पूर्ण करावे. शासनाच्या मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. दरड प्रवण गावातील तात्पुरते स्थलांतर केलेल्या नागरिकांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा देण्यात याव्यात. प्राणहानी व घरांच्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत आवश्यक निधीची मागणी करण्यात यावी, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

### पोषकतत्त्वयुक्त आहार वाटपाचा शुभारंभ

पुणे जिल्हा परिषदेंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या वतीने अंगणवाडी केंद्रातून पोषकतत्त्वयुक्त आहार अंतर्गत हॉर्लिक्स वाटपाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. शिंदे

यांच्या हस्ते करण्यात आला. यासाठी जिल्हा परिषदेने कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत हिंदुस्थान युनिलिव्हर सोबत सामंजस्य करार केला असून कंपनी वर्षभर मोफत हॉर्लिक्स पुरवणार आहे. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात बालकांना हॉर्लिक्सचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील बालकांच्या आहारामध्ये आवश्यक त्या प्रमाणात सूक्ष्म पोषकतत्त्वे, जीवनसत्त्वे आदी पोषक तत्त्वांचा समावेश व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

### यशस्वी गावांना पुरस्कार

राज्य शासनाने सुरू केलेल्या कोरोनामुक्त गाव स्पर्धा योजनेंतर्गत माण, ता. मुळशी आणि सपकळवाडी, ता. इंदापूर या ग्रामपंचायतींनी कोविड व्यवस्थापनामध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल या गावांना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते कोरोनामुक्त गाव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोरोनामुक्तीसाठी कुटुंब सर्वेक्षण पथक, विलगीकरण कक्ष, कोरोना तपासणी, कोविड हेल्पलाईन पथक आदींच्या माध्यमातून या गावांनी उत्कृष्ट काम केले आहे.

### हर्षदा गरुडचे कौतुक

ग्रीस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या वडगाव मावळ येथील हर्षदा गरुड हिचा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सत्कार केला आणि तिला पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. हर्षदाने जागतिक ज्युनिअर वेटलिफ्टिंग स्पर्धेतील ४५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले आहे. या स्पर्धेत भारताला प्रथमच सुवर्णपदक मिळाले.

### पाणीपुरवठा योजनेची पाहणी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हवेली तालुक्यातील तुकाई टेकडी येथे फुरसुंगी-ऊरळी देवाची प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची भेट देऊन पाहणी केली. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार तानाजी सावंत, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे, अधीक्षक अभियंता सुभाष भुजबळ, कार्यकारी अभियंता वैशाली आवटे, पुणे मनपाचे पाणीपुरवठा मुख्य अभियंता अनिरूद्ध पावसकर आदी उपस्थित होते.

### फुटबॉल मैदानाचे लोकार्पण

पुणे महानगरपालिकेच्या वतीने हांडेवाडी रोड, महम्मदवाडी येथे उभारण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे फुटबॉल मैदानाच्या लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मंत्री उदय सामंत, तानाजी सावंत, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार दिलीप लांडे, शरद सोनवणे, पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, अतिरिक्त मनपा आयुक्त विलास कानडे, माजी नगरसेवक प्रमोद उर्फ नाना भानगिरे आदी उपस्थित होते.

### सर्व परवानग्या एक खिडकीद्वारे

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी आदी आगामी सण, उत्सव शांततेत, उत्साहात, धुमधडाक्यात साजरा करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणेश मंडळांना केले. उत्सवात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, मोहरम तसेच आगामी सण व उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तालयात कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात आढावा बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

या बैठकीला मंत्री तानाजी सावंत, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, माजी आमदार विलास लांडे, पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पुणे पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. जालिंदर सुपेकर, रामनाथ पोकळे, नामदेव चव्हाण, राजेंद्र डहाळे, विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## हिंगोली

### शेतकऱ्यांशी संवाद

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेड येथे विविध विकास कामांचे भुमीपूजन केले. त्यानंतर हिंगोली येथे येताना कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव पूल येथे अतिवृष्टीने बाधित झालेल्या पिकांची पाहणी केली. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी सवांद साधून झालेल्या



नुकसानीची माहिती घेतली. तसेच यापुढे अशाप्रकारे नुकसान पुन्हा होऊ नये, याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या वेळी खासदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्यासह शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## नांदेड

### सर्वसामान्यांना उभारी देणाऱ्या बँकांना मदत

गोदावरी अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची या क्षेत्रातील कामगिरी अभिमानास्पद असून सर्वसामान्य माणसाला उभे करणाऱ्या अशा संस्थांचे बँकेत रूपांतर व्हावे, यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल. तसेच यासंदर्भात केंद्र शासनाकडेही पाठपुरावा केला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गोदावरी अर्बन मल्टिस्टेट को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या मुख्यालयास त्यांनी भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी माजी मंत्री आमदार संजय राठोड, खासदार हेमंत पाटील, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते गुणवंत पाटील हंगरगेकर, गोदावरी अर्बन सोसायटीच्या अध्यक्षा राजश्री पाटील, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकुर घुगे, गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर उपस्थित होते.

## विकासकामांसाठी निधी कमी पडणार नाही

नांदेड महानगराच्या विस्तारामुळे उत्तर नांदेड अर्थात तरोडा, वाडी या भागाचे मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण झाले आहे. अर्ध्या तासाच्या अंतरावर पुर्णासारखे मोठे रेल्वे जंक्शन, वसमतसारखी मोठी कृषी बाजारपेठ व इतर कृषी क्षेत्रात परिपूर्ण असलेल्या गावांचे अंतर लक्षात घेता पुर्णा, हिंगोली रस्ते विकासासाठी भरीव तरतूद केलेली आहे. १९२ कोटींच्या होणाऱ्या रस्ते विकासातून या भागातील वाहतूक सुलभतेसाठी मोठी सुविधा निर्माण होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

नांदेड महापालिकांतर्गत शहरातील उत्तर मतदारसंघातील मूलभूत सुविधा, हिंगोली जिल्हा सीमा ते आलेगाव-निळा-नांदेड व परभणी जिल्हा सीमा ते पूर्णा नांदेड रस्त्याचे दुपदरीकरण, आसना नदीवरील पासदगाव जवळील नवीन पुलाच्या कामाचे प्रातिनिधिक भुमीपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. येथील भक्ती लॉन्स येथे झालेल्या या प्रातिनिधिक भूमिपूजन समारंभास खासदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता गजेंद्र राजपूत व इतर मान्यवर उपस्थित होते.

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिला दिलासा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेड जिल्हा दौऱ्यातील कार्यव्यस्तता व वेळेच्या कारणामुळे नांदेड येथील नांदुसा भागातील पूरग्रस्त शेतकऱ्यांशी दुरध्वनीवर प्रत्यक्ष संवाद साधून दिलासा दिला. या वर्षी अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. शासन सदैव शेतकऱ्यांच्या बाजूने आहे. आपल्या व्यथा मी समजू शकतो. आम्ही सर्व या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत दक्ष असून कोणत्याही शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेत आहोत. याचबरोबर प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याबाबत शासन सहानुभूतिपूर्वक विचार करत असून लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेऊ, असे मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर हे गावकऱ्यांशी संवादाच्या वेळी नांदुसा येथे उपस्थित होते. या वेळी सरपंच सत्यभामा भास्कर जनकवाडे, पोलीस पाटील भास्कर जनकवाडे, देविदास हरगावकर, संतोष दुबे, माधव जनकवाडे, हनुमंत पाटणे व शेतकरी उपस्थित होते.

# सातारा

## जन्मभूमीतील सत्कार प्रेरणादायी

'मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर अनेक जिल्ह्यांना भेटी दिल्या. या वेळी विविध मान्यवरांकडून माझा सत्कार करण्यात आला. पण, माझ्या जन्मभूमीत झालेला माझा सत्कार ही आनंदाची बाब असून जनतेच्या हिताचे निर्णय घेतांना प्रेरणादायी ठरेल.' असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

तापोळा ता. महाबळेश्वर येथे तापोळा ग्रामस्थांच्या वतीने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा सहकुटुंब नागरी सत्कार करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी खासदार श्रीकांत शिंदे, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्यासह तापोळा गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. अतिवृष्टीमुळे तीन हेक्टरपर्यंत झालेल्या पिकांची नुकसान भरपाई दुपटीने देण्यात येणार आहे. राज्याचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न राहणार असून राज्यात मोठे उद्योग उभारण्यावर भर देण्यात येणार आहे. महाबळेश्वर-तापोळा रस्त्यासह पश्चिम महाराष्ट्र कोकणला कसा जोडला जाईल, यासाठी दळणवळण यंत्रणा अधिक सक्षम केली जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

## ग्रामस्थांना तिरंगा ध्वजाचे वितरण

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच आपल्या दरे ता. महाबळेश्वर



या मूळगावी आले असता येथील ग्रामस्थांशी संवाद साधला व 'हर घर तिरंगा' उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करून दरे गावातील ग्रामस्थांना तिरंगा ध्वजाचे वितरण केले. या वेळी ग्रामस्थांनीदेखील आपल्या गावातील सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्ती मुख्यमंत्री झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी आमदार मकरंद पाटील, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्र कुमार जाधव, महाबळेश्वरच्या तहसीलदार सुषमा पाटील यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# कोल्हापूर

## नुकसानीबाबत कायमस्वरूपी उपाय

पंचगंगा नदीचा पूर व त्यामुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या नुकसानीबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी शॉर्ट टर्म, मिड टर्म व लाँग टर्म या तीन स्तरावर शासनाकडून उपाययोजना राबवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या उपाययोजनांसाठी शासनाकडून आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराराणी सभागृहात आयोजित जिल्ह्यातील पूरपरिस्थिती आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी मंत्री चंद्रकांत पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणे उपाध्यक्ष प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने (दूरदृश्य प्रणालीद्वारे), आमदार प्रकाश आवाडे, आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. मनोजकुमार लोहिया, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे उपस्थित होते.

**राज्य मंत्रिमंडळाच्या ३, १० व १६ ऑगस्ट २०२२ रोजीच्या बैठकीत नगरविकास, ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, वित्त, परिवहन, उच्च व तंत्रशिक्षण, इतर मागास बहुजन कल्याण, सामान्य प्रशासन, वैद्यकीय शिक्षण, मदत व पुनर्वसन आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**



# मंत्रिमंडळात ठरले

## महापालिकांच्या सदस्य संख्येत सुधारणा

मुंबई महानगरपालिका तसेच अन्य महापालिकांच्या सदस्य संख्येत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे मुंबई महापालिकेत सध्याच्या २३६ सदस्यांऐवजी २२७ सदस्य संख्या होईल. तसेच इतर महानगरपालिकांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सदस्य संख्येत सुधारणा होणार आहे ती खालीलप्रमाणे :

तीन लाखांपेक्षा अधिक व सहा लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी, तर कमाल संख्या ८५ इतकी असेल. तीन लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५ हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. सहा लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी, तर कमाल संख्या ११५ इतकी असेल. सहा लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. १२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. २४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल.

३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी, तर कमाल संख्या १५१ इतकी असेल. २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या १५१ इतकी, तर कमाल संख्या १६१ इतकी असेल. ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या १६१ इतकी, तर कमाल संख्या १७५ इतकी असेल.

## जिल्हा परिषद सदस्य संख्येत सुधारणा

जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त ७५ करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.



सध्या राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कमीत कमी ५५ आणि जास्तीत जास्त ८५ अशी सदस्य संख्या आहे. ग्रामीण भागातील घटत चाललेल्या लोकसंख्येमुळे सुधारित सदस्य संख्या करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याला किमान ५० जागा देण्यात येतील. या संदर्भातील अध्यादेश प्रख्यापित करण्यात येईल.

## रस्त्याचे रुंदीकरण

भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या



सहा पदरी रुंदीकरणाला वेग देण्यात येणार असून यातील ५६१ कोटी ८५ लाख रुपयांच्या सुधारित कामांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प शासनाच्या निधीतून ठेव अंशदान तत्त्वावर राबवण्यात येईल. पत्री रेल्वे उड्डाण पूल, कटई येथील दोन रेल्वे उड्डाण पूल व विद्युत वाहिन्या व जल वाहिन्या स्थलांतरित करणे इत्यादी कामांमुळे कामाच्या स्वरूपात बदल झाल्याने हा खर्च वाढला आहे.

या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला निधी व आतापर्यंत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास शासनाकडून देण्यात आलेला १०५ कोटींचा निधी वगळून उर्वरित ४५६ कोटी ८५ लाख इतका निधी शासनाच्या निधीतून महामंडळास हस्तांतरित करण्यात येईल.

## पाटबंधारे प्रकल्पाच्या खर्चास मान्यता

जव्हार तालुक्यातील मौजे हिरडपाडा येथील लेंडी लघू पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १८७ कोटी ०४ लाख रुपयांच्या कामांना दुसरी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे ५ गावातील ५५० हेक्टर आदिवासी क्षेत्र सिंचित होईल.

## जीएसटी विवरण भरण्यासाठी सुधारणा

व्यापाऱ्यांना वस्तू व सेवा कर विवरण पत्रके भरताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा २०१७ यामधील तरतुदींमध्ये एकसूत्रता राखण्यासाठी या सुधारणा करण्यात आल्या. यामुळे करदाते व वस्तू व सेवाकर विभाग यांच्यामध्ये भविष्यातील अडचणी दूर होतील व कार्यपद्धतीचे सुलभीकरण होईल.

## सुधारित आकृतिबंध

राज्याच्या मोटार वाहन विभागासाठी सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवरील खर्चाचा भारही कमी होणार आहे. विभागासाठी ४३५० पदांच्या सुधारित आकृतिबंधानुसार नवीन ४४३ नियमित पदे निर्मिती करण्यात येतील. यामध्ये सह परिवहन आयुक्त या संवर्गातील ५ नियमित पदांचादेखील समावेश आहे.

## सिंचन योजनेच्या खर्चास मान्यता

यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील वर्धा बॅरेज उपसा सिंचन योजनेच्या ५६५ कोटी ८७ लाख रुपये



किमतीच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे बाभुळगाव तालुक्यातील ५ हजार ६६३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

## अमृत संस्थेच्या पदांना मान्यता

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नत व प्रशिक्षण प्रबोधन (अमृत) या संस्थेच्या तीन नियमित व १७ कंत्राटी पदांना मान्यता देण्यात आली. यासाठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवक आणि युवतींचा

विकास घडवण्यासाठी 'महाज्योती' संस्थेच्या धर्तीवर अमृत ही नवीन संस्था २०१९ मध्ये स्थापन करण्यात आली आहे.

## दोन लिपिकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सेवायोजन कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या दोन लिपिकांच्या नियुक्त्या त्यांच्या मूळ नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. लोकराज्यमध्ये पूर्वी कार्यरत असलेल्या प्रेमिला कुंढडिया आणि जावेद अब्दूल वाहीद खान यांच्याबाबत हा निर्णय घेण्यात आला.

## मुंबई मेट्रो मार्गिकेच्या प्रस्तावास मान्यता

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पाच्या सुधारित खर्चास देण्यात आली. या प्रकल्पाचा मूळ खर्च २३ हजार १३६ कोटी होता तो आता ३३ हजार ४०५ कोटी ८२ लाख रुपयांचा होईल. प्रकल्पाच्या वाढीव खर्चात केंद्र शासनाचा सहभाग मिळण्याकरितादेखील केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

सुधारित आराखड्यानुसार राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम २ हजार ४०२ कोटी ७ लाखवरून ३ हजार ६९९ कोटी ८१ लाख एवढी होत आहे. त्यामुळे राज्याच्या समभागापोटी १ हजार २९७ कोटी ७४ लाख अशी वाढीव रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो रेलला देण्यासंदर्भात प्राधिकरणाला निर्देश देण्यात आलेले आहेत.

या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे (जायका) कर्ज १३ हजार २३५ कोटीवरून १९ हजार ९२४ कोटी ३४ लाख इतके झाले असून वाढीव रकमेचे कर्ज घेण्यास देखील मान्यता देण्यात आली.

मुंबई मेट्रो मार्ग-३ची एकूण लांबी ३३.५ किमी असून हा मार्ग संपूर्ण भुयारी आहे. या मार्गात २६ भुयारी आणि एक जमिनीवरील अशी २७ स्थानके असून वर्ष २०३१ पर्यंत १७ लाख प्रवासी प्रतिदिन प्रवास करतील, असा अंदाज आहे. ही मार्गिका सुरू झाल्यानंतर नरिमन पॉइंट, वरळी, वांद्रे-कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व आंतरराज्य विमानतळ, मरोळ औद्योगिक वसाहत, सीप्झ अशी महत्त्वाची केंद्र मेट्रोने जोडली जातील.

कुलाबा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ ५० मिनिटांत करणे सहज शक्य होणार आहे. सध्या बोगद्यांचे ९८.६ टक्के एवढे काम झाले असून भूमिगत स्थानकांचे सुमारे ८२.६ टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी ७३.१४ हेक्टर शासकीय जमीन व २.५६ हेक्टर खासगी जमिनीचे संपादन पूर्ण झाले आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता

रत्नागिरी येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि महाविद्यालयास संलग्नित जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ४३० रुग्णखाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

रत्नागिरी शहर हे कोकणातील उच्चशिक्षणाचेदेखील प्रमुख केंद्र आहे. जिल्ह्याचा बराचसा भाग ग्रामीण असून लोकसंख्या १६.९६ लाख आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला वैद्यकीय सुविधा मिळवून देण्यासाठी नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासोबतच निर्माण करण्यात येणाऱ्या श्रेणीवर्धित जिल्हा रुग्णालयाचा लाभ होणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्याची वैद्यकीय व्यवस्था मजबूत होण्यास मदत होणार आहे.



## अतिवृष्टिग्रस्तांना मदत



गेल्या दोन महिन्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार एनडीआरएफ च्या मदतीच्या दुप्पट रक्कम नुकसानग्रस्तांना देण्याचा आणि दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत ही मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर महागाई भत्त्यात ३ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही वाढ ऑगस्ट २०२२ पासून रोखीने देण्यात येईल. यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३१ वरुन ३४ टक्के होणार आहे.

## ज्येष्ठांना मोफत एसटी प्रवास

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन सेवेच्या बसेसमधून मोफत प्रवास करता येईल अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

## वैद्यकीय उपकरणे खरेदी

वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत केली जाणारी वैद्यकीय विषयक उपकरणे व इतर आनुषंगिक खरेदी ही गव्हर्मेंट ई-मार्केट प्लेस या पोर्टलच्या माध्यमातून करावी, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले आहेत. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चेअंती त्यांनी यासंदर्भात निर्देश दिले

## दहीहंडी : गोविंदाला विमा संरक्षण

शासनाने विमा कवच द्यावा अशी मागणी गोविंदा पथकांची होती. या मागणीनुसार गोविंदा पथकातील गोविंदांना आता १० लाखाचे विमा संरक्षण शासनाकडून देण्यात येणार आहे. या विमा संरक्षणाचे प्रीमियम शासनाकडून भरण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.

**– टीम लोकराज्य**

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

**राज्यात १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'घरोघरी तिरंगा' अभियान उत्साहात राबवण्यात आले. या निमित्त मुंबईतील शासकीय कार्यालये, महत्त्वाच्या वारसा लाभलेल्या इमारती, वास्तू तिरंगा विद्युत रोषणाईने उजळून निघाल्या.**


मंत्रालय


विधान भवन


हुतात्मा स्मारक


छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस


गेट वे ऑफ इंडिया


वांद्रे-वरळी सी लिंक

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: दीपक कपूर